Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख ४ माहे जून सन १९१७ ई० [अंक २२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

इंग्रजीच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुन येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा पापैकी एकास अथवा जास्त इसमांस अगर पापैकी मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची ५ वी कनिष्ठ शिल्लक प्रत्येक तिन्नवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाही. त्यांमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } Lyon Scott
आकोला ९।१।०९ } एजंट
नो नं १

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥, १, १॥, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।॥ १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥, १, १॥, रु प. **खहावा जोड**—शिसवी व शिवणीचे वगैरे सामान चाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

---

### रोल्डगोल्ड सोन्याचे
#### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं व्हान मोठें वाटेल तसें. सराची २–३–४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

#### कैस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता– मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव– मुंबई
नो० नं० ५

---

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

### नशिबाची– परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल. (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्मकुंडलीवरुन सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेंपर्यंतची फलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक तावीतास ३। सूचना— ग्राहकानीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावें. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८/- आण्याचे तिकिट पाठवावें.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदवडकर पेठ— नाशिक
नो० नं० ७३

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करुन बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जें. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय
#### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सांखीं व घागऱ्याचीं वगैरे स जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनकचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें निव्वळ पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करुन देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करुन देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

---

### आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करुं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमर्शियल अशूअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटांची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज, फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

---

### काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १४८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगुरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ४९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ९

---

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा.

### प्रारब्धपरीक्षा
#### फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागविणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करुन पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवावे उत्तर १ रु ४४ चे व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरुन एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तों चीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ४४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ८१ तिकीट पाठवा.

ज्योतिषी दा. दामि शास्त्री नं. १०३७
नो. नं. ७३ नाशिक

## नोटीस.

रा. रा. अमृता वा नारायण गावंडे राहणार बटवाडी बु॥ तालुके बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार गोविंदा वा शिवाजी पाटील यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मनला रुपये २२८३ बावीसशे त्र्यपशी ऐवजीं मौजे बटवाडी बु॥ येथील शेत सर्वे नंबर ८१ पोट हिस्सा नंबर ४ एकर१० गुंठे ३९ आकार रुपये २०॥१४ सालीम ता. १९-५-१७ इसवी रोजीं खरिदी दिला. व त्याबद्दलचे खरिदीखत ता. २१-५-१७ इसवी रोजीं करून नोंदून देण्याचे कबूल करून करारनामा लिहून दिला. असें असतां मी वॉर लोन वसूल करण्यास गेलो असतां माझे पश्चांत तुह्मी अमृता मेसाजी पाटील राहणार बटवाडी बु॥ यांचे भूलथापीस बळीपडून तुह्मी त्यांना खरिदीखत लिहून नोंदून दिले. परंतु खरिदीचा करार माझेशीं पूर्वी झाला असल्यामुळें तुह्मी अमृता मेसाजी यांस करून दिलेलें खरिदीखत रद्द आहे. तरी तुह्मी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मनला खरिदीखत करून नोंदून द्यावे. तसें न केल्यास त्यांनला कोर्ट मार्फत योग्य तजवीज करावी लागेल. व त्याजबद्दलचा येणारा खर्च तुमचेकडून वसूल केला जाईल. करिता आगाऊ नोटिशीनें कळविलें आहे कळावें. तारीख २७-५-१७

सही

१ गोविंदा शिवाजी पा. द. खुद

नो. नं २३८

---

## नोटीस.

रा. रा. संभु वा रावसिंग पाटील मुक्काम खरप ता. व जि. आकोला

यांसः—

नोटीस देणार शंकर नारायण नागझरीकर रा. नागझरी तालुके खामगांव जि बुलडाणा याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे स्नेही असून सावकारही आहांत यामुळें व मला पैशाची फार जरूरी असल्यमुळें मी तुह्मांस तारीख १८-५-१९१७ इ. रोजीं गहाणखत रुपये ७५० चे लिहून दिले व नोंदुन दिले व त्यांत अडिचशाची प्रामेसरी नोटचे रुपये मनकडे तुमचे भावाचे असलेले ते वजा जाता बाकी रुपये ५०० तुह्मी मला तारीख २६-५-१९१७ इ. रोजीं देण्याचे कबूल केलें व मी सब रजिस्ट्रर साहेब शेगांव यांचे पुढे भरणा पावल्याचे कबुल केले. त्याप्रमाणें काल रोजीं तुह्मास खरप येथें रुपये मागितले असतां तुह्मी मला असा जबाब दिला कीं सदरहु रुपये ७५० तुमचे बापाचे नांवचे गहाणखत मी रुपये ९०० चे तारीख १२-८-१५ इ. रोजी करून दिले आहे त्याचे व्याजांत मी रुपये मजरा करून घेतले. असे तुह्मी सांगितले व ठरल्याप्रमाणें मला रुपये दिले नाहींत. पूर्वीचे दस्तऐवजाचे व्याज मुळींच वरील रकमे इतके होत नाहीं तरी तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सदरहु नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत रकम रुपये ७५० मला द्यावे. न दिल्यास वरील तारखेचे साडेसातशाचे गहाणखत रद्द असे. त्याबद्दल मनकडे कांहीं एक घेणे नाहीं ही नोटीस लिहून दिली तारीख २६-५-१७ इ. दस्तुर खुद

सही

शंकर नारायण नागझरीकर रा० नागझरी ता. खामगांव हल्लीं मु. आकोला

नो. नं. २३९

---

## नोटीस

रा. अमृता वा मेसाजी पा. रा. बटवाडी बु॥ व ता० बाळापूर

यांसः—

नोटीस देणार अमृता वा नारायण कुणबी गावंडे रा. बटवाडी बु॥ ता॥ बाळापूर नोटीस देण्यांत येते कीं आह्मी आमचे मालकीचें शेत सर्वे नंबर ८१ पो. नं. ४ मौजे बटवाडी बु॥ येथील गोविंदा शिवाजी यास ता० १९।५।१७ इसवी रोजीं सकाळी रु. २२८३ चे भरण्यांत खरेदी करून देण्याचे कबूल करून त्याचे इसाराबद्दल रु. ५ घेऊन त्याबद्दल करारचीठी करून दिली ही गोष्ट तुह्मांस कळल्यावरून तुह्मी आह्मांस थापा देऊन जास्त रुपयास शेत विकत घेतो असें सांगून २५०० रुपये देण्याचें खोटेच सांगून मजपासून त्याच दिवशी सायंकाळीं खरेदीखत करून घेऊन नोंदुन घेतले परंतु त्यांत लिहिलेल्या भरण्याप्रमाणें मला एक पैसाही तुह्मी दिला नाहीं. सब रजिष्ट्रारचे समोर भरणा पावल्याचें कबूल कर ह्मणजे मी तुला घरी गेल्याबरोबर १००० रुपये मोजून देतों असें सांगितल्यावरून मी ही गोष्ट कबूल केली. तुह्मांस गोविंदा शिवाजी यांस करून दिलेली करार चिठी माहीती होती व तुह्मी मला जास्त रुपये देण्याचे कबूल केल्यावरून मी तुह्मांस खरेदी खत करून देण्याचे कबूल करून खरेदीखत नोंदून दिलें. परंतु मला कबूल केल्याप्रमाणें १००० रुपयापैकीं कांहीं एक दिले नाहीं. अशा रितीनें फसविलें. खरेदीखत बिन भरण्याचें व पोकळ असल्यामुळें त्याने मी बांधला जाऊ शकत नाहीं. सबब ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आत खरेदीखत आणून माझे स्वाधीन करावे तसें न केल्यास कायद्याप्रमाणें खरेदीखत रद्द करण्या बद्दलचे कायदेशीर इलाज केले जातील व त्याचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० ३० माहे मे सन १९१७ इ.

सही

अमृता वा नारायण कुणबी गावंडे रा. बटवाडी ता. बाळापूर नि. खुद हातचा आंगठा

नो. नं. २४०

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मजा चुलत भाऊ दगडू वा गणु बारी रा. रोहीणखेड ता. मलकापूर हा व मी एकत्र होतो व दगडू हा एकत्र असतांच मयत झाला त्यावेळीं खालील वर्णन केलेली जिंदगी वडिलोपार्जित आहे ती येणेंप्रमाणें.

मौजे रोहिणखेड येथील स. नं. १०५ सालीम.

राहतें घर व कोठे.

जंगम इस्टेट.

१ क्षेस १, टीण दहा फुटी १७, ज्वारी खंडी २॥ सोन्या चांदीचे डागिने किंमत रुपये २००.

येणेंप्रमाणें इस्टेट वडिलोपार्जित आहे. दगडु मयत झाल्यास अजमास चार महिने झाले दगडूची बायको झुमकी इचें मनांत सदर्हु इस्टेट अफरातफर करून दुसरा पाटाचा नवरा करणें आहे. तरी कोणी ही वरील मिळकत तिचे (झुमकी) पासून गहाण खरेदी घेऊं नये अगर अन्य तऱ्हेनें सदरहु इस्टेट अडकून ठेऊं नये. ठेविल्यास सदर्हु मिळकत जबाबदार न राहतां ज्याचा तोच जबाबदार राहील कळावें ता. २९-५-१७ इ.

दस्तुर रामचंद्र देविदास पांडे जनूनेकर.

सही

१ मारोती आकोसा बारी नि० हातचा आंगठा रा० रोहिणखेड ता० मलकापूर हल्लीं मुक्काम खामगांव

नो० नं० २४१

---

# वऱ्हाडसमाचार

ज्येष्ट शुद्ध १५ पिंगल संवत्सर १८३९.

## शेतकी शिक्षण विषयक कॉन्फरन्स.

चालू (जून) महिन्यांत सिमला येथें सरकारकडून भरविण्यांत येणाऱ्या शेतकी शिक्षणविषयक कान्फरन्सला सरकारी अधिकाऱ्यांबरोबर कित्येक बिनसरकारी गृहस्यांनाही सरकारकडून निमंत्रण करण्यांत आलें आहे हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो. आमंत्रितांची संख्या फारच मर्यादित ठेवली आहे. प्रत्येक प्रांतातर्फे बहुधा एकच सभासद निमंत्रित आहे. नागपूरतर्फे ना० सर गंगाधरराव चिटणीस हे जावयाचे आहेत. आमच्या वऱ्हाड प्रांताला कापसाच्या पिकामुळें विशेष महत्त्व आहे व वऱ्हाड प्रांतांतली लोकवस्ती मुख्यतः शेतकऱ्यांचीच आहे. असें असतां या प्रांतातर्फे एकाही गृहस्थाला या परिषदेंत बसण्याचा मान मिळूं नये ही जितकी आश्चर्याची, तितकीच खेदाची गोष्ट आहे. शेतकीचें शिक्षण कसें द्यावें, शेतकी शाळेतील शिक्षकांसाठीं स्पेशल ट्रेनिंग क्लास काढावे कीं नाहीं. पुस्तकें कोणती शिकवावीं इ. महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार या परिषदेपुढें व्हावयाचा आहे. शेतकीचे शिक्षण देण्याचे सरकारचे आजपर्यंतचे प्रयत्न जवळ जवळ निष्फळच झालेले आहेत; असें कां व्हावें व जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, जपान वगैरे देशांतल्याप्रमाणें इकडे ही सुशिक्षितांनीं शेतकीचा धंदा उचलण्याचे कामीं कोणत्या अडचणी आड येत आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. शेतकीच्या उन्नतीविषयक प्रश्नाचा अंतरात्मा हा प्रश्न आहे. पण सरकारानें जी वादविषयक प्रश्नाची यादी प्रसिद्ध केली आहे तींत या प्रश्नाचा उल्लेख केलेला दिसत नाहीं. तथापि शेतकी शिक्षणाची प्रगति सुधारलेल्या देशांतून कशी होत आहे व आमचे कडे कशी आहे यांचें दिग्दर्शन करणारें एक पत्रक सरकारकडून नुकतेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यावरून वरील प्रश्न त्यांनीं अगदीं दृष्टिआड केला आहे असें दिसत नाहीं. लढाईमुळें सध्यां इंग्लंडला बाहेर देशांहून धान्यवगैरे नेतां येत नसल्यामुळें विलायतेंतच शेतकीचा विस्तार करण्याची व अर्थातच शेतकी शिक्षण शक्य तेवढें वाढविण्याची अवश्यकताच उत्पन्न झाली आहे. मि० फिशर हे या कामीं जिवापाड मेहनत करीत आहेत व त्यांच्या परिश्रमानें व कळकळीनें तूर्त तरी विलायते पुरता शेतकी शिक्षणाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत आला आहे. १९१३ पेक्षां १९१८ सालीं चौपटीनें अधिक धान्य इंग्लंडांत पिकविण्याची तजवीज करण्यांत आली अहे असें नुकतेंच आमच्या वाचण्यांत आलें आहे. जर्मनींत तर प्राथमिक शाळा, हायस्कुलें व युनिव्हर्सिट्या या सगळ्या शिक्षणसंस्थांतून शेतकीच्या शिक्षणाला योग्य स्थान मिळालें असुन दुय्यम शाळांतून शेतकीच्या शिक्षणाबरोबर सामान्य शिक्षण ही देतात. कनिष्ट प्रतिच्या शाळांचे बाराही महिने शिक्षण देणाऱ्या व फक्त हिंवाळ्यापुरत्या शाळा असे दोन वर्ग आहेत. कारण हिंवाळ्यांत शेतकऱ्यांचीं मुलें घरीं रिकामीं बसावयाचीं तीं शाळेंत जातात. उन्हाळ्यांत फिरते शेतकी शिक्षक खेड्यापाड्यांतून हिंडून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रयोगद्वारा शिक्षण देतात. या शिवाय प्राथमिक शाळांतून मिळालेलें शिक्षण पुढें चालू ठेवणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराच्या दृष्टीनें पाहतां या शाळा यशस्वी झाल्या आहेत; तथापि प्रत्यक्ष शेतकीच्या उन्नतीला त्यांचेपासून विशेषसा उपयोग झालेला नाहीं. अमेरिकेंतल्या लोकांनीं शेतकी शिक्षणप्रसारासाठीं वाचनपाठ व्यावहारिक गोष्टीसंबंधाचे ठेवणें, सक्तीचें शेतकी शिक्षण देणें वगैरे हरतऱ्हेचे प्रयत्न चालविले आहेत. अमेरिकेंतल्या दक्षिण संस्थानांत तर शेतकऱ्यांच्या मुलांना नव्हेतर प्रत्यक्ष प्रौढ शेतकऱ्यांनाच शेतकीचें महत्त्व व सुधारलेल्या पद्धति शिकविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. जपानांत प्राथमिक शाळांतल्या वरच्या वर्गांतून शेतकीचें शिक्षण देतात. १२ वर्षांच्या वरील मुलांना सामान्य शिक्षणाबरोबर शास्त्रीय शिक्षण व शेतकीचें प्रत्यक्ष शिक्षण शाळेला

जोडलेल्या शेतांत ३।४ वर्षेपर्यंत देण्यांत येते. १४ वर्षांच्या वरील विद्यार्थ्यांना याहून वरच्या प्रतीचें शिक्षण देतात. यातून उत्तीर्ण झालेल्यांना पुढें ही शिकण्याची तजवीज असते. तेथें ते शिकतात, किंवा घरची शेती करतात, अगर शेतकीविषयक शिक्षकाचें काम पतकरतात. या शाळांतून प्रत्यक्ष शेतकी शिक्षण देण्याचें काम त्या विषयांतल्या तज्ञांकडेच सोंपविलेलें असतें. शेतकीच्या संबंधांत शास्त्रीय शोध वगैरे लावण्यासाठीं शेतकी कॉलेजें व युनिव्हर्सिट्या स्वतंत्र आहेतच. पण या सगळ्या शाळांतून सामान्य शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यांत येत नाहीं ही विशेष मुद्याची गोष्ट आहे.

वरील वर्णन वाचलें ह्मणजे सुधारलेल्या राष्ट्रांनीं कृषिकर्मविषयक शिक्षणाचा कार्यक्रम नक्की करून तो अंमलांत आणण्याचे कसे प्रयत्न चालविले आहेत तें दिसून येईल आमच्या देशाची स्थिति अगदींच निराळी आहे. येथें व्यवस्था अशी कोठेंच कांहीं नाहीं. प्रत्येक प्रांतिक सरकारानें मनास येईल त्या तत्त्वावर शेतकी शिक्षण द्यावें अगर देऊं नये. एक जण ह्मणतो कीं प्रत्येक प्रांताला स्वतंत्र शेतकी कॉलेज हवें; दुसरा ह्मणतो शेतकी शिक्षण फक्त अडाणी शेतकऱ्यांच्याच मुलांना द्यावें; तिसरा ह्मणतो कीं सामान्य शिक्षणाच्याच वाचन पुस्तकांत कांहीं शेतकी पाठ घालावे; सारांश, कशाचाच कशाशीं मेळ नहीं. ही हल्लींची सगळी अव्यवस्था मोडून जर्मनी, इंग्लंड, जपान व अमेरिका वगैरे देशांतल्यासारखी सूत्रबद्ध व्यवस्था शेतकीच्या शिक्षणासंबंधानें व आमच्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीच्या अनुरूप यंदाच्या कान्फरन्समध्यें होणार असली तर कान्फरन्स भरविण्याचा कांहीं उपयोग. नाहींपेक्षां पुसा, वगैरे ठिकाणीं पूर्वीं कान्फरन्सें भरून सुद्धां सांवळा गोंधळ आहे तो आहेच असें व्हावयाचें असलें तर या महागाईच्या काळांत कान्फरन्स भरविण्यांत पैसा व श्रम यांचा अपव्यय करण्यांत तरी काय अर्थ आहे?

## राष्ट्रीय स्वयंसेवक.

सध्याच्या काळीं आपल्या लोकांपुढें कामाचा डोंगर पडलेला आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांच्याद्वारें शिक्षणप्रसार करावयास पाहिजे आहे. थर्ड क्लास रेल्वे उतारूंची दाद रेल्वे बोर्डापर्यंत पोंचवावयास पाहिजे आहे; कामकरी वर्गासाठीं रात्रीच्या शाळा चालविण्याचें काम ही अगत्याचें आहे. परदेशांत कोठें व कशा रीतीनें हिंदुस्थानचा व्यापार वाढवितां येईल याची चौकशी करून नक्की बातमी मिळवावयास हवी आहे. निकृष्ट वर्गाच्या उन्नतीसाठीं जोराचे प्रयत्न करावयास हवेत. लोकांत नवा सामाजिक, राजकीय, औद्योगिक वगैरे संबंधानें विचार जागृति केली पाहिजे. ही व अशीच दुसरी असंख्य पण राष्ट्रीय उपयुक्ततेचीं कामें करण्यास कळकळीचीं, नेटाचीं, उद्योगशील, निस्पृही व निःस्वार्थी अशीं माणसें कोठून आणावयाचीं? या बाबतींत तरुण सुशिक्षितांनींच इतरांना कित्ता घालून दिला पाहिजे. हें ध्यानांत घेऊनच पर. ना. गोखले यांनीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी काढली व तिच्या शाखा हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांत स्थापित केल्या. अशा संस्था शेकडों निघावयास पाहिजेत. या बोलण्याच्या गोष्टी नाहींत, कृतीच्या आहेत. आमच्यांतल्या तरुण सुशिक्षितांनीं आपलें तन मन धन राष्ट्रीय कार्याला अर्पण केलें पाहिजे. असें जे कोणी करतील त्यांची योग्य कदर ही देशानें केली पाहिजे. आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं अमळनेर (खानदेश) चे सुप्रसिद्ध वकील रा जावडेकर यांनीं आपल्या वकीलीच्या धंद्यास रामराम ठोकून देश कार्याला वाहून घेण्याचें ठरविलें आहे असें मुंबईचें 'संदेश' पत्र ह्मणतें. रा. जावडेकर यांनीं रेल्वे अधिकाऱ्यांच्या जुलमी वर्तणुकीला आळा घालण्याचें काम आजपर्यंत मोठ्या धैर्यानें, नेटानें व चिकाटीनें केलें आहे. द्रव्यार्जनाचा मोह सुटल्यानंतर ते राष्ट्रीय कार्यांत अधिकच लक्ष घालून राष्ट्राची सेवा करतील अशी आह्मांस उमेद आहे. रा. जावडेकर यांनीं अनुकरणीय उदाहरण घालून दिल्याबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करतों.

## अखेरची धडपड.

सध्या साऱ्या जगांत लोकांच्या चित्तवृत्तींना जागृत करणारा जर एखादा विषय जर एखाद्या महामंत्रानें भिन्न भिन्न राष्ट्रांचीं हृदयकपाटें खुलीं होऊन परस्परांविषयीं प्रेम व सहानुभूति उत्पन्न होत असतील तर तो विषय व तो महामंत्र ह्मणजे प्रजासत्तेची वाढ हा होय. रशियांतली राजसत्ता उलथून पडून प्रजासत्ता तेथें स्थापित झाल्याबरोबर इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, वगैरे राष्ट्रांनीं सहानुभूतांचे संदेश पाठवून नव्या रशियन राज्यपद्धतीचें अभिनंदन केलें. लहान लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आणि जर्मन राजसत्तेनें त्यांना गिळंकृत करूं नये ह्मणून न्याय बुद्धीनें प्रेरित होऊन दोस्त राष्ट्रांनीं सुरू केलेल्या प्रस्तुतच्या युद्धांत लोकसत्तेचे कैवारी अमेरिकन राष्ट्र पडलें याबद्दल ईश्वर प्रार्थना करण्यासाठीं सेंटपॉलच्या मंदिरांत जो समाज जमला होता त्यांत इंग्लंडच्या राजघराण्यांतले कित्येक पुरुष व मुत्सद्दी मंडळी होती. धर्मगुरूंनीं आपल्या उपदेशांत ही लोकसत्तेचा उत्कर्ष हाच विषय घेतला होता. राजसत्ता, अधिकारीसत्ता, इ० चा नायनाट होऊन लोकसत्ता साऱ्या जगांत स्थापित होईल असा रंग आतां दिसत आहे. हा सर्व प्रकार पाहून आणि हिंदुस्थानांत ही स्वराज्याच्या मागणीचा दुंदुभिनाद होत असलेला ऐकून येथील अधिकाऱ्यांच्या चित्तवृत्ति साशंक होणें स्वाभाविक आहे. कित्येक इलाखाधिकारी ही चळवळ दडपून टाकण्याचे जे वेड्यासारखे प्रयत्न करीत आहेत, त्यांत विकारवशता आणि अविचार यांचाच भाग विशेष दिसतो. इंडियन डिफेन्स फोर्स (भारत संरक्षक सैन्य) मध्ये हिंदी लोक भरती होत नाहींत हें पाहून संतप्त हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या जाहिरपत्रकांत शांत विचाराचा पूर्ण अभाव दिसतो. नुसत्या मद्रास इलाख्यांतून ३४६ उमेदवार भरती होण्यास तयार होऊन त्यांनीं अर्ज केले होते; पण त्यांना अधिकाऱ्यांकडून वेळेवर भरून पाठविण्याचे नमुनेच मिळाले नाहींत. अशीच तक्रार इतर प्रांतांची ही आहे. पण नमुने योग्यवेळीं त्यांना देण्यांत आले नाहींत ही चूक वास्तविक अधिकाऱ्यांची असतां त्याबद्दलच्या दोषाचें खापर आमच्या लोकांवर फोडण्यास हिंदुस्थानसरकारला दिक्कत वाटली नाहीं. मद्रास सरकारानें गरीब विद्यार्थ्यांवर सर्क्युलररूपी शस्त्राचा प्रयोग निर्दयपणें करून विद्यार्थी व त्यांचे पालक या दोघांविषयीं ही अन्यायाचें वर्तन केलें आहे. कित्येक प्रांतिक सरकारांनीं देशांतल्या कित्येक परमपूज्य व सन्मान्य लोकनायकांना आपल्या प्रांतांत पाऊल ठेवण्याचीही बंदी केली आहे! ही अधिकाऱ्यांचीं कृत्यें कर्तुम कर्तुम् अधिकार आपल्या हातून जाऊन लोकपक्ष प्रबळ होऊं नये ह्मणून अखेरची धडपड दिसते आहे असें लोकांना वाटल्यास काय आश्चर्य आहे? जगांत चाललेली विचारक्रांतीची लाट हिंदुस्थानावर येऊं नये ह्मणून तिला बांध घालण्याचे सरकारी अधिकाऱ्याचे हे प्रयत्न खरोखर हास्यास्पद होत.

## देशी भाषांच्या द्वारें औद्योगिक शिक्षण.

आमचें सरकार शेतकी खात्याच्या व शास्त्रीय तज्ञांच्या द्वारें अनेक प्रयोग करून शेतकीची व उद्योगधंद्याची वाढ व्हावी ह्मणून यथाशक्ति प्रयत्न करीत आहे. पण शेतकऱ्यांना व कारखान्यांतून कामें करणाऱ्या लोकांना सामान्य शिक्षण सुद्धां नसल्यामुळें तज्ञांचें इंग्रजींत लिहिलेले रिपोर्ट आफिसांतल्या व लायब्ररींतल्या कपाटांची शोभा मात्र वाढवितात; या पलीकडे त्यांचा काडीमात्र उपयोग होत नाहीं. ह्मणून या रिपोर्टांतली माहिती साधारण लिहितां वाचतां येत असेल अशांना ही सहज समजेल अशा रीतीनें ती देशी भाषांच्या द्वारें प्रकट करावी अशी सूचना या पूर्वीं आह्मी अनेक वेळां केली आहे व तीच पुनः करतों. असे पुष्कळ साधे व सहज करतां येण्यासारखे उद्योगधंदे आहेत कीं त्यांची माहिती सोप्या रीतीनें देशी भाषेंत जनतेला समजावून देण्याचा यत्न केला तर तो धंदा उचलण्यास व त्यांत सुधारणा करण्यास शेकडों निरुद्योगी लोक तयार होतील. आमच्या लोकांचें अज्ञान आमच्या औद्योगिक उन्नतीच्या आड येत आहे असें प्रत्येक जण ह्मणतो. पण उद्योगधंद्यासंबंधानें कांहीं नवे प्रयोग करून पाहिले किंवा शोध लाविले तर त्यांबद्दलची पुस्तकें सगळे इंग्रजींतच लिहितात. कलकत्याचे प्रो. जगदीशचंद्र बोस किंवा डॉ० राय यांच्या सारखे अपवाद फार थोडे सांपडतील. नुकतेच बडोद्याचे मि. कांटावाला यांनीं टाकाऊ ह्मणून फेकून दिलेला कापूस किती निरनिराळ्या तऱ्हेनें उपयोगांत आणतां येतो व त्याच्या कोणकोणत्या वस्तु तयार करतां येतात या बद्दलची माहिती म्यांचेस्टर येथें स्वतः मिळवून आपलें ज्ञान एका ग्रंथांत समाविष्ट केलें आहे. हा ग्रंथ त्यांनीं प्रथम इंग्रजींतच लिहिलेला नुकता प्रसिद्ध झाला आहे, तथापि त्याचें देशी भाषेंत भाषांतर झाल्याशिवाय सामान्य जनतेला त्या माहितीचा कांहीं उपयोग करून घेतां येणार नाहीं ही गोष्ट त्यांचे लक्षांत येऊन त्यांनीं त्या पुस्तकाचें गुजराथी भाषांतर लवकरच प्रसिद्ध करण्याचे ठरविलें आहे. भाषांतर सुगम झाल्यास लोकांत त्याची माहिती होऊन तिचा उपयोग कृतींत उतरविण्यास कांहीं थोडे लोक तरी खात्रीनें पुढें होतील अशी आह्मांस उमेद आहे.

## हिंदुस्थानच्या संरक्षणासाठीं जपानचें साह्य!

हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य होऊन शंभरावर वर्षें झालीं. लष्करी खर्चानिमित्त हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा बराच मोठा अंश इतके दिवस खर्ची पडत आला. पण या सर्वांची अखेर फलश्रुति काय झाली असें कोणी विचारील तर ती ता. १८ एप्रिल रोजीं लंडन येथें एका मेजवानीचे प्रसंगीं जपानी वकिलानें केलेल्या भाषणांत उत्तम प्रकारें दिसून येईल. सदर वकीलानें स्पष्टपणें सांगितलें कीं जपानी सैन्य आज हिंदुस्थानच्या किनाऱ्याचें संरक्षण करीत आहे. अरेरे! केवढी दुःखाची गोष्ट कीं ब्रिटिश सरकारला आपल्या हिंदी मुलखाच्या किनाऱ्याच्या संरक्षणासाठीं जपानसारख्या परक्या राष्ट्राच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग यावा! हिंदुस्थानांतल्या स्वतःच्या प्रजेविषयीं गैर विश्वास उत्पन्न होऊन त्यांनीं हिंदी प्रजेच्या हातची शस्त्रें काढून घेतलीं नसतीं, निदान त्या प्रजेपैकीं उच्च प्रतीच्या लोकांना तरी लष्करी शिक्षण देऊन क्षात्रधर्मांत त्यांनीं तरबेज केलें असतें तर जपानसारख्या परक्या देशच्या वकिलाचे तोंडून खुद्द ब्रिटिश साम्राज्याचे राजधानींत वरच्या सारखे आत्मप्रौढीचे उद्गार ऐकून घेण्याचा प्रसंग ब्रिटिश मुत्सद्यांना कां आला असता? अजून तरी आमचे सरकार हिंदी प्रजेविषयींचा गैरविश्वास मनांतून काढून टाकून चुकीची दुरुस्ती करण्याचें शहाणपण दाखवील काय?

## रोझिया.

राजश्री स्टँडन कमिशनर साहेब यांनीं गेल्या शेतकीच्या परिषदेच्यावेळीं या रोझिया कापसाची खरी महती मोठ्या मार्मिकतेनें कळविली होती. हा कापूस इतका महत्वाचा आहे व त्याला बाजारांत इतकी चांगली किंमत येते कीं, जर सर्वत्र शेतकऱ्यांनीं रोझिया बीं पेरण्याचा प्रघात सुरू केला तर त्यांना जो अधिक नफा होईल तो एक मुर्तिजापूर— एलिचपूर रेल्वे उभारण्याइतकी लोकांस श्रीमंती आणून देईल. आतां हे कपाशीच्या लागवडीचे दिवस नजीक आलेले आहेत. आणि त्यांनीं येथील सरकारी शेतकीच्या प्रयोग शाळेच्या मार्फतीनें व कांहीं शेतकीच्या युनीअनांच्या द्वारानें रोझिया बीं मुबलक योग्य किंमतीनें पुरविण्यांत येण्याविषयीं आगाऊच योजना करून ठेवलेल्या आहेत, तेव्हां लोकांनीं रोझियाचें बीं अवश्य पैदा करून त्याच्या चांगल्या किफायतवार उत्पन्नाचा लाभ घ्यावा असें आह्मी मुद्दाम सुचवितों.

## ग्राम पंचायती.

ग्रामपंचायती आमच्या इकडे सुरु कराव्या या उद्देशानें रा. रा. काशीराम श्रीराम जठार यांस त्या संबंधाची इतर प्रांतांतील माहिती मिळविण्यासाठीं धाडले होतें. त्यांनीं आपल्या माहितीचा रिपोर्ट तयार करून या बाबतींत कांहीं योजना निश्चितपणें तयार केल्या असल्या पाहिजेत. ते पुढील आठवड्यांत येथें आल्यावर या नव्या योजना काय आहेत या कळून घेण्याविषयीं लोक मोठे उत्सुक आहेत. स्वराज्याच्या मूलसंस्था ह्मणून आह्मी म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्ड यांच्याकडे आज ३० वर्षांवर मोठ्या उत्सुकतेनें धाव घेतली. आमच्या अंगीं स्वराज्याची पात्रता आली नाहीं असे हा एका पिढीच्या कालाचा इतिहास सरकारी मुखानें सांगत सुटला आहे. तेव्हां वरील दोन्ही स्थानिक स्वराज्याच्या संस्था प्रमाणें ही ग्राम पंचायतीची संस्था तितकीच ती अपात्रता कायमची चालूं ठेवण्याला कारणीभूत होऊं नये ह्मणून अलीकडे सरकारी लोककल्याणाच्या ह्मणून निघणाऱ्या संस्थांविषयीं लोकमत साशंक व संशयग्रस्त असतें व सरकारी कितीही सद्धेतू असले तरी ग्राम पंचायतीची व्यवस्था यशस्वी होण्याला लोकांच्या हातीं आपापल्या गांवापुरते सर्व कारभार देण्यांत आले पाहिजेत. अधिकार जसे मिळत जातात त्या बरोबर मनुष्य त्या त्या जबाबदाऱ्या संभाळण्याला सपात्र होत असतो असा अनुभव आहे. विश्वास व प्रेम हीं ईश्वरी भांडारें आहेत आणि त्यांचा प्रसार ज्या मानानें सरकार करील त्या मानानें कोणतीही सार्वजनिक संस्था यशस्वी होत जाते. चांगला गांव वसाविणें, मुलांना विद्या देणें, आरोग्य शास्त्रा-अन्वयें घरांची उभारणी करणें, लोकांना आपापले उद्योग स्वैरपणानें करूं देणें, आणि त्यासाठीं त्यांना सहकारी संस्थांची संजीवनी शक्ती शिकविणें आणि अर्थात त्या बरोबर दिवाणी व फौजदारी भांडणाचा क्रमशः नाश करीत जाणें इ. इ. पुष्कळशा गोष्टी ग्राम पंचायतींत करावयाच्या आहेत. ग्राम पंचायती जर खऱ्या सजीव संस्था जागृत झाल्या तर त्या आमच्या भावी स्वराज्याचे प्राणच होत. या ग्रामसंस्था ह्मणजे विस्तृत प्रमाणावर गांवोगांवच्या म्युनिसिपल कारभारच होत. याच दृष्टीनें आह्मी नव्या होऊं घातलेल्या ग्रामसंस्थाकडे उत्कंठेनें पहात आहों. खरी सत्ता लोकांच्या हातीं पाहिजे, आणि सरकारी अंमलदार हे ती सत्ताश्री चालविणारे चाकर आहेत अशी खरी जाणीव लोकांमध्यें उत्पन्न होईल, आणि सरकारी अंमलदार हा नवा सेव्य भाव पत्करण्यास तयार होतील तरच या भावी ग्रामसंस्थामध्यें कांहीं राम उत्पन्न होईल. आणि हें नवें चैतन्य जर उद्दीप्त होणार नाहीं तर हल्लींच्या म्युनिसिपालिट्या व बोर्ड यांच्याच बंधुमालेंत या ग्रामसंस्था जाऊन बसण्याची मोठी भीती आहे.

## मक्केची यात्रा.

या लढाईच्यामुळें कोणीही महाजें मुंबई बंदरांतून तिकडे नेऊ इच्छित नाहींत त्यामुळें मुंबईच्या हजकमिटीच्या ठरावा वरून असें सरकारी रितीनें जाहिर झालें आहे कीं यंदा ही यात्रा आमच्या इस्लामी बंधूस शक्य नाहीं. तेंव्हा मुंबईला जाण्याचा खटाटोप व व्यर्थ खर्च न भरतां मानासिक हजच्या यात्रेचें महात्म्य व चित्तशुद्धी किती मोठी आहे हें शिकण्याची ही उत्तम संधी होय. अल्लाचें राज्य मक्केपेक्षां अंतःकरणांतच विशेष जागृत होईल तर बरें.

## हिंदू मिशनरी.

मुंबईचे बालबोध कर्ते रा. रा. गजानन भास्कर वैद्य यांनीं हिंदू मिशनरी संस्था काढली आहे आणि तेथें हिंदुधर्माची दीक्षा देण्यांत येते. आतां त्यांचा विचार येत्या जुलै पासून एक त्याच नांवाचें साप्ताहिक काढण्याचा आहे. जन्म व क्षेत्र यांनीं बनणाऱ्या हिंदूपेक्षां यापुढें खऱ्या हिंदू धर्माच्या द्वारानें हिंदुलोक सर्व जगभर प्रसृत करण्याला व इतर धर्मावाल्यांना हिंदूधर्म हें सर्व धर्मांचें आदिपीठ आहे हें कळविण्याला हा उत्तम मार्ग होय. आर्य संस्कृतीचीं उच्चशिखरें हा हिंदू मिशनरी दाखवो!

## चाकरीचें राऊळ.

देवदर्शनाला गेले असतांना प्रथमतः त्या राऊळाच्या शिखराचें वंदन करण्याचा प्रघात आहे त्याप्रमाणें मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून "प्राव्हिनशियल सिव्हिल सर्व्हिस" मध्यें जी मंडळी अधिकारावर आहेत त्यांना त्यांच्या चाकरीच्या देवळाचें शिखर ह्मणून तीन डेप्युटि कमिशनरच्या जागा व ४ डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जजच्या जागा चाकरीच्या प्रारंभीं उभ्या ठेवलेल्या आहेत. या ७ जागा नांवानें मोठ्या; पण हें ७ प्रांतिक दिग्गज ह्मणून यांस पगार मात्र सिव्हिल सर्व्हंटांच्या दोन तृतीयांशाइतकी मिळेल. हा अपमान सहन करण्यापेक्षां या सात ही जागा काढून घेतल्या तरी कांहीं विशेषसा उपासमार होण्याचा संभव नाहीं. आणि सध्यां रा. रा. रुस्तुमजी फर्दुमजी व काशीनाथ श्रीराम जठार हे आपल्या ठाणावर बहाल आहेत तोंपर्यंत प्राव्हिन्शीयल सर्व्हिसला हीं दोन शिखरें अदृश्य राहातील. जो जो विचार करावा तों तों असा पक्का निश्चय होतो कीं ही इंडियन सिव्हिल सर्व्हिसची संस्थाच लवकर बंद करण्यांत यावी ह्मणजे आमच्या बादशहाच्या चाकरीतलें हे अमंगळ भेदाभेद नष्ट होतील आणि ब्रिटिश प्रजेचें पूर्ण स्वातंत्र्य आह्मी उपभोगू लागूं. जेथें जेथें ब्रिटिश साम्राज्याचें निशाण फडकेल तेथें तेथें देश धर्म व जन्मस्थान यांनीं आमच्या मार्गांत कोठें ही मज्जाव करतां कामा नये. ही क्रांति घडवून आणण्यासाठीं आमच्या चक्रवर्ती बादशहांनीं एखादा इंडियन प्राइम मिनिस्टरच्या जागीं मुद्दाम नेमला पाहिजे. ह्मणजे तो सर्व ब्रिटिश राष्ट्राचा दृष्टिकोन न्यायपथानें वळवील.

## दृष्टिकोन.

लॉर्ड हार्डिंज गेले आणि त्यांच्या बरोबर आमच्या इंडियन कारभाऱ्यांचा दृष्टिकोन फार बदलला आहे पंजाबचे लेफ्टनेंट गव्हर्नर काय, मद्रासचे गव्हरनर काय व मुंबईचे गव्हरनर काय, सगळ्यांच्याच दुर्बिणी एकदम इंडियन आकाशांतील भलत्याच ताऱ्यांच्या शोधाकडे लागलेल्या आहेत. स्वराज्याचा तारा आकाशांत दिसतच नाहीं असें आतां झालें आहे. जर कोणी या स्वराज्याच्या ताऱ्याकडे इंडियन राष्ट्राची दृष्टी वळविण्याची खटपट करील, तर हा दृष्टिपंथांत येत असलेला स्वातंत्र्याचा तेजोगोल पाहून लोक त्याचें वंदन करूं लागतील आणि त्याच्या प्रकाशानें सर्व राष्ट्राची हाल चाल व क्रांती होईल; पण सरकारी राजकीय ज्योतिर्विदांनीं अराजकतेचीं शेंडेनक्षत्रें सर्व आकाशभर दिसूं लागल्याचे विद्युत्संदेश सर्व राष्ट्रभर प्रसृत केले आहेत आणि या महायुद्धानंतर तात्कालिक स्वराज्य मागणाऱ्या लोकांनीं सर्व तरुणांचीं मनें क्षुब्ध केलीं आहेत. तेव्हां त्यांच्यावर नव्या दडपशाहीची शस्त्रास्त्रें चालविण्यांत येतील अशी ही मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेंटलंड यांनीं दहशत घातली आहे. आमच्या मध्यप्रांताच्या सरकारला तेवढी विद्युतजिव्हा नाहीं; पण त्यांनीं या स्वराज्याच्या चळवळींत लोकांना पडतां न येईल असा कुलुपी बंदोबस्त फार नामी केलेला आहे. हे सुधारलेले इलाखेवाले बावरेपणानें किती ही बडबड करोत; पण त्यांच्यापेक्षां आमच्या मध्यप्रांताचा मुत्सद्दीपणा खरोखर वर्णनीय आहे असें आह्मी अभिमानानें व संतोषानें कळवितों. इंडिया गव्हर्नमेंटचा आंदोलक जसा हलतो तसे आमच्या इकडच्या वड्याळांतील चक्रें बिन बोभाट फिरूं लागतात आणि इतर इलाख्यांतल्या चक्रांतला कर्कचपणा इकडे दिसून येत नाहीं. पण अशा दृष्टिकोनाच्या फरकांनीं इंडियन राष्ट्र यापुढें मागें स्वराज्याचें ध्येय सिद्धीस जाईपर्यंत हें महायुद्ध संपणारच नाहीं. आणि जर लोकसत्ता हें ब्रिटिश साम्राज्याचें ब्रीद आहे तर या तेहतीस कोटी आर्य प्रजेच्या हातीं खरी सत्ता येईपर्यंत आणि लोकांचीं कायदेकौंसिलें आपल्या हातीं कारभाराचीं सूत्रें स्वीकारीपर्यंत ब्रिटिश साम्राज्याची खरी उन्नतीच होण्याचा संभव नाहीं.

## फुलबाग.

### ( ब्रिटिश साम्राज्याचें उद्यान. )

चांगला माळी जसा आपल्या बगीच्यांत निरनिराळ्या फुलझाडांचीं आळीं एकमेकापासून वेगळीं ठेवतो आणि यथाऋतू प्रत्येक वाटिकेंतील पुष्पें आपल्या करंडींत गोळा करून नंतर तीं वाटून देतो त्या प्रमाणेंच आमचे जार्ज बादशहा हे ईश्वरी अंशाचे माळी आहेत. त्यांच्या साम्राज्याच्या उद्यानांतील निरनिराळीं राज्यें व वसाहती जितक्या एकमेकापासून अलिप्त राहातील, तितक्या त्या स्वयंवर्धक होऊन परस्परांना चांगली शोभा आणतील, आणि सर्व उद्यानाला इंद्राचें नंदनवन बनवितील. निरनिराळीं फुलझाडें सर्वच काळ फुलत नाहींत. त्यांचीं बहारी निरनिराळ्या ऋतूंत असते हें माळी जसा ओळखतो आणि सरसकट सर्वत्र आळ्यांतील झाडें एकदारखीं फुलत नाहींत ह्मणून त्याचा ते विध्वंस करित नाहींत किंवा प्रत्येक आळ्याची स्वतंत्रता इतकी चांगली ठेवतो कीं एकाचा उपसर्ग दुसऱ्याला होऊं देत नाहीं. हाच दृष्टांत आमच्या राज्यकर्त्यांनीं इंडियाच्या स्वराज्यासंबंधानें पुरतेपणीं लक्षांत ठेविला पाहिजे. कदाचित् इंडिया गुलाब नसेल, मोगरा नसेल किंवा चाफा नसेल, पण ती कण्हेर असली किंवा गुलमोहर असला तरी त्याचा बहार येण्याला निसर्गांतलें स्वातंत्र्यच येथील लोकांना मिळालें पाहिजे. ब्रिटिश पार्लमेंटाची उन्नत अवस्था इंडियाला आणण्याची ती खटपटही मोठी घातुक होईल आणि ईश्वरानें आपल्या मानवी उद्यानांत जें वैचित्र्य ठेविलें आहे त्याचा संहार तर होणार नाहींच, पण विद्रुपता आणण्याचा तो प्रयत्न अखेरीला फसेल. इंडियन राष्ट्राचा जो विशिष्टपणा आहे तो कायम ठेऊन त्याची स्वैर वाढ हल्लींच्या ब्रिटिश राष्ट्राच्या कालमानानें खुंटतां कामा नये. इंडियन राष्ट्राला जो जीवनरस मिळायाला पाहिजे तो त्याला मिळत नाहीं. त्याची छाटाछाट जोतो ब्रिटिश मुत्सद्दी आपापल्या तऱ्हेनें करीत आलेला आहे. कोणत्याही कारभारांत त्या राष्ट्राची अंतर्निष्ठा बोलकी पाहिजे तेथें दुसऱ्याच्या वाणीनें काम होण्याचा संभव नाहीं. उद्यानें त्याला योग्य हवापाणी मिळेल तरच त्याच्या वृक्षांची वाढ होऊन तो फल पुष्पानें शोभिवंत होईल. इंडियाचा राज्यकारभार इंडियन लोकांच्याच हवापाण्यानें चालला पाहिजे. पण येथें सध्या एवढा विपर्यास होत चालला आहे कीं इतिहासवेत्त्यांना गेल्या १०० वर्षांचा इतिहास लिहितांना मानवी स्वभावाचा लोलुपपणा, कृपणदृष्टी, व दूर उत्खारण यांनीं या इंडियन वाटिकेचा किती उच्छेद झाला आहे याचाच वृत्तांत अधिक ल्याहावा लागेल. तेव्हां जर या महायुद्धाच्या समाप्तींत मनुष्याच्या असुरीपणाचा विध्वंस होत आहे, तर आह्मांस उमेद आहे कीं स्वराज्याचें व स्वातंत्र्याचें हवापाणी आमच्या इकडेही चांगलें मानवूं लागेल. ज्या ब्रिटिश माळिणीनें आपल्या मनोराज्यांतील इंडियांत स्वराज्याचीं उद्यानें उभारलीं आहेत त्या व्हिक्टोरिया महाराणीची आकाशवाणी खरी करणें तिच्या पुत्रपौत्रादिकांकडे आहे आणि या बळवत्तर आशेवरच हिंदुस्थान ईश्वराकडे डोळे करून आपली स्वराज्याची प्रार्थना करीत बसला आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान:—** रोहिणी नक्षत्रांतच मृगाची शीतळाई येऊं पहात आहे. कोठें कोठें अर्धा पाऊण इंचाची खंडवृष्टी ही झाली. सार्वजनिक आरोग्य चागलें सुधरत आहे.

रा. रा. विनायक सीताराम देव सब जज वाशीम यांस आकोले येथें बदलण्यांत आलें आणि रा. रा. सयद अलाई हसन सबजज यांची रजा संपतांच त्यांस वाशीमच्या कोर्टावर नेमण्यांत आलें.

## नोटीस

रा. रा. तुकाराम गंभीरजी पाटील राहणार पेलकवडी पोष्ट दाहिहांडा यांसः—

खालीं सही करणार नोटिस देतो कीं, मी तुमची शेतें सर्वे नं. ४९।१०।९१ हीं पांच वर्षें तोंडी पद्यानें वहितीस केली होती. त्याबद्दल मी व माझा भागीनदार नामदेव तुकाराम यांनीं मिळून तुह्माला १ वर्षाचा भाडेपट्टा करून दिला होता. व पुढें चार वर्षें तीं शेतें तुह्मी आह्मालाच देऊं असें कबूल केले होते. त्याप्रमाणें ही शेती एक वर्ष आह्मी वाहिली. व ४ वर्षे वाहणें आहे. या पहिल्या सालच्या पिकाबा १० खंडी कापूस दरखंडी १०० रु. प्र. व १९० दीडशे रुपये बाकी आणिं रोख्या बा ६० साठ रुपये असे आह्मी तुह्माला दिले. येणें प्रमाणें तुह्मास १२१० बाराशे दहा रुपये पोंचले आहेत. आतां तुह्मी आपला करार खोटा करून सदरहु शेती दुसऱ्यास दिल्याचे कळतें. सबब कळवितों माझी शेती मलाच वहावयास मिळावी. आमचे पैशाचा हिशेब करून तुमचे राह तील तर तुह्मी घेऊन अगर आमचे फिरतील तर आह्मास देऊन आमचे पट्टे व दस्तैवज परत करावे. शेतीचा पट्टा नवीन करून ध्यावा. असें ८ दिवसांत न केल्यास योग्य ती तजवीज केली जाईल. कळावे ता० १।६।१७ इ.

सही

पुंडलीक भवानी पाटील द. खुद

नो० नं० २४२

## नोटीस

रा. रा. अमृता वा मेसाजी पाटील दु. बटवाडी बु॥ तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार गोविंदा वा शिवाजी पाटील यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मजला अमृता वा नारायण गावंडे राहणार बटवाडी यानें आपला मौजे बटवाडी बुा येथील शेत सर्वे नंबर ८१ पोट हिस्सा नंबर ४ एकर १० गुंठे ३९ आकार रु. २०८१४ सालीम रुपये २२८३ अक्षरी बावीशे त्र्यायशी ता १९-५-१७ इसवी रोर्जी खरीदी देऊन खरिदीखत ता. २१-५-१७ इसवी रोर्जी करून नोंदून देण्याचे कबूल करून एक आण्याचा स्टांप लावून करारनामा लिहून दिला. ही गोष्ट तुह्मास माहीत असून वॉर लोनची वर्गणी वसूल करण्यास गेलो असतां माझे पश्चात तुह्मी अमृता वा नारायण गावंडे यांस भुलथाप देऊन त्याजकडून तुह्मी त्याच तारखेस सदर्हू नंबर खरिदी घेऊन खरिदीखत लिहून नोंदून घेतले. हे तुमचे करणें बरोबर नाहीं. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी जरी ते शेत खरिदी घेतले. तरी सदर्हू नंबरचे खरिदीबद्दलचा करार पूर्वी माझेशीं झाला असल्यामुळें तुमचे खरिदीखत रद्द आहे. तुह्मी त्या शेतांत किस्तगारी वगैरे करण्यास जाऊं नये. गेल्यास मजला कोर्ट मार्फत योग्य तजवीज करावी लागेल.

का... ...र्च येईल तो तुह्मास ...लेला बंगला, आट ... नोटिशीनें ...वान पुढें वर्णन केलेल्या स्थावर ...वार्दींचा व प्रतिवार्दींचा जो हक्क, ...व हितसंबंध असेल तो विकावयाचा ...नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर यानीं तारीख १ आक्टोबर १९१४ रोर्जी वरील दाव्यांत जो कॅसेंट हुकुमनामा दिला

## नोटीस.

श्री. मोताबाई जवजे किसन गोपाळ चांडक राहणार आडगांव ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, ता. ५ जून १९१४ रोर्जी तुह्मी जिन्नगीसंबंधानें फारकत दिली आणि मी तुह्माला तुमच्या अन्नवस्त्रासंबंधानें व्यवस्थापत्र लिहून दिलें. तसेंच तुमच्या दागिन्यांची किंमत १५० रुपये उक्ती ठरवून घरचे दागिने मी घरींच ठेविले आणि १५०० रुपयापैकीं २०० रुपये रोख देऊन परभारें तुमच्या विश्वासांतला मंगलचद अनंतराम याचा १३०० रुपयांचा चुकता हवाला तुह्मी कबूल केला आणि त्यावरून मी मंगलचंद याला पावणे आठ आणे व्याजाची चिठ्ठी लिहून दिली. आतां तुह्मी फिर्याद करणार आहा असें बोलता तेव्हां माझा नाइलाज आहे. तुह्मी मंगलचद कडील माझी १३०० रुपयांची चिठ्ठी आणून द्यावी. व सव्याज रुपये घेऊन जावें. असें मी तुह्माला ह्मटलें तर तुह्मी तसें केलें नाहीं. ह्मणून मी ८ दिवसांची मुदत देऊन तुह्माला तो व्यवहार पुरा करण्याविषयीं ही नोटीस देतो. ८ दिवसानंतर मी परभारें तिऱ्हाइती ह्मणजे ‘मेघराज गंगाराम’ यांच्या दुकानावर सर्व रक्कम जमा ठेवितो. तुह्मी व मंगलचंद या दोघांनीं मिळून माझी चिठ्ठी परत देऊन रक्कम न्यावी. या उपर तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास मी त्याच्या खर्चाबद्दल व पुढील व्याजाबद्दल जबाबदार नाहीं.

तुह्मी फारकतीप्रमाणें हक्कनोंदणीच्या कचेरींत योग्य जबाब देऊन तो ही निकाल करून टाकावा. तसें करण्यास चुकाल तर मुलकी व दिवाणी कोर्टाचा खर्च तुमच्याकडून वसूल करण्यांत येईल. कळावें. ता. १ जून १९१७ इसवी

सही

रामचंद मदनचंद दस्तुर खुद

नो नं. २४४

## नोटीस

रा. रा. मंगलचंद अनंतराम मारवाडी रा. पिंपरी तलुके आकोट

यांसः—

तुह्मी माझ्या बद्दलचा १३०० तेराशे रुपयांचा आषाढ वद्य १२ सं. १९७१ मारु रोर्जी हवाला घेतला पण श्री मोताबाईच्या ह्मणण्यावरून तुह्मी हवाल्याचे रुपये पोचते केले असें दिसत नाहीं. तर उभयतांनीं येऊन आठ दिवसांत रक्कम चुकती न्यावी किंवा त्या मुदती नंतर ‘मेघराज गंगाराम’ दुकान आडगांव यांच्या येथून परभारें रक्कम न्यावी. फिर्याद वगैरे केल्यास त्याबद्दल मी जबाबदार नाहीं कळावें. ता. १-६-१७

सही

रामचंद मदनचंद दस्तुर खुद

नो० नं० २४५

...व पितळ... घराचे भाड्य...

## नोटीस.

अकोला म्यु. कमेटीनें ता. ३०-५-१९१७ रोर्जी असा ठराव केला आहे कीं ज्या लोकांकडे ता. ३१-३-१९१७ पर्यंतची कमेटीची बाकी उरलेली आहे त्यांनीं ती एक महिन्याचे आंत देऊन टाकावी. असें न केल्यास त्यांजवर दरसाल दरशेंकडा १२॥ रु. प्रमाणें व्याज, दंड ह्मणून आकारण्यांत येईल. सर्व लोकांस जाहीर व्हावें. ता. १ माहे जून १९१७ इसवी

T. N. Bapat
ओनररी सेक्रेटरी
म्यु. क. अकोला.

नो. नं. २४६

पैसा मिळविण्याची नवी विद्या शिका.

## क्रोमोपॅथी इंस्ट्रक्टर

अर्थात्

## वर्णजलचिकित्सा—शिक्षक.

ज्या दिव्यौषधीच्या प्रभावानें आज युरोप, अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सुद्धां नाना तऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत, त्या अपूर्व विद्येची सप्रमाण व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येकानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडावा! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या! पैसा व कीर्ति मिळवा. किं. अवघी ४८, व्ही. पी. नें ४१०. जरूर मागवाच.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पुणें सिटी.

नो. नं. १९९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवशांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाल, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख ११ माहे जून सन १९१७ ई० [ अंक २३

विक्री संबंधी

## जाहीरात.

**( आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान स्थावर जिनगी संबंधानें विक्री .)**

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई.

मिळणे ..ओ. ओ. सी. जे.

दिवाणी दावा नंबर ३१९ सन १९१४

१ जेमशेटजी हारमसजी बिलीमोरिया पार्शी

२ हरमसजी जमशेटजी बिलीमोरिया पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू तीघेही भागीदारींत मर्चंट्स् ब्यांकर्स व कामिशन एजंटस् ह्मणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच. बिलिमोरिया आणि को, दुकानचा ठिकाणा अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई वादी

विरुद्ध

१ ट्रीमकदास सदाराम

२ फोजमल गुलाबचंद

३ रामगोपाळ बिहारीलाल सर्वजण हिंदू असून मर्चंट व श्राफ असुन त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी; मुंबई येथें मोतीलाल तेजमल या नांवानें आकोला येथें ट्रीकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणीं निरानिराळ्या भिन्न नांवाखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादीनें दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार यांजकडून बुधवार ता० २० जून १९१७ रोजीं २ प्रहरीं ४॥ वाजतां ( स्टँडर्ड टाइम ) मुंबई येथील मेडो स्ट्रिट मधील नंबर ९२ येथें असलेल्या लिलावाच्या रूम्समध्यें लिलाव करण्यांत येईल.

वऱ्हाडांतील आकोला तहासिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें असलेला बंगला, आॅट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगीत वादींचा व प्रतिवादींचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई यांनीं तारीख १ आक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यांत जो कॅंसेंट हुकुमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

### विक्रांच्या जिनगीचें वर्णन.

मौजा ताजनापूर ता० आकोला जि० आकोला येथें जी जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं० ९ चा असून अदमासें २८३१ क्षेत्रफळ आहे. त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले यासुद्धां याची चतुःसीमा येणें प्रमाणें—

पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता.

पश्चिम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा—नदी

दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला—नार्थ कोट जीनिंग फॅक्टरी.

उत्तरेला किंवा उत्तरेच्या भागाला—सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी लागणारी माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं खालीं सही करणार यांच्या आफीस रूम्स नंबर ९२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथें किंवा वादी तर्फेचे अटर्णी मेसर्स श्रॉफ अॅन्ड दिनशा यांच्याकडे त्यांच्या ऑफिसांत नं. ३७९ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथें चौकशी करावी.

मुंबई ता. १९ मे १९१७ } **गांधी अॅन्ड को लिलाव करणार**

नो. नं. २९९

### नोटीस.

नोटिस बेशमी ताराचंद बाबुलाल आगरवाले व हिराबाई जवजे नथुलाल आगरवाले उभयतां रा. उमरावती मच्छीसात

यांनाः—

खालीं सह्या करणारा कडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे वडील छोटुलाल व चुलते बाबुलाल नथुलाल व विठुलाल याची वडीलोपार्जित स्थावर व जंगम इस्टेट होती. आमचा बाप वारला त्यावेळीं आह्मी अज्ञान होतो. तेव्हां तुह्मी आमचे आईसच आह्मांस हाकून देऊन ती इस्टेट तुह्मी बळकावून बसले. व एकटेच अन्यायानें उपभोग घेत आहा. आमचा बाप वारला त्यावेळेस कोणाचे देणें नव्हते व कोणाकडून घेणें ही नव्हतें. आमचा बाप वारला तेव्हांपासून आमचे व आईचे पालन पोषण आमचा आजा नामें किसनलाल बकुलाल आगरवाले यांनीं केले तुह्मी आह्मास खर्चेपास आजपावेतों कांहीं एक पाठविले नाहीं. स्थावरमाल शेतें व घरें, चांदी सोन्याचे दागिने वगैरे व पितळेचे तांब्याचे भांडें वगैरे व शेतीचे व घराचे भाड्याचे उत्पन्न पंधरा वर्षांचे झाले ते यांतील एक तृतीयांष हिस्सा आह्मास तुह्मी नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत तुह्मी आमचे ताब्यांत देऊन टाकून आमची पावती घेऊन जावी. तसे न केल्यास आपलेवर कायदेशीर दावा करून कोर्ट खर्चासुद्धां स्थावर व जंगम इस्टेट आह्मास द्यावी लागेल. सं. १९७३ मिती जेष्ठ शुद्ध १४ ता. ४-६-१७ इ॥ द. गोविंद बळवंत वारकरी राहणार खामगांव

सह्या

१ शिवचरण छोटुलाल आगरवाले रा. उमरावती हल्लीं मु खामगांव दस्तुर खुद

१ मन्नुलाल छोटुलाल आगरवाले अ. पा. क. शिवचरण छोटुलाल रा. उमरावती हल्लीं मु. खामगांव द. गोविंद बळवंत वारकरी

नो. नं २९६

### जाहिर नोटीस

( १० रुपये बक्षीस. )

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, माझा भ्रतार नामें उदेभान नरसाजी पातोंडे धनगर राहणार किनखेड तालुका आकोट वय अंदाजा ३० रंग गोरा, बांधा मध्यम, ठेंगणा दिसायला नीटनेटका, गोल चेहरा डोळ्यावर भजन करणारा असा असून तो आज ३ वर्षें परागंदा झालेला आहे. किनखेर्डे, बेलुरा, बारशीटाकळी, जामोद, जळगांव, इत्यादि आप्तसोयऱ्यांच्या गांवीं तपास केला तर कोणालाही त्याचा पत्ता नाहीं. चुलत सासरा रामजीबोवा धनगर यांच्याकडे तो राहत होता पण त्यांच्याकडे देखील त्याच्या अस्तित्वाबद्दल वार्ता नाहीं. आमचा त्याचा भांडणतंटा काहींच नसून गोडीगुलाबीनें संसार चालला होता. मला माहेरी पोचती केल्यानंतर आज तीन वर्षांच्या कालांत ते मरण पावले असावे असा सर्वजणांचा अंदाजा आहे. गारिबीमुळें कोणीच नीटशी वास्तपुस्त करीत नसे. जर कोणी मला माझ्या भ्रताराचा पत्ता लावून देईल तर मी त्याबद्दल १० रुपये बक्षीस देईन. इतक्या उपर जर तो मरण पावला असा जातगंगेनें निर्णय दिला तर मी दुसरा घरठाव करीन. ह्मणजे मी सरकारची व जातीची गुन्हेगार न होतां योग्य प्रकारें दुनियेदारीला लागेन ता. ४-६-१७

सही

गिरजी मर्द उदेभान पातोंडे धनगर निशाणी बांगडी

c/o श्रावण निंबाजी धनगर राहणार टाकळी खुजबाडे ता. बाळापूर

नो. नं. २९७

### नोटीस.

नोटिस बेशमी रामचंद्र सटू भटकर रा. आंबोडे पो. नांदूरा ता. खामगांव

यांसः—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, नामदेव नारायण भटकर याची आई माझे बापानें गंधर्वानें केली. तेव्हां नामदेव हा सरासरी ३ वर्षांचा होता. त्याची पूर्वींच्या घरची कांहींच इस्टेट त्याच्या जवळ नव्हती. गंधर्व झाल्यापासून त्याचे सर्व तऱ्हेचें पालन पोषण माझे बापानें केले असून त्याचें लग्नही त्यानेंच केले. माझा बाप मरून आज सरासरी ८।९ वर्षें झालीं. माझ्या बापाच्या मरणानंतर २ वर्षांनीं माझी ही गंधर्वाची सावत्रआई नामदेव व माझे बापापासून झालेला मुलगा निनू हीं माझ्यांतून वेगळीं राहिली. त्यांनीं जमीन एकत्रच ठेविली होती. आणि तींतून आलेलें उत्पन्न मी त्यांना वाटून देत असे. पुढें नामदेव व निनू यांची आई आज २ वर्षांपूर्वीं मरण पावली. तेव्हां पासून निनू व नामदेव हे एकत्र होते. त्यांत निनू हा अज्ञान आहे. ह्या अज्ञानाच्या इस्टेटींतून नामदेव यानें आपल्या नांवानें मौजे नारायणपूर ता. मलकापूर येथें शेत खरीदी केलें. ही खरीदी त्यानें गंधर्वाकरितां केली होती. व ती होऊन आज वर्ष सव्वा वर्ष झालें. हल्लीं नामदेव हा एक महिन्यापूर्वीं मरण पावला. तेव्हां पासून निनूचें पालन पोषण मी करीत आहे.

नामदेव याचे नांवानें खरीदी झालेल्या शेतावर तुह्मी आपला वारसाचा हक्क सांगून तें भाडेपट्ट्यानें तुह्मी दुसऱ्यास दिलेलें आहे. परंतु सदरहू शेत निनूचे इस्टेटींतून घेतलेलें असल्यामुळें त्यावर तुमचा वारस या नात्यानें मुळींच हक्क पोचत नाहीं. सदरहू शेताची आजपर्यंतची सर्व किस्तकारी आह्मी केलेली आहे. तेव्हां तुह्मी तुमचा भाडेपट्टा रद्द समजून आह्माला शेत वगैरे पेरण्यास मुळींच हरकत करू नये. केल्यास कायद्याप्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. आणि तसें केल्यास कोर्टाचा खर्च ह्या नोटिशीसह तुमचे जवळून भरून घेण्यांत येईल. निनू हा हल्लीं १०-११ वर्षांचा असून त्याजवर कर्ज वगैरे मुळींच नाहीं. आणि मी त्याचा अज्ञानपालक आहे. कळावें.

सहीची निशानी

आंगठा रावजी रामू मुन्हे रा. निमगांव याचा खुद

नो. नं. २९८

# काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९


---

## नोटीस

ती. गंगा भागीरथी लक्ष्मीबाई भ्रतार पांडुरंग अच्यूत वैरागकर रा० मेहेकर तालुके मेहेकर जि० बुलडाणें

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझे तीर्थरूप पांडुरंग गोविंद वकील हे ता० १७-१-१७ रोजीं कैलासवासी झाले. तेव्हां पासून मी व माझा पुतण्या श्रीधर रामचंद्र हे दोघे त्यांचे संपत्तीचे वारस जहाले आहे. वरील श्रीधर हा अज्ञान आहे व त्यावा कायदेशीर पालनकर्ता मी आहे. सदरहू अज्ञान श्रीधर यांस मी आपले जवळ ठेवण्यास फारच खुशी आहे परंतु आपली इच्छा त्यानें माझे जवळ राहू नये अशी आहे. त्या कारितां मुद्दाम या नोटिशीनें तुम्हांस कळवितो कीं, सदरहू अज्ञान श्रीधर रामचंद्र याचे हिस्याची वाटणी करून घेण्यास ता० २४-६-१७ रोजीं आकोल्यास यावे अगर तुमचे मार्फत कोणी शहाणा मनुष्य तुमचे मुखत्यारपत्र देऊन त्यास हजर ठेवावे. असें तुमचे कडून न झाल्यास मी कोर्ट मार्फत अगर पंचामार्फत वाटणी करून घेईन. व वाटणी करण्यास जो खर्च येईल तो मी तुमचेपासून वसूल करीन. तुम्ही लौकर न आल्यास अज्ञानाचे फारच नुकसान होत आहे व होईल. आजपर्यंत वडील अज्ञानाचे पालन कर्ते होते परंतु ते वारल्यापासून तुमचें मन माझे विषयीं शुद्ध नसल्यानें अज्ञानाचे पालन करण्याचे मी नाकारिलें आहे व त्याचे इस्टेटीचा हिशेब ही समजाऊन घेत नाहीं व घेणार नाहीं या करतां तुम्हांस नोटीस दिली आहे. जसें तुम्हास योग्य वाटेल तसें करावें. कळावें. ता० ७-६-१७ इ.

सही

नारायण पांडुरंग दस्तुर खुद

नो. नं. २९९

---

## नोटीस

रा० रा० गणेश घनश्याम अष्टेकर रा० देऊळगांवराजा ता० चिखली जि० बुलडाणें

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही मजला ता० २१-५-१७ रोजीं वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली ती अगदीं खोटी दिली. मी तुम्हाला माझे स्वतःचे इस्टेटीची तुम्हीं या वर्षी विनाकारण उठाठेव केली व त्यांत माझे नुकसान झाले असें दिसल्यावरून माझे स्वतः संबंधीं काम व माझे नांवें व्यवहार करू नये म्हणून मी तुम्हास माझे नोकरींतून कमी केलें होते. त्याचा फायदा घेऊन तुम्ही सर्व प्रकारचे जबाबदारींतून निसटून अज्ञानाचें व आकोला दुकानचे कागदपत्र तुमचे पश्चात मी आपले जवळ ठेविले असे म्हणता ते सर्व साफ खोटें आहे. सर्व कागदपत्र तुमचे जवळ आहेत व किल्या ही तुमचेच जवळ आहेत "मी निजलो असतां किल्या तुम्ही मला दिल्या' असें तुम्ही मागाहून पत्र ही पाठविलें' आहे व कागदपत्र कोठे आहेत हे विचारले असतां जबाब देत नाहीं. तरी तुम्ही ता० १९।६।१७ रोजीं अज्ञान श्रीधर रामचंद्र याचे हिश्याची वाटणी करण्याकरितां त्याचे अजी तर्फे जो कोणी मनुष्य येईल त्याजला तुम्ही ती० अण्णासाहेब कैलासवासी झाल्या दिवसापावेतों व पुढील सर्व हिशेब, वहीखाते दाखविण्यास येथें हाजर व्हावे. नाहीं पेक्षां तुमचेवर रीतीप्रमाणें फौजदारी काढावी लागेल. तसें करूं नये. आपला लोभ व नाते कायम ठेवावे. दुर्बुद्धी धरू नये. तसे केल्यानें तुमचें कल्याण होणार नाहीं. म्हणून मुद्दाम ही नोटीस देणें भाग पडले आहे कळावे तारीख ७।६।१७ इ.

सही

नारायण पांडुरंग आळशी द. खु

नो. नं. २६०

---

## नोटीस

रा. रा. अयोध्यावल्लद इश्रीलाल परदेशी हलवाई राहणार कारंजा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, कसबे अजमपूर येथील सर्व्हे नंबर ५ मधील गंगू सोनारीणवाले घर तुम्ही तुकारामच्या बापाकडून घेतलें आहे. पण ही जिन्नगी तुकाराम वा नागो या अज्ञानाची असून त्याचा पालनकर्ता बाप मेल्यामुळें मी त्याचा चुलता पालनकर्ता आहे. ही नोटिस पोचल्या तारखेपासून १५ दिवसानंतर आमचें घर आम्हाला खालीं करून द्यावें. या पूर्वीं तोंडी तुम्हास सांगितलें तर तुम्ही इनकार केला म्हणून ही नोटीस दिली आहे. वरील मुदतीनंतर घर खालीं करून देण्यांत येणार नाहीं तर कोर्ट मार्फत ताबा घेईपर्यंत तुम्हाला नुकसानी दाखल दरमहाचे दरमहा १० रुपये पडतील व त्याशिवाय कोर्ट खर्च ही पडेल कळावें. ता. ९-जून १९१७

सही

तुकाराम वा नागो अज्ञान पालन करणार चुलता सखाराम वा महादाजी भोएर रा. कारंजा द. खु.

नो. नं. २६१

---


वऱ्हाडसमाचार

जेष्ठ वद्य ७ पिंगल संवत्सर १८३९


## पब्लिक सर्व्हिसेस कामिशन आणि लोकमत.

हिंदुस्थानच्या कायदेकौंसिलांतले लोकनियुक्त प्रतिनिधींच्या कर्तव्यमार्गांत अनेक अडचणी असतां ही ते आपणावरची जबाबदारी ओळखून जनतेविषयींचें आपलें कर्तव्य कसें स्पष्टपणें, निर्भीड रीतीनें आणि जनतेच्या हिताकडे दृष्टी ठेवून करूं लागले आहेत हें गेल्या वर्ष दोन वर्षांतल्या त्यांच्या चळवळीवरून कोणास ही दिसून येईल. व्हाइसराय साहेबांच्या कायदेकौंसिलांतल्या १९ लोकनियुक्त सभासदांनीं सरकारकडे पाठविलेलें सुधारणांचें योजनापत्रक, मद्रासच्या लोकनियुक्त सभासदांनीं आपापल्या सोयीप्रमाणें अध्ययनाचे विषय वाटून घेण्याची व त्या विषयाचें संपूर्ण अध्ययन करून मग त्या संबंधानें कौंसिलांत चर्चा करण्याची व ठराव वगैरे आणण्याची केलेली योजना यांच्या प्रमाणेंच संयुक्त प्रांतांतल्या लोकनियुक्त सभासदांनीं पब्लिक सर्व्हिसेस कमिशनच्या रिपोर्टावर संयुक्त विचारानें टिका करून लोकमताचे प्रतिनिधि या नात्यानें ती सरकारकडे पाठविण्याचा केलेला उपक्रम प्रगतीचा निदर्शक अतएव सर्वथा अभिनंदनीयच म्हटला पाहिजे. देशांतल्या वर्तमानपत्रांच्या द्वारें हिंदुस्थानचें लोकमत सरकारास कळतच असतें. पण वर्तमानपत्रांतल्या मताला लोकमत म्हणून समजण्यास अनेक वेळां सरकारी अधिकारी तयार नसतात. पण २८ पैकीं २१ हिंदी कौंसिलरांनीं आपल्या सह्यांनीं जें संयुक्त टिकापत्र सरकाराकडे पाठविलें आहे तें लोकमताचें निदर्शक नाहीं असें म्हणण्याची छाती अंमलदाराशिवाय इतर माणसाची कदापि होणार नाहीं. इतर प्रांतांतले कौंसिलचे हिंदी सभासद ही संयुक्त प्रांतांतल्या आपल्या बंधूंचें अनुकरण करतील अशी आम्हांस आशा आहे. प. स. कामिशनचा रिपोर्ट सर्व तऱ्हेनें प्रतिगामी आहे याला प्रत्यक्ष प्रमाणें त्या रिपोर्टाच्या शिफारशींतच आहेत. हिंदुस्थानची राष्ट्रसभा व मुस्लीम लीग यां सारख्या पुढारी व जबाबदार संस्था स्वराज्यांचे हक्काची मागणी करीत असतां व ही त्याची मागणी वाजवी आहे, फक्त आजच एकदम संपूर्ण हक्क द्यावयाचे कीं हप्त्या हप्त्यानें द्यावयाचे येवढाच काय तो प्रश्न आहे असें खुद्द जबाबदार सरकारी मुत्सद्दी व अधिकारी म्हणत असतां या कामिशनानें लोकांच्या मागणीस दुजोरा न देतां उलट हिंदुस्थानाबद्दल अत्यंत अनुदार दृष्टि ठेवून कमिशननें आपल्या शिफारशी केलेल्या आहेत. १८८६ च्या प. स. कामिशनानें सिव्हिलसर्व्हिस पैकीं १०८ जागा हिंदी लोकांना द्याव्या अशी सूचना केली होती; हा आंकडा हिंदुस्थान सरकारनें प्रत्यक्ष व्यवहारांत ९३ पर्यंत उतरविला. स्टेट सेक्रेटरी साहेबानीं तो ६१ पर्यंत मर्यादित केला, आणि सध्याच्या कमिशनानें ही जवळ जवळ तोच आंकडा कायम ठेवला. ... कमिशनानें वयाची यत्ता २२-२४ ही ठरविली होती, ती या कमिशनानें १७-१९ केली. हिंदी व युरोपियन यांना बसविण्यामधील विषमतेचें शल्य काढून टाकावें असें शहाणे लोक म्हणतात. हें कमिशन तें शल्य ज्यास्तच खोल खुपसण्याचा प्रयत्न करतें. हिंदुस्थानचे लोक एक्झिक्युटिव्ह कौंसिलमध्यें उत्तम प्रकारें काम करून दाखवीत आहेत ही गोष्ट लॉर्ड मिंटो सारखे व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी साहेबासारखे वरिष्ट अधिकारी उघडपणें कबूल करीत असतां पोलीस सर्व्हिस, एज्युकेशन सर्व्हिस, रेल्वे, सर्व्हे, इ. खात्यांतल्या वरिष्ठ प्रतीच्या जागांस हिंदी लोक पात्र झाले नाहींत, व त्या जागा युरोपियनांच्याच हातांत पाहिजेत असें कमिशन म्हणतें! सारांश हिंदी लोकांची पात्रता वाढेल तसतशा मोठाल्या दर्जाच्या जागा त्यांना देण्याचें जें आश्वासन महाराणी व्हिक्टोरिया यांचे कारकीर्दींत गंभीरपणानें देण्यात आलें त्या आश्वासनाच्या अगदीं उलट वर्तन करण्याची शिफारस हें कामिशन करतें. याहून हिंदुस्थानच्या आकांक्षांस व ब्रिटिश सरकारनें जाहिर केलेल्या राजनीतीच्या धोरणास प्रतिगामी असें आणखी काय असणार? आणि अशा रिपोर्टावर ना. चौबळासारखे आमचे हिंदी अधिकारी मुकाट्यानें सही करतात, यापेक्षां त्यांच्या 'होय बा' पणाबद्दल दुसरे सर्टिफिकेट कोणतें पाहिजे? सुदैवानें हिंदी सभासदांची बाजू राखणार व हिंदी लोकांच्या मागण्या किती रास्त आहेत तें सप्रमाण दाखविणारे दुसरे एक हिंदी मेंबर ना. न्या० रहीम हे कमिशनमध्यें होते म्हणून हिंदी लोकांची अब्रू राहिली. न्या० रहीम यांनीं या रिपोर्टाला निराळें जोडलेलें आपलें मत पाहिलें म्हणजे त्यांना हिंदी लोकांच्या अंतरंगाचें किती उत्कृष्ट ज्ञान आहे तें चांगलें कळेल. जेथें तशीच विशेष जरूरी असेल तेवढ्या पुरते युरोपियन ऑफिसर नेमण्यास हरकत नाहीं. पण सामान्यतः वर्णभेद अगदीं उपयोगाचा नाहीं; हिंदुस्थानांतल्या जागांकारितां होणाऱ्या नेमणुका हिंदुस्थानांत व हिंदी लोकांतूनच झाल्या पाहिजेत; कांहीं अपवादात्मक जागां वरच्या नेमणुका कांहीं विशेष कारणांसाठीं विलायतेंत व हिंदुस्थानांत अशा दोन्ही देशांत व्हाव्या; व त्या करताना सुद्धां गोरे व काळे यांच्या संख्येचें प्रमाण कांहीं ठराविक असावें हें न्या. रहीम यांचें मत संयुक्त प्रांतांतल्या लोकनियुक्त सभासदांच्या मताशीं जुळत आहे. ना० चौबळ म्हणतात कीं कमींत कमी इतक्या जागा हिंदी लोकांना देण्यांत येतील असें सरकारानें ठरवून टाकावें. पण कमींत कमी ठरविलेलें प्रमाण हेंच सरकारी आधिकारी ज्यास्तींत ज्यास्तींत धरून चालतील व हिंदी लोकांच्या आकांक्षेचा अंकुर छाटून टाकतील हें संभवनीय असल्यामुळें ही तडजोड सं-प्रांतांतल्या सभासदांना अगदीं अमान्य आहे

हें सांगावयास नकोच. कमिशनच्या इतर शिफारशी संबंधानें ही लोकनियुक्त सभासदांनीं असेंच आपलें प्रतिकूळ मत निर्भीडपणें व्यक्त केलें आहे. पण त्या सर्वांचा उल्लेख करण्यास आमचेपाशीं पुरेशी जागा नसल्यामुळें आह्मी त्या संबंधानें मौन्य धारण करतों.

पंजाबच्या मॉस्लेम लिगनेंही संयुक्त प्रांताच्या लोकनियुक्त सभासदांचें अनुकरण करून प. स. कमिशनच्या रिपोर्टासंबंधानें आपलें विरुद्ध मत सरकारला कळविलें आहे. हें एकंदर हिंदुस्थानच्या मॉस्लेम लीगच्या व कांग्रेसच्या मताशीं बहुतांशीं जुळतें आहे हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. हिंदी लोकांस दिलेलीं आश्वासनें व आतांपर्यंतचें ब्रिटिश सरकारचें प्रागतिक राज्य धोरण यांना मागें पाऊल घेण्यास सांगणाऱ्या कमिशनच्या शिफारशींचा तीव्र व जोरनें मिळणें करण्याचें कर्तव्य मॉस्लेम लीगनें ही उत्कृष्ट प्रकारें बजाविलें आहे, यावरून कमिशनच्या शिफारसी हिंदुस्थानच्या हिंदु लोकांस जितक्या अन्यायाच्या व प्रतिगामी वाटत आहेत, तितक्याच त्या सुशिक्षित व विचारी मुसलमान पुढाऱ्यांना ही निषेधार्ह वाटत आहेत हें स्पष्टपणें व्यक्त होतें. कमिशनच्या किरकोळ बाबतींतल्या शिफारसी सरकारला ग्राह्य वाटोत कीं त्याज्य वाटोत, पण राजनीतीच्या व राज्यकर्त्यांनीं दिलेल्या आश्वासनाच्या मुळावरच आघात करणाऱ्या वरील गोष्टींत तरी कमिशनच्या शिफारशी आह्मांस मान्य नाहींत असें सरकारानें स्पष्टपणें आतांच जाहिर करून लोकांच्या मनाला या कमिशननें प्राप्त झालेली अस्वस्थता एकदम दूर करणें अत्यंत अवश्य आहे असें जें आह्मांस वाटत आहे तें आह्मी प्रांजळपणें सरकारापुढें मांडतों व यावर योग्य विचार होऊन आमची सूचना मान्य करावी अशी आह्मी त्यांस नम्रपणें प्रार्थना करतों.

## सक्तीच्या शिक्षणाची योजना.

सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या मुंबई शाखेचे सभासद मि. ठक्कर यांनीं सक्तीचें शिक्षण मुंबई शहरांत सुरू करण्यासंबंधाची एक व्यावहारिक योजना तयार करून ती प्रसिद्ध केली आहे. ती परिस्थितीच्या मानानें कमजास्त फेरफार करून इतरत्र ही अमलांत आणतां येण्यासारखी असल्यामुळें ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्या व शिक्षणाधिकारी यांचें लक्ष तिच्याकडे जाईल अशी आह्मी आशा करतों. आज विशेष जरूरी मुलांच्या शिक्षणाची असल्यामुळें शिक्षणाबद्दलची सक्ती प्रथम मुलांवर व नंतर क्रमाक्रमानें मुलींवर केली पाहिजे. ही सक्ती कोणत्या प्रकारें व कोणत्याद्वारें करणें सोयीचें होईल याचा ही विचार सदर योजनेंत केला आहे. प्रथम शाळेंत जाण्यास ज्यांना वयोमानानें पात्रता येते अशा मुलांची खानेसुमारी घेतली पाहिजे. नंतर म्युनिसिपालिट्या सारख्या संस्थांचें उत्पन्न व त्यांच्याकडून शिक्षणाप्रीत्यर्थ होत असलेला खर्च यांचें प्रमाण काढून तें योग्य आहे कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. मुंबई शहर व इतर शहरें यांची तुलना केली तर शिक्षणाच्या खर्चाचा बोजा मुंबई म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नाच्या मानानें फारच कमी—म्हणजे इतर ठिकाणच्या सरासरी एकतृतीयांश—आहे असें दिसतें. ज्या मुंबई म्युनिसिपालिटीनें इतर संस्थांना अनुकरणार्ह असा कित्ता घालून द्यावयाचा तिनें डेनमार्क, नार्वे सारख्या मागसलेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या तर राहोच, पण हिंदुस्थानांतल्या सुद्धां इतर शहरांच्या मागे राहावें ही खरोखर शरमेची गोष्ट आहे. डेन्मार्कमध्यें एलसिनोर म्हणून एक लहानसें शहर आहे. तेथील वस्ती सारी १४००० ची असून तेथील म्युनिसिपालिटी आपल्या उत्पन्नाचा एक षष्ठांश भाग शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करते. नार्वे देशांत व्हॉस येथील म्युनिसिपालिटी जवळ जवळ उत्पन्नाचा एक चतुर्थांश शिक्षणाच्या कामीं लावते; पण आमच्या देशांतली मुंबई, कलकत्ता मद्रास वगैरे जीं अग्रगण्य शहरें तेथील म्युनिसिपालिट्या आपल्या उत्पन्नाचा एक दशांश सुद्धां लोक शिक्षणासाठीं खर्च करीत नाहींत. मुंबई म्युनिसिपालिटी आपल्या उत्पन्नापैकीं शें. ४-२ फक्त शिक्षणाच्या कार्याकडे लावीत आहे ! शिक्षणाचे कामीं इतका कंजुषपणा करून हिंदुस्थानांतला अज्ञानांधकार लवकर दूर होईल अशी आशा मुंबईचे नागरिक पिते कशाच्या आधारावर करीत असतील तें त्यांचें त्यांनाच माहित! शिक्षण आणि आरोग्य हीं सध्याच्या काळांत तरी प्रजेला सुख प्राप्त करून देण्याचीं प्रधान साधनें आहेत. तेव्हां मि. ठक्कर यांनीं या मुद्यावर जो विशेष जोर दिला आहे तो अगदीं वाजवी आहे असें म्हटलें पाहिजे. सढळ हातानें खर्च करण्यास तयार झाल्यावर शाळांची संख्या वाढविणें, शिक्षक तयार करण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेज काढणें, व्यवहारोपयोगी शिक्षण आपल्या मुलांना शिक्षण देण्यापासून केवढा फायदा आहे हे आई बापांच्या नजरेस आणून सक्तीची तीव्रता त्यांना न भासूं देतां त्यांचें मन वळवून होतां होईल तों शिक्षणप्रसार करणें, वगैरे गोष्टी करतां येतील. या कशा कराव्या तें दाखविण्यास मि. ठक्कर यांच्या सारखे तज्ञ साह्य करण्यास तयार आहेत. ज्या म्युनिसिपालिट्यांना सक्तीचें शिक्षण आपल्या क्षेत्रांत सुरू करण्याची इच्छा व सामर्थ्य असेल त्यांनीं मि. ठक्कर यांच्या योजनेचा अवश्य विचार करावा.

## शिक्षण आणि लोकमत.

गेल्या जानेवारी महिन्यांत दिल्ली येथें शिक्षणाधिकाऱ्यांचें जें कान्फरन्स भरलें होतें त्याचा उपक्रम करतांना ना. व्हाइसराय लॉर्ड चेम्सफोर्ड साहेब यांनीं म्हटलें होतें कीं सध्याच्या युद्धानें विलायतेंतल्या लोकांचे व अधिकाऱ्यांचे डोळे उघडून सध्याच्या शिक्षणपद्धतींतले दोष काढून टाकण्याची अवश्यकता जशी त्यांना दिसली, तसाच प्रकार हिंदुस्थानांत ही घडून यावा म्हणून अशा प्रकारचें कॉन्फरन्स भरविण्याची अवश्यकता उत्पन्न झाली आहे व या कामीं लोकांचें साह्य अधिकाऱ्यांना मिळेल अशी अपेक्षा त्यांनीं त्यावेळीं व्यक्त केली होती. व्हाइसराय साहेबांनीं व्यक्त केलेल्या या धोरणाला गेल्या परिषदेंत कितीसें मूर्त स्वरूप प्राप्त झालें तें सदर कान्फरन्सचा जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून तरी नीटसें कळत नाहीं. लोकांचें साह्य एकीकडे मागावयाचें, आणि दुसरीकडे शिक्षणाविषयक महत्त्वाच्या चर्चेच्या वेळीं लोकांच्या शिष्ट अग्रणींना ही निमंत्रण करावयाचें नाहीं, तर फक्त सरकारी अधिकारी बोलावून त्यांनीं आपसांत गुजगुज गोष्टी करून सगळी व्यवस्था ठरवून टाकावयाची या दोन गोष्टींत कसा मेळ बसतो तें आह्मांस समजत नाहीं. सरकारचें शिक्षणविषयक धोरण बदलावयाचें असतें तर लोकांच्या पुढाऱ्यांना बोलाविलें असतें, पण तसें कांहीं एक आज कर्तव्य नाहीं, फक्त शिक्षणपद्धतीचा पाया मजबूत कसा करतां येईल येवढ्याच मुद्याचा विचार कर्तव्य असल्यामुळें लोकनायकांना न बोलाविलें तरी चालेल अशी लंगडी सबब व्हाइसराय साहेबांनीं त्याचवेळीं सांगितली होती. जणू काय प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, धंदेशिक्षणाचें भवितव्य, दुर्य्यम शाळांतून शास्त्रीय विषयाचा प्रवेश, स्त्रीशिक्षण, शिक्षकांचें शिक्षण, खाजगी शाळा व सरकार यांचा अन्योन्यसंबंध, कॉलेजांतील शिक्षण, युनिव्हर्सिटीचा कारभार, व उपयुक्त ज्ञानाचा लोकांत प्रसार इ. विषय अगदीं क्षुद्र होत व या प्रश्नांचा निकाल करतांना लोकमत विचारांत घेण्याचें कांहीं कारण नाहीं. लॉर्ड ब्राइस यांनीं एकदां आपल्या भाषणांत स्पष्टपणें सांगितलें होतें कीं स्विझर्लंड सारख्या लहानशा देशापेक्षां ही इंग्लंडांतलें शिक्षण हलक्या प्रतीचें आहे. याचें खरें कारण इंग्लंडांत सरकार लोकमताला द्यावा तितका मान देत नाहीं हें आहे. इंग्लंडांतल्या शिक्षणाधिकाऱ्यांना आता आपली चूक कळून आली आहे व लॉर्ड फिशर यांनीं लोकमताला अनुसरून शिक्षणाविषयक सुधारणा त्वरेनें घडून आणण्याचा संकल्प केलेला आहे. इंग्लंडच्या अनुभवानें वस्तुतः हिंदुस्थान सरकार शहाणें व्हावयास पाहिजे. लोकांची सहकारिता पाहिजे हें वाक्य तोंडानें उच्चारण्याचें मानसिक धैर्य सरकारी अधिकारी करूं लागले आहेत ही गोष्ट खरी आहे; पण उच्चार आणि आचार यांच्यांतला ३६ चा आंकडा जोंपर्यंत निघून गेला नाहीं आणि सरकारी अधिकारी व लोकांचे पुढारी यांची तोंड मिळवणी झाली नाहीं, तोंपर्यंत व्हाइसराय साहेबांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केलेली सदिच्छा नाममात्रच राहणार हें उघड आहे.

## श्री शिवाजी मंदिर व शिवाजी फंड.

ता. ५ जूनच्या 'केसरी' पत्रांत लो. टिळक यांच्या सहीनें एक जाहिर विनंतिपत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यांत म्हटलें आहे कीं पुणें येथील रहिवासी व हल्लीं नागपूर येथें वकीलीचा धंदा करीत असलेले सन्मान्य गृहस्थ रा. गणपतराव नारायण गोखले यांनीं पुणें शहरांत ' श्री शिवाजी मंदिराची स्थापना करण्यासाठीं १९ हजार रुपयांची उदार देणगी दिली असून त्यांच्या इच्छेप्रमाणें सदर रकमेची व्यवस्था करण्यासाठीं लो. टिळक, रा. नरसोपंत केळकर व प्रो० लिमये ( फर्ग्युसन कॉलेज ) या तिघांस ट्रस्टी नेमिलें आहे. या मंदिरांत शिवाजी महाराजांची मूर्ति स्थापिली जाऊन तेथें वार्षिक उत्सव व्हावे, व ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह व अभ्यास करण्याच्या सोयी करण्यांत याव्या यासाठीं अधिक रकमेची जरूरी असल्यानें रा. टिळक यांनीं द्रव्य साह्यार्थ लोकांपुढें झोळी उघडी करून ठेविली आहे. महाराजांचे स्मारक अशा स्तुत्य रुपानें व्हावें असें बहुधा प्रत्येक जणास वाटत असलें पाहिजे व ते या कार्यास सत्वर यथाशक्ति हातभार लावतील यांत आह्मांस शंका नाहीं. परंतु येथें आह्मांस थोड्या वर्षांपूर्वी महाराजांचें स्मारक करण्यासाठीं स्थापन झालेल्या शिवाजी फंडाचें स्मरण दिल्यावांचून राहवत नाहीं. ह्या फंडाची रकम आतांपर्यंत व्याजासकट किती झाली आहे, ती कोणाजवळ आहे, व तिचा विनियोग कोणत्या कार्याकडे झाला आहे किंवा होणार आहे वगैरे गोष्टीबद्दल अलीकडे वर्तमानपत्रांतून चकार शब्द सुद्धां निघत नाहीं, व त्या फंडाची रकम रा. गोखले यांच्या देणगीच्या भरीस घालून इच्छित कार्य घडवून आणण्याचे कामीं कांहीं अडचण आहे कीं काय वगैरे गोष्टींचा खुलासा सदर फंडाचे चालक व व्यवस्थापक यांचेकडे होणें अवश्य आहे. तो झाल्याखेरीज प्रस्तुत विनंतिपत्रकाचा विचार करण्यास पुष्कळ लोक अपमान साहजिकपणें करतील असा आमचा अंदाज आहे.

## येंदाचें भारत नाट्य संमेलन.

गेल्या आठवड्यांत भारत नाट्यसमाजाकडून पुणें येथें भरविण्यांत आलेलें तेरावें नाट्यसंमेलन अगदीच सामान्य प्रतीचें झालें. संमेलनाचे सेक्रेटरी रा. अनंत वामन बरवे ह्यांचे ठायीं खरी कळकळ, उत्साह, काम करण्याची हौस व नाट्याभिरुचि इ. गुण बरेच अंशानें वसत आहेत, पण संमेलनासारखीं कामें एकट्या दुकट्यानें करण्यासारखीं नसतात. या संमेलनापासून व्यावहारिक फायदा थोडा फार तरी दिसून आल्याशिवाय नाटक मंडळ्यांचें साह्य मिळावें तसें मिळणें असंभवनीय दिसतें. ज्या नाटक मंडळ्यांत थोडेबहुत शिकलेले गृहस्थ आहेत त्यांच्याच साह्यानें हें संमेलन आतांपर्यंत भरत आलें आहे. पण अशा पांच चार मंडळ्या पलीकडे या संमेलनाविषयीं बहुधा उदासिनताच दिसते. यंदाचे वर्षी तर अध्यक्षापासून तों श्रोत्यांपर्यंत उदासीनतेची छाया स्पष्टपणें पडलेली दिसत होती. दहापांच ठळक विद्वान गृहस्थ, व सात आठ नाटकमंडळ्यांचें प्रतिनिधि व बाकीचा तरुण विद्यार्थी वर्ग यांनीं किर्लोस्कर थिएटर अर्धें सुद्धां भरलें नव्हतें. अध्यक्षांचें भाषण अगदींच शुष्क झालें. महाराष्ट्र नाटक मंडळींतल्या एका नटानें नाटकपात्रांना रंगविण्याचे रंग तयार केले आहेत या गोष्टीपलीकडे सेक्रेटरीच्या रिपोर्टांत ही सांगण्यासारखें कांहीं

नव्हतें. रा. कारखानीस यांनीं अभिनयाच्या द्वारें शिक्षण देण्याची उपयुक्तता दाखविणारा एक निबंध वाचिला. रा. चिपळूणकर यांनीं अमेरिकेंकडील कसरत, व्याख्यानें, कीर्तनें, पुराणें, सर्कस, इ० अठरापगड कारखाने एकवटून फिरत्या संयुक्त नाटक मंडळ्या काढाव्या अशी एक विचित्र आणि अगदीं अव्यवहार्य अशी सूचना लोकांपुढें मांडली. प्रो. वेहेरे यांनीं नाटकाची लांबी आंखूड करून ३ तासांत प्रयोग होईल अशीं नाटकें १९५० सालीं झालेलीं दिसतील असें भविष्य कथन केलें, आणि रा. ब्रोडस या तरुण नटानें विद्यार्थ्यांनीं नाटकें कां करूं नयेत ? असा वकिली बाण्याचा प्रश्न करून अवश्य करावींत असा स्वतःच निर्णय दिला. झालें. यंदाच्या संमेलनाचें मांडवल येथें संपलें. खुद्द नाटक मंडळ्यांत संमेलनाविषयीं इतकी उदासीनता असण्याचीं कारणें रा. जोशी यांनीं स्पष्टपणें सांगितलीं; पण त्यांचा गंभीरपणानें विचार कधीं होईल तो होवो.

## महायुद्धाची प्रगति.

पश्चिम रणांगणावर पूर्वीप्रमाणेंच घनचक्कर युद्ध सुरु आहे. या आठवड्यांत दोस्त राष्ट्रांना जरी महत्वाचीं नवीं ठाणीं सर करतां आलीं नाहींत, तरी शत्रूच्या दिवसेंदिवस बळावत चाललेल्या शक्तीपुढें टिकाव धरून फ्रेंच सैन्यानें पूर्वी काबीज केलेला प्रांत शत्रूच्या हातीं जाऊं दिला नाहीं. फ्रेंच सैन्य वारंवार निकराचे हल्ले चढवीत आहे. हे हल्ले पुढें अव्याहत चालू राहिल्यास फ्रेंच सैन्यास मोठा जय मिळण्याचा संभव आहे. परंतु जर्मनांचें सर्व लक्ष वारंवार होत असणाऱ्या फ्रेंच हल्ल्यामुळें इकडेच ज्यास्त वेधलें आहे, व तो एकदा जिंकलेला मुलुख न गमावण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करील, ही गोष्ट जाणून फ्रेंचही आपली बाजू ज्यास्त बलवान् करीत आहेत.

इटालियन् सरहद्दीवर ही निकराची लढाई चालू आहे. कार्सो व ॲड्रिआटिक समुद्र या मधील प्रदेशामध्यें इटालिअन सैन्यानें आस्ट्रियन सेनेची फारच धूळदाण केली. इटालियन सैन्यापासून ट्रीस्ट फक्त तेरा मैलच राहिलें आहे. त्यानें बरीचशीं ठाणीं व गोरिझियाच्या उत्तरेकडचे मोठमोठे किल्ले हस्तगत केले व आस्ट्रियन सैन्यास पिछेहाट करण्यास लाविलें.

चालू युद्धांत प्रत्यक्ष इंग्लंडवर हल्ला झालेले प्रसंग फार थोडे आहेत. व त्या प्रसंगांत इंग्लंडचें नुकसान ही फारच थोडें झालें आहे. असाच एक प्रसंग मागील आठवड्यांत घडून आला. इंग्लंडच्या आग्नेय भागावर पंधरा विमानांनीं हल्ला केला. त्यामुळें ७६ लोक मेले व कांहीं जखमी झाले. मालमिळकतीचें ही थोडेंबहुत नुकसान झालें, या पलीकडे विशेष कांहीं घडलें नाहीं.

मागील दोन तीन आठवड्यांत रशियांतील स्थितीसंबंधानें ज्या बातम्या येत होत्या त्यांवरून तेथील परिस्थिति फार नाजुक झाली आहे असें दिसत होतें. रशिया वेगळा तह करतो कीं काय अशी भीति वारंवार वाटत होती व त्या भीतीचें निर्मूलन करण्याचा यत्नही चालू होता. परंतु तेथील स्थिति जितकी आशाजनक वाटावी तितकी नव्हती ही गोष्ट रशियांतील अंतःस्थितीचें जें वर्णन तेथील मुख्य प्रधानानें केलें आहे त्यावरून दृष्टोत्पत्तीस येत आहे. सोशियलिस्ट मजूर व सैनिक यांच्या संघानें एकच धुमाकूळ माजविला होता. या संघानें सैन्यांत बखेडे माजविले व सैनिकांस वगैरे जाण्यास चिथविलें. थोडक्यांत सांगावयाचें तर त्यांनीं सरहद्दीवर एक छोटासा तहच घडवून आणण्याचें आरंभिलें होतें. परंतु सुदैवानें ही स्थिति पालटत चालली आहे. लोक सैन्यांतील आपापल्या जागांवर पुनः रुजू होत आहेत व वेगळा तह करण्याच्या कल्पनेस अजीबात फांटा मिळाला आहे. मध्यंतरीच्या या गडबडीमुळें जरी रशियास शत्रूवर आपण होऊन चाल करणें शक्य नसलें, तरी तो आत्मसंरक्षण पूर्ववत करील याबद्दल खात्री आहे.

अमेरिकन सैन्याचें एक पथक फ्रान्समध्यें येऊन दाखल झालें. त्यांतील बहुतेक सैनिक विश्वविद्यालयांतील विद्यार्थी व पदवीधर लोक आहेत.

जर्मन पाणवुड्यांची शंभरवर्षे भरत आलेली दिसते. दिवसें दिवस त्यांचा धुमाकूळ कमी होत आहे. अमेरिकेची इंग्लंडास पूर्ण मदत असल्यामुळें पाणवुड्यांच्या अत्याचारानें कोणत्याही युद्ध सामग्रीची तूट पडेल ही शंका येण्याचें कारणच उरलें नाहीं.

जर्मनीनें आपल्या पाणबोटींच्या धुमाकूळीनें ज्यास्त शत्रु उत्पन्न करण्याचें व्रतच अंगिकारिलें आहे कीं काय कोण जाणे! अमेरिका हो नाहीं म्हणतां म्हणतां एकदाची इंग्लंडच्या बाजूनें सामील झालीच. नुकतेंच स्पेनमधील सोशियालिस्ट पक्षानें ही आतां जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारावें असें ध्वनित केलें आहे. त्यास विरोध होईल अशी स्पेनमधील स्थिति नाहीं. म्हणजे आज नाहीं उद्यां तरी जर्मनीला आणखी एक नवीन शत्रु उत्पन्न होणार असें दिसतें.

## भावी प्रकाशनें

प्रौढ विद्यार्थी व तरुण यांच्यासाठीं सर्व प्रचलित राजकीय, सामाजिक, औद्योगिक, वगैरे प्रश्नांच्या दोन्ही बाजू व साधक बाधक प्रमाणें प्रांजलपणें मांडून त्यांचा सांगोपांग विचार करण्यास शिकविणारें व शास्त्रीय, वाङ्मयात्मक व इतर हरतऱ्हेची भरपूर माहिती देणारें असें ‘ विचार साधन, नांवाचें दर महिन्याच्या १ ल्या, ११ व्या व २१ व्या तारखेस निघणारें पत्र पुण्यास लवकरच सुरू होणार असून त्याचें संपादकत्व ‘ आनंद ’ व ‘ मल्हारिमार्तंडविजय ’ यांचे संपादक रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांचेकडे राहणार आहे असें कळतें. अशा पत्राची खरोखर फार वाण आहे व ती रा. आपटे हे चांगल्या प्रकारें भरून काढतील अशी आम्हांस उमेद आहे.

हिंदुधर्माला अधिक विस्तृत व उदार स्वरूप प्राप्त करून दिलें पाहिजे व त्याचा मान वाढविला पाहिजे अशा विचाराची जी मंडळी मुंबई येथें नुकतीच स्थापन झाली आहे तिच्याकडून येत्या जुलैपासून ‘ हिंदु मिशनरी ’ नांवाचें एक इंग्रजी--मराठी साप्ताहिक निघावयाचें आहे. याचें संपादकत्व रा. गजानन भास्कर वैद्य बी. ए. यांनीं स्वीकारलें आहे. रा. वैद्य यांचा हा प्रयत्न यशस्वी होवो असें आम्ही चिंतितों.

## युद्ध रहस्य.

पश्चिम रणक्षेत्रांत आज कित्येक दिवसांत म्हणण्यासारखी लढाई झालेली नाहीं. ब्रिटिश फौजेचा गेलेलीं ठाणीं परत मिळविण्याचा क्रम सुरू आहे. जर्मन सेनापति हिंडेनबर्ग बरेंच सैन्य एकत्र करीत आहेत. पण त्याचा रोख कोणीकडे आहे याचा नीटसा अंदाज कोणालाच करतां येत नाहीं. इटलीनें अलीकडे बरीचशी गडबड मांडली आहे, तेव्हां योग्य संधी पाहून आपल्या जवळचें बरेंचसें सैन्य आस्ट्रियनांच्या मदतीला देऊन त्याची इटलीविरुद्ध पुनः एकवार उभारणी करावी असा तर हिंडेनबर्गचा अंतःस्थ हेतु नसेल ना? असा कित्येकांचा तर्क धावतो. पण इटालियन फौजेची तयारी गतवर्षी पेक्षां यंदा अधिक चांगली आहे. इटलीजवळ जड तोफा फारशा नाहींत ही गोष्ट खरी, पण पायदळाची तयारी उत्कृष्ट प्रतीची आहे, आणि आस्ट्रियन लोक युद्धाला खरोखरी कंटाळलेले आहेत. तेव्हां रडत राऊत घोड्यावर बसविण्यांत अर्थ नाहीं ही गोष्ट हिंडेनबर्ग सारख्या अनुभविक सेनापतीला कळत नाहीं असें म्हणणें धाडसाचें होईल. दुसरा एक तर्क असा आहे कीं रशियाची खोड जिरविण्याची खुमखुमी हिंडेनबर्गला चैन पडूं देत नसेल. रशियांतल्या अधिकाऱ्यांचें लक्ष सध्यां राज्यव्यवस्थेची बिघडलेली घडी पुनः नीटपणें बसविण्याकडे गुंतलेलें आहे. अजून रशियन सैन्यांतल्या शिपायांना नव्या शिस्तीची सवय अंगवळणीं पडलेली नाहीं. तेव्हां रशियावर स्वारी करून पेट्रोग्राडवर जर्मन ध्वज फडकावण्याची हिंडेनबर्गची महत्त्वाकांक्षा खरोखर न जिरतां उलट उचल खात असली पाहिजे. ह्या तर्काविरुद्ध एक मोठा आक्षेप हा घेतां येण्यासारखा आहे कीं जर हिंडेनबर्गला पेट्रोग्राड गांठावयाचें होतें तर रशियन राज्यक्रांतीसारखा धामधुमीचा काळच त्यांना विशेष अनुकूळ होता. ती संधी हातची घालवून आतां रशियन अधिकारी सैन्याच्या शिस्तीकडे लक्ष देऊं लागले आहेत व सैन्याची सुधारणा होऊं लागून लोकांच्या मनांत स्वदेशाभिमानाचा अग्नि पेट घेत आहे अशी वेळ ते मुद्दाम स्वारी करण्यास पसंत करण्या इतके वेडे ते खास नाहींत. सारांश, हिंडेनबर्गच्या अंतःस्थ हेतू बद्दलचें रहस्य अद्याप रहस्यावस्थेंतच आहे.

## जर्मनांचा पाताळयंत्रीपणा.

अमेरिकेचें साह्य दोस्तराष्ट्रांना निरनिराळ्या प्रकारांनीं होऊं लागलें आहे ही मोठी समाधानाची गोष्ट आहे ज्या युद्धांत जर्मनीशीं शत्रुत्व करण्यापूर्वी व्यापाराच्या रूपानें अमेरिकेनें अगणित लूट लाटून तळीराम गार केला त्या युद्धांतच त्या लुटीच्या द्रव्याचा विनियोग करावा अशी त्या राष्ट्राची इच्छा दिसते. अमेरिका दोस्तराष्ट्रांना यथेच्छ द्रव्यसाह्य करण्यास तयार आहे, त्याप्रमाणें अमेरिकन सैनिक हीं फ्रेंच रणांगणावर शत्रूला आपल्या वीर्यानें चीत करण्यास अत्यंत उत्सुक आहेत. येवढ्यानेंच झालें नाहीं. तर जर्मनांनें हिंदुस्थानांत आपल्या पाताळयंत्रीपणाचा प्रयोग दाखवून इंग्रज सरकाराविरुद्ध बंड उभारण्याविषयींचा जो निष्फळ यत्न कांहीं काळापूर्वी केला होता त्यांत सामील असलेल्या व अमेरिकेंत छपून राहिलेल्या गुन्हेगारांना कोर्टापुढें खेचून शिक्षा करण्याचा ही त्या सरकारचा कृतनिश्चय दिसतो. शिकागो येथें पूर्वी जर्मन सरकारकडून वकीलीच्या हुद्यावर असलेले बॅरन सिव्हिंझ यांना व आणखी तेरा जणांना अमेरिकेन सरकारानें पकडून चौकशीसाठीं कोर्टापुढे खेचलें आहे. या चौकशींत काय काय गोष्टी पुढें येतात व आणखी कोणाकोणाचें अंग असल्याचें बाहेर येतें इकडे हिंदुस्थानच्या लोकांचे डोळे लागणें स्वाभाविक आहे.

## शाबास! ब्राझिल शाबास!

अमेरिकेच्या पाठोपाठ जर्मनीशीं ज्यानें शत्रुत्व जाहिर केलें त्या ब्राझिलच्या लोकतंत्री सरकारानेंही मित्रराष्ट्रांस अमूल्य व समयोचित साह्य करण्याचें मनांत आणिलें आहे. फ्रान्सच्या रणभूमीवर पाठविण्यासाठीं तेथील सरकार सैन्यांत सैनिकांची भरती करीत आहे. येवढेंच नाहीं तर आतांपर्यंत हातीं लागलेली ४२ कोरी करकरीत जर्मन जहाजें मित्रराष्ट्रांना देण्याच्या परवान्यावर तेथील सरकारी अधिकाऱ्यांची सही सुद्धां झाली अशी बातमी आली आहे. सध्या इंग्लंडला पैशाची उणीव नाहीं, माणसांचीही येवढी नाहीं, पण जर्मन पाणबुड्या बोटींनीं बऱ्याच जहाजांचा नाश केल्यामुळें मालाची वाहतुक करण्यास जेवढी हवी तेवढी जहाजें इंग्लंडपाशीं नसल्यानें जहाजांची उणीव मात्र तीव्रतेनें भासूं लागली आहे. ही उणीव किती मोठी आहे याची कल्पना एका गोष्टीवरून कोणाला ही करतां येईल. ती गोष्ट म्हणजे वाहतुक करण्यास जहाजांची टंचाई पडल्यामुळें हिंदुस्थानांतल्या युरोपियनांसाठीं विलायतेहून येणारे खाण्यापिण्याचें व इतर जिनस आपणांस पूर्वीप्रमाणें विलायतेहून मिळतील अशी अपेक्षा न करतां हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत जे जिन्नस मिळतील त्यावरच कसा तरी निर्वाह चालवावा असें त्यांना सांगण्यांत आलें आहे. अशा वेळीं ब्राझिलकडून ४२ जर्मन जहाजांची होणारी मदत येरव्हींच्या काळीं विशेषशी महत्त्वाची गणिली गेली नसती, तरी सध्याच्या काळीं तिचें महत्व विशेषच समजलें पाहिजे.

## साम्राज्य युद्ध परिषद

सामाज्य युद्ध परिषदे साठींहिंदुस्थानचे प्रतीनीधि ह्मणून गेलेले सर सत्येंद्र प्रसन्न सिंह गेल्या आठवड्यांत कलकत्त्यास परत गेले. तेव्हां इंग्लिशमन पत्राच्या बातमीदाराशीं झालेल्या मुलाखतींत त्यांनीं सांगितलें कीं सर जेम्स मेस्टन हे सरकारी नोकर असून त्यांनीं हिंदुस्थानच्या वतीनें इतकी उत्कृष्ट कामागिरी केली कीं त्याहून ज्यास्त कामागिरी कोणत्याही लोकनियुक्त प्रतिनिधीस करतां आली नसती. सर सत्येंद्र प्रसन्न यांच्या शद्बांवर आमचा पूर्ण विश्वास आहे व सर जे मेस्टन यांनीं केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल हिंदुस्थान त्यांचे सदैव ऋणी राहील. परंतु सरकारानियुक्त सभसद परिषदेस जाणें व लोकांना आपल्या पसंतीचा प्रतिनिधि निवडून पाठविण्याचा हक्क मिळणें यांत महदंतर आहे ही गोष्ट विसरतां कामा नये हिंदुस्थानाला स्वतःचा प्रतिनिधि स्वतः निवडून पाठविण्याचा हक्क मिळाला पाहिजे असें ह्मणण्यानें सर जे. मेस्टन यांच्या कामगिरीचें मूल्य कमी होत नाहीं, पण हिंदुस्थानचा मात्र दर्जा तितका वाढतो हें स्पष्ट करून सांगावयास पाहिजे असें नाहीं.

---

## मंगल ग्रंथी.

**( स्वराज्याची भावी पुष्पवृष्टी. )**

आयुष्यांतील वाढदिवस ही एक मंगल ग्रंथी आहे. भूतकालीन आयुष्याचें सिंहावलोकन करून पुढील आयुष्याचें मनोराज्य या दिवशीं मनुष्य रेखाटतो आणि याच तत्वावर वाढदिवसाचा महोत्सव करण्याचा प्रघात सर्व राष्ट्रांत आढळतो. जेव्हां हा वाढदिवस श्रीमान् जॉर्ज साहेबांचा असतो, तेव्हां एक बादशाही प्रघात असा पडला आहे कीं त्या दिवशीं आपल्या राज्यांतील प्रसिद्ध प्रसिद्ध कारकीर्दींच्या महाजनांचा गौरव बादशहा आपल्या जवळील मोठमोठ्या किताबांनीं करीत असतात आणि मोठमोठ्या मानाच्या व मंगलसूचक ग्रंथींनीं प्रजाजन व बादशहा यांचीं अंतःकरणें त्या दिवशीं परस्परांस प्रेमानें आकर्षित असतात. आणि जेथें स्वराज्य नांदते तेथें या मंगल ग्रंथीचा आनंदोत्सव अत्यंत चित्ताकर्षक असतो. ब्रिटिश साम्राज्यामध्यें गेल्या सोमवारचा हा शुभ दिवस या महायुद्धाच्या प्रसंगीं देखील आह्मी आनंदांत घालविलो. पण या साम्राज्यांत इंडियाला अद्याप स्वराज्य प्राप्त नाहीं ह्मणून हा वाढदिवसाचा माहिम आमच्या अंतरंगांत जितका खेळावा तितका खेळत नाहीं. इंडियाचें स्वराज्य नसल्यामुळें इंडियांतील जे लोक बहुमानाच्या श्रीमंतीला पोचतात त्यांच्या मधील मोठमोठ्या किताबवाल्या मंडळींना परस्पर 'अहोरूपं अहोध्वनिः' या न्यायानें बादशहाचा नोकर वर्ग पुढें आणीत असतात. सरकारी चाकरांना किताब देण्यापूर्वी राष्ट्रीय सभेसारख्या राजमान्य संस्थेनें त्या त्या किताबाला लायख मंडळींचीं नांवें त्यांच्या त्यांच्या सार्वजनिक कामगिरीच्या उल्लेखानिशी पाठविल्याशिवाय सरकारांतून या अधिकारी मंडळींचा गौरवच होतां कामा नये असें आह्मास वाटूं लागलें आहे. मोठमोठे मान सन्मान ही सरकारी मंडळी झोडतात ही गोष्ट बादशहांनीं बंद केली पाहिजे. कारण त्यांच्या तशा करण्यामुळें राष्ट्रांतील सार्वजनिक मुत्सद्यांचा, कविवर्यांचा व कर्तृत्ववान् पुरुषांचा जसा मान मरातब व्हावा तसा होत नाहीं. जे सरकारी पगार खातात त्यांचा सन्मान सार्वजनिक लोकांच्या मागून होईल तरच त्या मानाची किंमत राहाते. उदाहरणार्थ, नामदार राजश्री दिनशा एदलजी वाच्छा यांस सर हा किताब देण्यांत आला आहे. या एका नांवानेंच राष्ट्रीय सभा विभूषित होईल, कां कीं ते तिचे एक शिरोभूषण आहेत. त्यांच्या या बहुमानानें मुंबईच्या म्युनिसिपल कार्पोरेशनला अभिमान वाटेल, व्हाइसरायच्या कौंसिलाची प्रतिष्ठा वढेल; किंबहुना सर्व इंडियन राष्ट्र सरकारचे ऋणी होईल. पण हे एकच नांव शोधून काढण्याला किती तरी नांवें पुढें व मागें सोडावीं लागतात. जेथें सर दिनशा वाच्छा हे सर या प्रतिष्ठेला पोचण्याला इतका कालावधि लागतो तेथें किती तरी अशीं नररत्नें सरकारानें आपल्या सालगिऱ्हाच्या दिवशीं अभिमंत्रित करण्यासारखीं असून ही सरकारच्या नजरेखालीं येऊं शकत नाहींत. इंडियाला स्वराज्य प्राप्त होईल तेव्हां हाच मंगल दिवस इतका उत्कर्षाचा प्रसन्नवृत्तीचा व लोक कल्याणाचा होईल कीं पुराणांतरीं वर्णिल्याप्रमाणें देव व आपले पूर्वज बादशहाच्या नांवनें आकाशांतून पुष्पवृष्टी करीतील.

---

## दुरून नमस्कार

गेल्या सोमवारच्या बादशहाच्या वाढदिवसा निमित्तानें आमच्या प्रांतांतील जे थोर थोर लोक या खालगिऱ्याच्या यादींत गोवले गेले आहेत त्यांची नामावळी आह्मी संतोषानें खालीं देतो. — त्यांचें आह्मी अभिनंदन करितों. पण त्यांना या स्वराज्यवाल्या लोकांचें अभिनंदनही कदाचित् नको असेल. ज्यांच्या द्वारीं सरकारी श्री उभी राहते ते पुष्कळदा स्वराज्याचें ध्यान धरणाऱ्या लोकांपासून अधिक दूर दूर पळतात. आणि हल्लीं तर लढाई नंतर तात्कालिक स्वराज्य मागणाऱ्या लोकांचा पाडाव करण्याचो मोहीम सुरू आहे. तेव्हां या नव्या किताबांच्या पथकांत शिरणाऱ्या मंडळींना आह्मी त्यांचे सद्गुण तेवढे घेऊन दुरूनच नमस्कार करतों.

| रा. रा. | पदवी. |
|---|---|
| नामदार जेम्स वाकर कमिशनर व व्हाइसरायचे कायदे कौन्सिलदार | नाइट कमॉंडर |
| हेनरी रॉबर्ट क्रास्थवेट प्रांतिक पतपेढ्यांचे रजिस्ट्रार | सी. आय. ई. |
| हेनरी जॉन स्टॉनियन सेकंड आडि. ज्युडिशिअल कमिशनर | सर (नाइट हूड) |
| खानबहादुर हाफिज महमद वलायतुल्ला इ. ए सी. हल्लीं छिंदवाडा | केसर- इ.- हिंद पदक ( प्रत २ री ) |
| जहांगीर कौंटजी कामा बॅरिस्टर वर्धा | खानबहादुर |
| वासुदेव रामचंद्र डोंबळे बी. ए. बी. एल डिस्ट्रिक्ट अँन्ड सेशन जज्य आकोला. | राव बहादुर |
| माधव गणेश देशपांडे नागपूर | रावबहादर |
| सयद ईसाक पोलिस इन्स्पेक्टर नागपूर | खानसाहेब |
| गोविंदलाल पुरोहित जबलपूर | राय साहेब |
| शेट हरलाल कोकर्डा (उमरावती) | राय साहेब |
| गोपाळ रामचंद्र चिकटे तहाशिल्दार नागपूर | रावसाहेब |
| वामन बाळिराम लाखे वकील रायपूर | राव साहेब |

वरील यादी वरून हें दिसून येईल कीं लोकाग्रणी लोक निराळेच आहेत. अर्थात त्यांचा या यादींत उल्लेख होण्याचा संभवच नाहीं. पण या सरकारी कृपणपणानें सद्गुणांचा जरी उत्सव झाला नाहीं तरी ते आपले कल्याणमय तेज आपोआप पसरावितील तेव्हां मात्र कस्तूरीच्या आमोदाप्रमाणें लोक आपोआपच त्यांना ओळखून काढतील. पण या सरकारी मंडळींना मात्र आपला हुद्दा अगोदर लिहून कळवावा लागेल.

---

## आमचें माणिक

जास्वंदीच्या फुलावर स्फटिक ठेविला तर तो तांबडा दिसूं लागतो त्या प्रमाणें हल्लींच्या सरकारी जास्वंदी राजनीतीमुळें स्वराज्याचा शुभ्रवर्णही तांबड्या निशाणासारखा धोक्याचा वाटूं लागला आहे. इंडिया सरकारच्या या नव्या राजनीतीमुळें सर्व राष्ट्र खडबडून उठल्या सारखें उभे आहे. तात्कालिक स्वराज्यवाले हे अराजक मार्गाचे आहेत असा त्यास शिक्का देण्याचा प्रयत्नही जारी आहे. या प्रयत्नांच्या मूळाशीं राजश्री क्रॅडाक हे आपल्या बुद्धीचें पुष्कळसें पाणी ओजून गेले आहेत असें कळतें. राजश्री क्रॅडॉक हे आमच्या प्रांताचे एक माणिक आहेत आणि त्यांच्या प्रांतिक कारभाराचा हिंदुस्थान सरकारच्या कौंसिलांत जो एवढा विकास झाला आहे तो कांटेरी बाभळी सारखा आमच्या राष्ट्रीय आकांक्षांना कुंपण होण्यालायख आहे. पण आतां या कुंपणांना सांप्रतचे स्वराज्याचे अशावृक्ष कांहीं जुमानीत नाहींत. त्यांची वाढ उत्तरोत्तर जोमानें होत चालली आहे. राजश्री क्रॅडॉक यांची चहा आतां राहिली नाहीं, त्यांच्या नांवानें यापुढें कोणी नागपुरास नवा नगराचा भागही वसाविणार नाहीं. त्यांची ही शिलेदारी पाहून यापुढें कोणी दृष्टमणीही त्यांच्या वरून फिरविणार नाहीं आणि आह्मास तर असें वाटूं लागलें आहे कीं हे जुने अधिकारी हल्लींच्या कालाला अपात्र आहेत आणि त्यांच्या अंधदृष्टीला नव्या कालाचे चष्मे लागण्यासारखे नाहींत.

---

## अकबर—शिवाजी.

**( इंडियन वार्शिंगटनची संस्मृती. )**

अमेरिकेला जें ब्रिटिश मिशन गेलें आहे त्याचे मुख्य मुत्सद्दी राजश्री बाल्फर यांनीं माउंट व्हर्नान येथें जाऊन श्री वार्शिंगटन यांच्या थडग्यावर या मिशनचा पुष्पहार अर्पण करून ब्रिटिश अंतःकरणाचे खालील शब्दोद्गार काढले आहेत.

"जॉर्ज वार्शिंगटन हा शिपाई, मुत्सद्दी व देशभक्त होता. त्याच्या चिरकाल स्मरणार्थ ब्रिटिश मिशननें हा हार अर्पण केला आहे. जन्मानें तो ज्या देशाचा नागरिक होता आणि आपल्या बद्धवैभवानें जो देश त्यानें निर्माण केला ते दोन्हीही देश मानव कोटीला लष्करी रावणशाहीच्या पादाक्रांती पासून मुक्त करण्यासाठीं खांद्याला खांदा देऊन लढत आहेत हें पाहून त्याचा आत्मा हर्षभरित होईल" वार्शिंगटनला त्याच्या हयातींत राजानिष्ठही मानीत नसत. त्यांच्या स्वातंत्र्याच्या सत्कृतींच्या हा गौरव पाहून कोण सहृदय मनुष्य बालफर बनणार नाहीं बरें.

आह्मी तर असें सांगूं कीं श्री वार्शिंगटन यांनीं जसे अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून दिले तसेच प्रयत्न श्री अकबर किंवा श्री शिवाजी यांनीं आपापल्या कालीं त्या त्या परीनें मनुष्याच्या स्वातंत्र्य विकासार्थ केलेले आहेत. तेव्हां त्यांच्या त्या पवित्र तसबिरी जेथें जेथें दृष्टीस पडतील तीं तीं स्वातंत्र्याचीं मंदिरें समजून आमच्या महमदी किंवा हिंदी विद्यार्थ्यांनींच काय तर सर्व तरुण पिढींनीं त्यांच्या चरणीं आपलीं अंतःकरणाचीं कुसुमें वरील बालफरवृत्तीनें अर्पण करण्यास शिकावें. थोर पुरुषांच्या चित्रांतल्या दर्शनानें ही मनें पुनीत होतात, मनुष्याचें चारित्र्य बदलतें, आणि त्या चित्रगत पुरुषाच्या थोरवीनें सर्व बालसृष्टीही थोर पदाला चढत जाते. जी गोष्ट इतिहास पुरुषासंबंधानें खरी ती विद्यमान सत्पुरुषासंबंधानें किती तरी अनुकरणीय व वंद्य होय बरें! पण अलीकडे वार्शिंगटन वृत्तीनें अकबरी प्रेरणेनें किंवा शिवाजीच्या समुत्साहानें धरोबरचे सर्व राष्ट्रवाले पुरुष प्रस्तुतच्या कालीं स्वातंत्र्याचा अनुवाद करितात किंवा स्वराज्याचा महिमा गातात तेव्हां तेव्हां त्यांचीं भाषणें ऐकण्याला देखील तरुण विद्यार्थ्यांनीं जाऊं नये असें जेथें सरकारी विद्याखातें हुकुम करते, तेथील राजकारभारांत हें लढाइचें महाभारत संपल्यानंतर श्रीमंत चक्रवर्ती बादशहानीं मोठी क्रांतीच घडवून आणली पाहिजे. मुख्य प्रधान राजश्री लाइट जॉर्ज यांनीं ही स्पष्ट ह्मटलें आहे कीं इंडिया ह्मणजे दस्यूंचा देश नव्हे, तर तो साम्राज्याचा भागीदार करण्यांत येईल. ईश्वर करो आणि ती वाणी सत्वर खरी ठरो!

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—मृगाचा सोन्याचा चरण पडून हवेंत शीतळाई येत चालली आहे व लोक पेरणीच्या गोष्टी बोलूं लागले आहेत. हवा चांगली सुंदर व निरोगी असून प्रातःकाळच्या पेक्षां सायंकाळच्या क्षितीजाचीं चित्रें अत्यंत दर्शनीय व फार चित्रविचित्र असतात व त्या वेळचें सूर्यदर्शन ही मनाला मोठें आल्हाद देते.

रा. रा. पुंडरीक ज्ञानेश्वर जोशी टेंपररी सबजज्ज आकोला यांस आफिशिएटिंग सबजज्ज वर्ग ६ ची बढती मिळाली आहे ही आनंदाची गोष्ट होय. यांची बदली खांडव्याकडे होणार असल्यामुळें त्यांच्या बद्दलचा येथील वकील मंडळींचा रोष आपोआप विरघळेल, आणि राजश्री जोशीही आपल्या न्यायालयांतील कामगिरीला सौजन्याचा मृदुलपणा जोडतील तर त्यांची चहा व किंमत अधिक वाढेल.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटींशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीसें सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुदे येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } Lyon Scott एजंट

नो नं १

---

### सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १॥, २, २॥, ते ९ रु. प. बुद्धीबळजोड लांकडी— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. सोंगट्या जोड— किंमत ।, ।॥, ।॥।, १, १॥, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी

नो. नं. ३

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १।८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनळी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अष्टफुलें साखीं व वाघऱ्याचीं वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकरणीं, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेदीबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

---

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमर्शियल अशुअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटांची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशुअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.

नो. नं. ८

---

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा.

# प्रारब्धपरीक्षा

## फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागविणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करून पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवावे उत्तर १ रु ०४ चे व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरून एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तों चीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ०४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ०१ तिकीट पाठवा.

ज्योतिषी दा. दामि शास्त्री नं. १०३७

नो. नं. ७३ नाशिक

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३—४; गोट जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; तुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४—५. शिंप्याचें मोतीं व्हान मोठें वाटेल तसें. साची २—३—४; अंगठी १; सले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २—२॥. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव— मुंबई

नो० नं० ५

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्मीसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३६ गो० १ रु० ७२ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७६ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुतांची लाली, लकाचे, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवात्मजांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १८ माहे जून सन १९१७ ई० [अंक २४

विक्री संबंधी

## जाहीरात.

( आकोला प्रांत वऱ्हाड येथील मौल्यवान स्थावर जिनगी संबंधानें विक्री .)

विद्यमान नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई.

ओ. ओ. सी. जे.

दिवाणी दावा नंबर ३१९ सन १९१४

१ जेमशेटजी हारमसजी बिलिमोरिया पार्शी

२ हरमसजी जमशेटजी बिलीमोरिया पार्शी

३ मकनजी जगजीवन हिंदू तीघेही भागीदारींत मर्चेंटस् ब्यांकर्स व कमिशन एजंटस् म्हणून व्यवहार करणारे असून त्यांच्या पेढीचें नांव जे. एच बिलिमोरिया आणि को, दुकानचा ठिकाणा अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई वादी

विरुद्ध

१ टीकमदास सदाराम

२ फोजमल गलाबचंद

३ रामगोपाळ बिहारीलाल

सर्वजण हिंदू असून मर्चंट व श्राफ असून त्यांच्या व्यवहाराची दुकानें विठ्ठलवाडी; मुंबई येथें मोतीलाल तेजमल या नांवानें आकोला येथें टीकमदास तेजमल या नांवानें, आणि खामगांव येथें श्रीराम रामगोपाळ या नांवानें आणि या शिवाय इतर ठिकाणीं निरनिराळ्या भिन्न नांवाखालीं.

प्रतिवादी

वरील दाव्यांतील वादीस दिलेल्या अधिकारान्वयें खालीं सही करणार यांजकडून बुधवार ता० २ जून १९१७ रोजीं २ प्रहरीं ४॥ वाजतां ( स्टँडर्ड टाइम ) मुंबई येथील मेडो स्ट्रिट मधील नंबर ५२ येथें असलेल्या लिलावाच्या रूममध्यें लिलाव करण्यांत येईल

वऱ्हाडांतील आकोला तहसिलींतील आकोला येथील मौजे ताजनापेठ येथें असलेला बंगला, औट हौसेस इत्यादि मौल्यवान पुढें वर्णन केलेल्या स्थावर जिनगीत वादींचा व प्रतिवादीचा जो हक्क, मालकी व हितसंबंध असेल तो विकावयाचा आहे. नामदार हायकोर्ट ऑफ जुडिकेचर मुंबई यांनीं तारीख १ आक्टोबर १९१४ रोजीं वरील दाव्यांत जो कंसेंट हुकुमनामा दिला आहे त्यांत दिलेल्या अधिकारान्वयें वादी ही विक्री घडवून आणीत आहेत.

विक्रीच्या जिनगीचें वर्णन.

मौजा ताजनापूर ता० आकोला जि० आकोला येथें जी जमीन किंवा जमिनीचा भाग हा सर्वे नं० ९ चा असून अदमासें २८३१ क्षेत्रफळ आहे. त्यावर असलेला बंगला, इतर इमारती व इतर उभे असलेले इमले यासुद्धां याची चतुःसीमा येणें प्रमाणें—

पूर्वेस किंवा पूर्व भागाला—सार्वजनीक रस्ता.

पश्चिम किंवा पश्चिमेच्या भागाला मोर्णा—नदी

दक्षिणेस किंवा दक्षिणेच्या भागाला—नार्थ कोट जीनिंग फॅक्टरी.

उत्तरेला किंवा उत्तरेच्या भागाला—सरकारी जमीन व मोर्णा नदीला जाण्याचा रस्ता.

विक्री संबंधानें आणखी लागणारी माहिती व शर्ती ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं खालीं सही करणार यांच्या आफीस रूम नंबर ५२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई येथें किंवा वादी तर्फेचे अटर्णी मेसर्स श्रॉफ अँन्ड दिनशा यांच्याकडे त्यांच्या ऑफिसांत नं. ३७५ हार्नबीरोड, फोर्ट, मुंबई येथें चौकशी करावी.

मुंबई ता. १९ मे १९१७ } गांधी अँन्ड को लिलाव करणार

नो. नं. २५५

---

### नोटीस

रा रा. लक्ष्मणसा बाळकृष्णसा आंत्रेकर राहणार डोणगांव तालुके मेहकर जिल्हा बुलडाणा

यांसः—

नोटीस देणार कोंडु पांडुरंगसा राहणार डोणगांव तालुके मेहकर जि. बुलडाणा यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, ता. ७ मार्च १९१३ रोजीं मी तुम्हांस मेहकर सब रजिष्ट्रर कचेरींत जें कुलमुखत्यारपत्र दिलें होतें, तें आज तारखेपासून रद्द केलें आहे. यापुढें तुम्ही माझे संबंधीं कोणतेही प्रकारचा कारभार देणेघेव फिर्यादी वगैरे कोणतेच तऱ्हेचें काम करूं नये. सदर्हू नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे तुमचे जवळ असलेले सर्व प्रकारचे कागदपत्र, बैल, गाड्या, म्हशी, भांडींकुंडीं, पैसा, ऐवज व तुमच्या खर्चीं पडलेला माझा पैसा मला द्यावा.

यापुढें तुम्ही आमचे संबंधीं कोणतेच प्रकारचं काम करूं नये. केल्यास त्याबद्दल आम्ही जबाबदार राहणार नाहीं. केल्यास त्याबद्दल योग्यती तजवीज करणें भाग पडेल. कळावें. दस्तुर खुद ता. ५-६-१९१७

सही

कोंडू पांडुरंगसा रा. डोणगांव ता. मेहकर द. खुद

नो. नं. २६२

---

### नोटीस.

विद्यमान सिनीयर सबजज साहेब कोर्ट आकोला

स. सर्टीफिकेट नं. १० सन १९१७

चौ. ता. १४-७-१७

अर्जदार

पार्वती मर्द किसन माळी रा. वाडेगांव ता. बाळापूर अ. पा. करणार मारुती हिरामण माळी रा. वाडेगांव ता. बाळापूर

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहिर करण्यांत येते कीं, सदर्हू अर्जदारानें आमचे कोर्टांत मयत किसन वा। कडतु रा. वाडेगांव ता. बाळापूर यांचे इस्टेटीबद्दल मैताची बायको या नात्यानें वारस आहे. तिनें कांहीं मैताचे कर्ज वसूल करण्याबद्दल सकसेशन सार्टीफिकेट मिळविण्याकरितां अर्ज दिला आहे. सबब सदर्हू इस्टेटीशीं ज्याचा हक्क संबंध असेल त्यांनीं आपल्या पुराव्यानिशीं आमचे कोर्टांत ता. १४-७-१७ इ. रोजीं १० वाजतां हजर रहावें. सदर्हू तारखेवर कोणी हजर न झाल्यास दुसरे कोणी वारस नाहीं असें समजून अर्जदारास सकसेशन सार्टिफिकेट दिलें जाईल. हें या नोटिशीनें जाहीर करण्यांत येत आहे. व ही नोटीस आमचे कोर्टांत शिक्यानिशीं व सहीनिशीं देण्यांत आली आहे. ता. १४-५-१७

सही

N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N.263

---

### नोटीस.

मनी मर्द रामजी वानखेडे हल्लीं मुक्काम दावुतपूर ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुझी नोटिस ता. ८-५-१७ इसवी रोजीं वऱ्हाडसमाचार मधील मिळाली. लिहिला मजकुर समजला. तूं दिलेली नोटिस अजीबात खोटी आहे मी तुजला घरांतून मुळींच काढून दिले नाहीं. तूं माझे आईचे भेटीस जाते असे सांगून गेली व त्यानंतर मी २-४ वेळां तुजला घेण्याकरितां आलो असतां तूं येण्याचा इनकार केला व आतांही मी तुजला वागविण्यास तयार आहों. तरी ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत तूं माझ घरीं येणें अगर तुझें मत असल्यास मी कोणास घेण्यास पाठवीन. व तुझे खर्चाचे रकमे संबंधीं मी मुळींच जबाबदार नाहीं कळावें. ता. २८-५-१७इ.

सही

रामजी दामाजी वानखेडे द. खुद

नो. नं. २६४

---

### नोटीस

रा. रा. वंकारआप्पा कृष्णाआप्पा तांबसकर रा. बाळापूर जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही व आम्ही मिळून जे कलकत्यावाल्याचे उभे शेतांतील पीक रु० ५०० स घेतले त्या खरेदी प्रो। माझे व स्वतः तर्फे वहीवाटदार या नात्यानें सर्व शेतातील माल गोळा करून आणिला आहे. हा माल तुम्ही परभारे विकून परभारे पैसाही वसूल केला आहे. तुम्ही आपले वहीवाटीचा हिशेब देत नाहीं व आमचे हिश्याचे पैसे ही दिले नाहीं. तुम्ही दुसऱ्याचे फंदानें बेमानी करूं पाहातां असे दिसते. म्हणून ही तुम्हास जाहीर नोटीस देतो कीं ही नोटीस पोहचल्या तारखेपासून आठ दिवसाचे आत वरील शेतीचे हिशेबाचा निकाल सर्व चुकता करावा असे करण्यास चुकाल तर तुम्हांवर दावा करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां व तुम्ही हातउसने पैसे नेले २९ रु त्या सुद्धां भरून घेतले जाईल कळावे ता० १०-६-१९१७

सही

नारायणआप्पा वा। लक्ष्मणआप्पा

नो. नं २६५ रा. आकोला द. खु.

---

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

**नशिबाची— परीक्षा.**

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥ रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतची फळें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहाची पीडा निरसन व्हावी त्या करिता एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईत ३। सूचना— ग्राहकानीं वरील कामा करिता सा।जन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळववे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८/- आण्याचे तिकिट पाठवावे.

ज्यो. हि. टि. मायधनी
व्या. ज्योतिषकार्यालय. चांदडकर पेठ— नाशिक

नं० नं० ७३

---

### नोटीस.

सर्वत्र शेट सावकार व इतर लोके राहणार मंगरूळपीर जिल्हा आकोला

यांसः—

जाहीर नोटिशीनें कळवितें कीं तारीख १८ माहे जानेवारी सन १९०७ इसवी रोजीं सीतारामसिंह वा। गणपतसिंह रघुवंशीय मुक्काम मंगरूळपीर यांजला माझे भ्रतार गणपतसिंह उमेदसिंह यांनीं दत्तक घेतलें व दत्तकपत्र रजिस्टरही झालें आहे. त्यावेळेस दत्तक घेतलेला मुलगा अज्ञान होता परंतु सदर्हू मुलगा जसजसा सज्ञान होत गेला तसतसा त्यानें आपली चालचलणूक बिघडवून माझे इस्टेटीची अफरातफर करूं लागला व इस्टेटीवर कर्जाचा बोजा करून राहीला आहे. दत्तकपत्रांत शर्त अशी आहे कीं दत्तक आपली वर्तणूक चांगली ठेवणार नाहीं व इस्टेटीची अफरातफर करील तर नेमलेले पंच लोकांनीं व मयताचे बायकोनें त्याला दरमहा रुपये १० दहा घ्यावे. तरी सर्वत्र लोकांस मी सूचना करीत आहे कीं सदर्हू दत्तकाची चालचलणूक बिल्कूल चांगली नाहीं व विनाकारण कर्ज काढून इस्टेटीवर बोजा करीत आहे तरी सर्वत्रांस विनंती कीं सदर्हू दत्तकांस कोणीच या इस्टेटीवर कर्ज देऊं नये. सदर्हू इस्टेट स्थावर अगर जंगम त्याची नाहीं व जो कोणी देईल तर त्याचे कर्जाचा बोजा आमचे इस्टेटीवर किंवा माझेवर नाहीं. मी बिलकूल जबाबदार नाहीं. इस्टेटीमधील स्थावर जमीन त्याला कोठेंच गहाण अगर विक्री कारितां येत नाहीं अशी मयताची शर्त मृत्युपत्रकांत आहे. सदर्हू जमीन सीतारामसिंह यानें कोणस वहीतीस दिली आहे तिचा मक्ता अगर बटाईचे पीक आह्मांस घ्यावे व आमची पावती घ्यावी. कारण सदर्हू इस्टेटीवर त्याचा मुळींच हक्क नाहीं याबद्दल वर सुचविलेंच आहे. शिवाय जो कोणी शेताचे पट्टे अगर बटाइपत्रक करून देईल त्यानें आमचे सल्यानें करावे कळावे तारीख ९।६।१९१७ इसवी

दस्तुर जयरामसिंग वा। मोहनसिंग रा० मंगरूळपीर द खु.

सही

तुळसाबाई जवजे गणपतसिंह

रघुवंशीय राहणार मंगरूळपीर

याचे हातची निशानी आंगठा

नो नं. २७६

---


# काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९



वऱ्हाडसमाचार

ज्येष्ठ वद्य १४ पिंगल संवत्सर १८३९


## सिव्हिल असिस्टंट सर्जन्स विषयींचा अन्याय.

१९११ साल्च्या मार्च महिन्यांत ना. मि. सुब्राव यांनीं हिंदुस्थानच्या वरिष्ठ कायदेकौंसिलाच्या बैठकीपुढें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतल्या वरिष्ठ प्रतीच्या जागांवरच्या हिंदी लोकांच्या हक्काचा विचार करण्यासाठीं कामिशन नेमण्यांत यावें असा ठराव आणिला. त्यावेळीं हा ठराव हिंदी लोकांच्या आकांक्षांच्या मुळावर आघात करून त्यांचा उच्छेद करील व त्याची पीछेहाट करील असें स्वप्न कोणाला पडलें होतें ? पण या ठरावावरून १९१२ सालीं नेमण्यांत आलेल्या कामिशनाचा जो रिपोर्ट अलीकडे प्रसिद्ध झाला आहे त्यावरून पहातां राज्यकारभाराच्या बहुतेक प्रत्येक खात्यांत त्या आकांक्षांवरून वरवंटा फिरता ठेवण्याची शिफारस करण्यापलीकडे या कामिशनचा दुसरा कांहीं उपयोग काडीमात्र झाल्याचें दिसून येत नाहीं. १८८६-८७ सालच्या एचिसन कमिशनचें स्वरूप निराशाजनक होतें. पण त्याकाळीं लोकांच्या आकांक्षाही येवढ्या तीव्र नसल्यामुळें त्या कमिशननें केलेली निराशा येवढी मर्मभेदक झाली नाहीं. हल्लीं लोकांच्या आकांक्षांचें क्षेत्र इतकें विस्तृत झालें आहे कीं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे संपूर्ण हक्क आणि तेही शक्य तितक्या लवकर पदरांत पडावे ह्मणून हिंदुस्थानांत सारखा आक्रोश सुरू आहे अशावेळीं एखादें खातें संपूर्ण रीतीनें हिंदी लोकांच्या हातांत देण्याचा विचार तर दूर राहोच; पण त्या खात्यांतल्या जागा भरतांना प्रथम लष्करी खात्याच्या गरजांचा विचार करावयाचा, आणि नंतर लोकांच्या हक्कांचें संरक्षण झाल्यास करावयाचें ही जुनी पद्धत कायम ठशाची करून टाकण्यासारखी शिफारस कमिशननें केलेली पाहून ब्रिटिश न्यायदेवतेच्या जागृतपणाविषयीं एखाद्याचें मन साशंक झाल्यास काय नवल आहे ? मेडिकल खातें हें अशा प्रकारचें खातें आहे कीं त्यांत कामास पूर्णपणें लायक असे सगळेच हिंदी लोक नेमिल्यानें हिंदुस्थान सरकारच्या राज्यपद्धतींत उलथापालथ होईल. अशी भीती बाळगण्याचें यत्किंचित् ही कारण नाहीं. बोलून चालून लोकांच्या दुःखनिवारणाचें परोपकारी कृत्य करणारें तें खातें आहे. परंतु आपल्या देशबंधुभगिनीवर्गाच्या दुःखनिवारणाचें हें सत्कृत्य करण्याचें श्रेय ही हिंदी लोकांच्या पदरांत पडण्याचे कामीं कामिशनकडून औदार्य दाखविण्यांत आलेलें नाहीं. तेथें सुद्धां पंक्तिप्रपंच झालेला दृष्टीस पडतो. या खात्याच्या सिव्हील व मिलटरी अशा दोन शाखा आहेत. पण या दोन्ही शाखांतल्या वरिष्ठ प्रतीच्या जागांपैकीं शेंकडा ८७ जागा लष्करी आफिसरांनीं भरलेल्या व हलक्या प्रतीच्या जागा काय त्या हिंदी लोकांच्या हातांत अशी स्थिति कामिशन नेमिलें गेलें त्या काळीं होती. या खालच्या जागा तरी हिंदी लोकांच्या हातांत राहण्याचें कारण त्या मिलिटरी रिझर्व्हमधले लोक पतकरीत नसत हें होतें. ही पूर्वापार चालत आलेली अन्यायाची पद्धतिच पुढें बहुतांशानें चालू ठेवावयाची होती, तर पब्लिक सर्व्हिसेस कामिशन नेमून त्याच्या प्रीत्यर्थ हिंदुस्थानच्या तिजोरींतले लाखो रुपये खर्च करण्याचें काय प्रयोजन होतें? मिलिटरी रिझर्व मधल्या लोकांना कांहीं काळ लष्करी नोकरी केल्यानंतर त्या खात्यांतून बदलून सिव्हिल मेडिकल खात्यांतल्या वरिष्ट प्रतीच्या जागा देण्यांत येतात हा सिव्हिल मेडिकल खात्यासंबंधाचा खरोखर अन्याय आहे. मिलिटरी व सिव्हिल या दोन शाखा जर स्वतंत्र आहेत, तर मिलिटरी खात्यांत निरुपयोगी ठरलेल्या किंवा नको असलेल्या लोकांना सिव्हिल शाखेकडे दडपण्याचें कारण काय ? सिव्हिल शाखेंतल्या लोकांचा जर मिलिटरी शाखेंत शिरकाव होऊं शकत नाहीं, तर मिलिटरी लोकांचा तरी सिव्हिल शाखेंत तो कां व्हावा? हा उघड उघड अन्याय कामिशनला दिसला नसता तर या दोन्ही शाखा स्वतंत्र ठेवाव्या अशी शिफारस कामिशननें केली नसती. पण गंमत ही आहे कीं या दोन शाखा स्वतंत्र ठेवाव्या अशी सूचना करून सुद्धां शेवटीं कमिशननें अशी पळवाट ठेविली कीं जर मिलिटरी रिझर्वमध्यें आफिसरांची ज्यास्त गर्दी झाल्या कारणानें त्यांतल्या कांहींना सिव्हिल शाखेंत पाठविण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, तर निदान त्या सिव्हिल शाखेंतल्या कमींत कमी इतक्या जागा तरी सिव्हिल आफिसरांच्या हातीं राहतील असें किमान पक्षाचें प्रमाण ठरवून टाकण्यांत यावें. याचा अर्थ व्यवहारांत नेहमीं प्रचलित असलेल्या भाषेनें बोलावयाचें ह्मणजे 'तुझें तें माझें, पण माझें तें काय तुझ्या बापाचें ?' असा उघड होतो. लष्करीखात्यांत कोणत्या वेळीं किती रिझर्व ठेवावयाची किंवा काढून टाकावयाची हें अर्थात् मिलिटरी आफिसर ठरविणार व त्यांची सोय अगोदर पाहून सिव्हिल शाखेंत सिव्हिल आफिसरांची किमान संख्या ठरवावयाची ह्मणजे अर्थात् हें प्रमाण ठरविण्याचें काम मिलिटरी आफिसरांनाच सांगावें लागणार. त्यांची गरज भागून उरतील त्या जागा 'देग बाई जोगवा' या ह्मणी प्रमाणें सिव्हिल आफिसरांना मिळावयाच्या याचा परिणाम सिव्हिल शाखेंतल्या हिंदी लोकांच्या आकांक्षांना दडपून टाकण्याशिवाय अन्य प्रकारें होणें शक्य आहे काय ? असें आह्मी कमिशनला विचारतों. सिव्हिल शाखेंतल्या वरच्या प्रतीच्या जागा मिलिटरी खात्यानें पटकावण्याचा सर्रास शिरस्ता पडल्यावर खालच्या जागीं ज्यांनीं उत्तम प्रकारें काम करून लायकी दाखविली व अनुभव संपादिला त्यांची ती लायकी व अनुभव यांची मातीच व्हावयाची ना? सिव्हिल शाखेंतल्या खालच्या दर्जाच्या ह्मणजे असिस्टंट सर्जनच्या जागेवर असलेल्या हिंदी लोकांसंबंधानें उघडपणें घडत असलेला हा अन्याय दूर करण्यासंबंधानें कमिशननें काय केलें या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कमिशनला देतां येईल काय ?

---

## सरकार आणि शिक्षणप्रसार.

हिंदुस्थानांतल्या शिक्षणप्रसारा विषयींच्या सरकारच्या धोरणाचें स्वरूप आतां बहुतकरून कळून चुकलें आहे. हिंदी तरुणांमध्यें उच्च शिक्षणाचा प्रसार होणें हें पुकळ सरकारी अधिकाऱ्यांना धोक्याचें वाटतें. असंतुष्ट बी. ए. निर्माण करण्यापासून देशांतल्या शांततेला धोका येईल, राजकीय चळवळी करणाराची संख्या फुगेल व सामान्य लोकांची समाधानवृत्ति या राजकीय चळवळींनीं मावळेल, तेव्हां कॉलेजें व युनिव्हर्सिट्या यांच्यांत तरुणांचा प्रवेश होऊं देणारें द्वार जितकें घट्ट मिटून घेतां येईल तितकें तें मिटून घ्यावें असें सरकारचें धोरण आहे. दुय्यम प्रतीच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम पाहिला तर तेथें ही सरकारी नोकऱ्यांसाठीं लागणारे कारकून तयार करण्याचे कारखानेच हायस्कुलांच्या रूपानें सरकारानें घातले आहेत असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. हायस्कुलांतून पार पडल्यावर स्वतंत्र रीतीनें पोट भरतां येईल असें शिक्षण मुळींच मिळत नाहीं. असें शिक्षण सरकार स्वतः देत नाहीं, आणि सरकारी मदत घेणाऱ्या शाळांच्या चालकांचे हात पाय त्यांनीं नियमांनीं असे बांधून टाकिले आहेत कीं खाजगी शाळांतून ही तें देतां येऊं नये. राहतां राहिल्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा. या शाळांतून रटफ करण्याचेंच शिक्षण मिळावयाचें, पण तेवढें तरी फुकट व सक्तीचें करा असें ह्मटलें असतां पैशाची अडचण, शिक्षकांची अडचण, वगैरे अडचणी सरकारी अधिकारी पुढें करतात! जणूं काय, कोणत्या ही अडचणी नसतील आणि शिक्षणप्रसाराच्या मार्गावर गुलाबांच्या फुलांचा खच पडलेला दिसेल तेव्हां सरकारी अधिकारी याविषयींच्या आपल्या कर्तव्यासंबंधानें जागृति दाखविणार! सरकारची शिक्षणविषयाच्या बाबतींत केवढी पराङ्मुखता आहे हें पुढील सरकारी रिपोर्टांतल्या आंकड्यांवरूनच दिसून येईल. १९१५।१६ सालच्या हिंदुस्थानसरकारच्या एज्युकेशन ब्यूरोच्या रिपोर्टावरून हे आंकडे घेतले आहेत. यासालीं सरकार, म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांच्या व्यवस्थेखालीं आर्टस् कॉलेजें ३९ व मुलगे व मुली यांच्या साठीं हायस्कुलें ३१० होतीं. कायदा शिकविणाऱ्या संस्था अनुक्रमें १३ व १; वैद्यकी शिक्षणाचीं कॉलेजें ९ व हायस्कुलें १७; इंजिनियरिंग कॉलेजें ४ व स्कुलें ८, शेतकी कॉलेजें ९ व शाळा ०, व्हेटरिनरी अथवा पशुचिकित्सेचीं कॉलेजें २ व हायस्कुलें ०; व्यापारी कॉलेज १ व स्कुलें ४ जंगलविषयक कॉलेज १ व शाळा ०; शिल्पविषयक कॉलेजें ०; शाळा ९; धंदेशिक्षणाचीं कॉलेजें ०, शाळा ७९; हे आंकडे इतर देशांतल्या आंकड्यांशीं मिळवून पाहिले तर हिंदुस्थान सरकार आपल्या कर्तव्याविषयीं पूर्णपणें तत्पर आहे असें खुद्द सरकारी अधिकारी तरी छातीला हात लावून व इमानानें ह्मणण्यास तयार होतील काय? अशा स्थितींत 'उद्धरेदात्मनात्मानं' या मंत्राची कास धरून लोकांच्या पुढाऱ्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाचे

कार्यास स्वतः कंबरा बांधल्या पाहिजेत. अशी राष्ट्रीय शिक्षणाची योजना मिसेस आनी बिझांट बाईंनीं नुकतीच लोकांपुढें मांडून निरनिराळ्या प्रांतांतील लोकनायकांची संमति व सहानुभूति मिळविली आहे. या बोर्डाच्या कामासाठीं स्वार्थाची आहुती देण्यास किती भारतपुत्र पुढें येतात त्यावर या संस्थेची यशस्विता सर्वथा अवलंबून आहे हें सांगावयास नकोच.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यात पश्चिम रणभूमीवर इंग्रजांना मेसिन्स टेकडी व विर्मी हीं दोन विशेष ठिकाणें हस्तगत करण्यांत संपूर्ण यश प्राप्त झालें, व हीं ठिकाणें घेतल्यापासून लढाईला अधिक रंग चढला. या ठिकाणांना विशेष ह्मणण्याचें कारण हीं ठिकाणें जर्मन लोकांनीं अडीच वर्षें खपून दुर्भेद्य केलेलीं होतीं. पण इंग्रजांनीं एका दिवसांत तीं घेतांच शत्रूच्या उरांत एकदम धडकी भरली व जर्मन जिवावर उदार होऊन फेर हल्ले करूं लागले. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. जर्मन सैन्याची चौथी तुकडी जर्मन सेनापति सिक्सूट व्हान आर्नीम यांचे अधिपातित्वाखालीं लढत होती. तिचाही इंग्रजांनीं पराभव केला. मागें झालेल्या सॉम येथील घनघोर लढाईचें हृदयंगम वर्णन लिहिणारे आर्नीम हेच होत. आतांच्या लढाईत ही इंग्रजांनीं विलक्षण बहादुरी दाखविली ही गोष्ट जर्मनशत्रु सुद्धां कबूल करीत आहेत. या लढाईत जर्मनांची भयंकर हानि झाली व इंग्रज सैन्याचें पाऊल यिप्रेसच्या दक्षिणेस पडलें. लेन्सच्या नैर्ऋत्येकडे इंग्रजांचें कनोडियन सैन्य मोठ्या शौर्यानें लढत आहे. त्यानें शत्रूला जेरीस आणून त्यांचे १५० लोक कैद केले अशी बातमी आली आहे.

## इटालियनांची चळवळ.

इटलीच्या हद्दीवर इटालियन लोकांच्या चळवळीची विशेषशी बातमी येत नाहीं. इटालियनांची प्रगति तहकूब आहे असा त्यावरून लोकांचा ग्रह झाला होता. पण इटालियनांनीं जानिना हें ठिकाण घेतल्याची खबर नुकतीच आली आहे. येवढी गोष्ट खरी कीं आस्ट्रियानें पूर्वरणांगणावरून बरेचसे सैनिक, तोफखाना, व दारूगोळा इटालियन हद्दीकडे नेऊन ठेविला आहे व त्यामुळें इटालियनांना थोडासा वचक बसला आहे, पण हा वचक अल्पायु होऊन इटालियन आपलें वर्चस्व व तेजस्विता लवकरच प्रकट करतील अशीं लक्षणें दिसत आहे. खुद्द आस्ट्रियाला आत्मप्रत्यय वाटत नाहीं. तो वाटता तर स्वतंत्र तहाचें बोलणें करण्यासाठीं राशियाकडे डेप्युटेशन पाठविण्याचें त्यानें मनांत आणिलें नसतें, व या डेप्युटेशनची जी फजीती झाली तशी फजीती झाली नसती. जर्मनीच्या ओंजळीनें पाणी प्याल्यानें आपली किती दुर्दशा झाली आहे हें कळत असून सुद्धां नक्राच्या दाढेंत सापडल्याप्रमाणें त्याची अनन्यगतिकता होऊन जर्मनी सांगेल तसें वागणें त्याला प्राप्त झालें आहे पेट्रोग्राडकडे गेलेल्या डेप्युटेशनच्या फजीतीचें जें वर्णन इंग्रजी पत्रांतून आलें आहे तें फार मौजेचें आहे. या डेप्युटेशनमध्यें कांहीं राजकुलीन पुरुष, दोन सेनापति, दोन कर्नलपदस्थ अधिकारी व इतर कांहीं लष्करी अधिकारी व सैनिक होते. हें डेप्युटेशन स्वतंत्र तहाचें बोलणें करण्यासाठीं राशियाकडे जात आहे असें बाह्यात्कारी सांगण्यांत आल्यावरून रूमानियाच्या हद्दीवर त्याला अटकाव करण्यांत आला नाहीं. पण राशियाच्या हद्दींत पाऊल ठेवतांच या डेप्युटेशननें आपला अंतःस्थ हेतु प्रकट करून राशियन सैन्यांत फंदफितुरी करण्याचा डाव मांडला. तेव्हां या डेप्युटेशनच्या सगळ्या मंडळीला एकदम पकडण्यांत आलें आहे. आतां पुढें काय होतें तें पहावें.

## अमेरिकेचा राशियास खलिता.

अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन ह्यांची चिकाटी भयंकर आहे. कोणतेंही काम एकदां हातीं घेतल्यावर त्यांत मनोभावें करून पडावयाचें या त्यांच्या अंगच्या गुणाचा प्रत्यय त्यांचें प्रत्येक कृत्य देत आहे त्यांनीं राशियाला नुकताच एक खलिता लिहिला आहे व त्यांत आपला या युद्धांत सामिल होण्याचा खरा उद्देश स्पष्टपणें कळवून राशियाला बराच पथ्यकर उपदेश केला आहे. प्रे. विल्सन या खलित्यांत लिहितात कीं भ्रातृभाव या शद्बाचा अर्थ खरा करून दाखविण्याची वेळ हीच आहे. तो अर्थ खरा करून दाखविण्याचा उत्तम उपाय ह्मणजे मनुष्यजातीच्या स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या शक्तीला चिरडून टाकण्याचे कामीं अगणित द्रव्य व रक्त यांचा व्यय करण्याची तयारी ठेवावयास हवी. जिंकावयाचें किंवा शत्रूला शरण जावयाचें हे दोनच प्रश्न आतां आपल्यापुढें आहेत. आपणांत एकी कायम राहिली तरच आपण जिंकूं. विजयाबरोबर स्वातंत्र्याचें ही रक्षण होईल. शत्रूविषयीं उदारपणा दाखवावा. पण केव्हां? विजयप्राप्तीनंतर. आतां जर आपण दृढता न ठेवतां जुल्मी राजशक्तीच्या भेद उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाला मोहित होऊन तो भेद होऊं दिला तर आटोपलेंच. आपण जिंकले जाऊं हें मग निश्चितच झालें. तसा प्रसंग येणार नाहीं अशी उमेद आहे.

पेट्रोग्राड येथील इंग्रज वकिलानें ही राशियाला स्वतंत्र तह करण्याचा मोह पडूं नये ह्मणून स्पष्टोक्तीनें सावधगिरीची सूचना दिली आहे. एका सार्वजनिक सभेच्या प्रसंगीं सदर वकिलानें स्पष्टपणें सांगितलें कीं आज पश्चिम रणक्षेत्रावर इंग्रज व फ्रेंच जो स्वतःचा रक्तपात करीत आहेत तो कोणासाठीं? राशियासाठीं. राशियाच्या स्वतंत्र्यरक्षणासाठीं. जर्मनीनें आपलें पूर्वेकडील सैन्य हलवून पश्चिम रणक्षेत्राकडे नेल्यानें राशियाला सध्याच्या गडबडीचे वेळीं आपलें स्वातंत्र्य कायम ठेवतां येत आहे, व इंग्रज आणि फ्रेंच या दोहोंवर जर्मन सैन्याचा सगळा भडिमार होत आहे तरी ते राशियाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ ते उभयतः मुकाट्यानें सोसून शत्रूला लढाईत गुंतवून ठेवीत आहेत. राशियानें आपल्या घरची व्यवस्था नीट लाविल्यावर आपल्या मित्रांवरचा हा भार हलका करण्यास धावून येणें हें त्याचें कर्तव्य आहे. राशियांतली सध्याची स्थिति गेल्या दीड दोन महिन्यापासून विलक्षण झालेली पाहून व जर्मनीचा कावेबाजपणाच्या पाशांत राशिया अडकेल कीं काय अशी भीती वाटून अमेरिका व इंग्रज यांच्या प्रतिनिधींकडून वरील उद्गारांच्या रूपानें मिळालेल्या सूचनेचा चांगलाच परिणाम राशियावर होईल अशी प्रत्येकाची अपेक्षा आहे

## हैदराबाद येथील उस्मानिया युनिव्हर्सिटी.

निजाम हैदराबाद या संस्थानानें अलीकडे शिक्षणाचे बाबतींत बरीच प्रगति केलेली आहे असें दिसतें. त्या संस्थानच्या दरबाराकडून नुकतेंच एक जाहिर पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. त्यावरून कळतें कीं हैदराबाद येथें उस्मानिया नांवाची युनिव्हर्सिटी स्थापन करण्यास निजाम सरकारकडून मंजुरी देण्यांत आली आहे. या युनिव्हर्सिटीच्या योजनेंत एक दोन गोष्टी इतर युनिव्हर्सिट्यांपेक्षां विशेष आहेत. पहिली गोष्ट ही कीं या युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत देशी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्यांत येऊन इंग्रजी भाषा ही अवश्यक विषयांत घालण्यांत येणार आहे. मोगलाईतली देशी भाषा उर्दू असल्यामुळें अर्थात उर्दू हीच भाषा शिक्षणाची मुख्य भाषा राहील बंगाली, मराठी, गुजराथी वगैरे भाषा इतकी ही भाषा परिणत स्थितीला आलेली नाहीं; तथापि या भाषेच्या द्वारें उच्च शिक्षण देण्याचा उपक्रम झाल्यावर तिची परिणाति झपाट्यानें होईल असें एका पक्षाचें ह्मणणें आहे. त्याबरोबरच दुसऱ्या पक्षाला अशी भीती वाटत आहे कीं या योगानें उर्दू भाषेची उन्नत्ति होईल किंवा नाहीं तें सांगतां येत नाहीं, पण अर्धवट परिणत स्थितींतल्या भाषेच्या द्वारें उच्च शिक्षण देण्याचा उपक्रम झाल्यास त्या शिक्षणाची व अर्थात् उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या पदव्यांची किंमत मात्र उतरेल. ही भीती सर्वथा निर्मूल आहे असें आह्मांस पंजाब युनिव्हर्सिटीच्या अनुभवावरून वाटत नाहीं. पंजाब युनिव्हर्सिटीनें प्राच्य व पाश्चात्य अशा दोन शाखा काढून हा प्रयोग करून पाहिला आहे आणि प्राच्य भाषासंबंधानें ती यशस्वी झालेली नाहीं. जी गोष्ट पंजाबांत यशस्वी झाली नाहीं ती निजामशाहींत यशस्वी होणार नाहीं असें खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं ही गोष्ट खरी असली तरी एकंदरींत या नव्या प्रयत्नाची सिद्धि संदेहात्मक आहे हें कबूल करावें लागेल उस्मानिया युनिव्हर्सिटींतली दुसरी विशेष गोष्ट ह्मणजे तेथें प्राचीन आणि अर्वाचीन शिक्षणपद्धतींचा करण्यांत येणारा संयोग ही आहे. हा संयोग घडवून आणण्याचें काम फारच बिकट आहे. तें कसें काय घडवून आणावयाचें तें जाहिरपत्रकांत सांगितलें नाहीं. या युनिव्हर्सिटीची योजना तयार करणाऱ्यापेक्षां ती योजना अंमलांत आणणाराच्या कल्पकतेवर व शिक्षणविषयक अनुभवावर ती गोष्ट विशेषतः अवलंबून राहणार आहे. विलायतेहून एखादा कोरा करकरीत पदवीधर आणवून त्याचवर हें जोखमीचें काम सोपविणें अर्थात् श्रेयस्कर नाहीं. डॉ० ब्रजेंद्रनाथ सील सारख्या प्राच्य आणि पाश्चात्य अथवा प्राचीन आणि अर्वाचीन ज्ञियांत मुरलेल्या विद्वानाच्या हातीं युनिव्हर्सिटीची सूत्रें दिल्यास ही गोष्ट शक्य होईल. एकंदरींत या युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनें निजाम सरकारानें शिक्षण विषयांत एक जंगी उडी मारण्याचा संकल्प केलेला दिसतो. हा संकल्प कसा काय तडीस जातो तिकडे देशांतल्या लोकांचें लक्ष यापुढें लागून राहील.

## शास्त्रीय शोधाचें रहस्य.

शास्त्रीय शोधाचें खरें रहस्य व त्यांची महती आमच्या लोकांस अद्याप कळावयाची आहे. डॉ० जगदीशचंद्र बोस किंवा डॉ० राय यांनीं व त्यांच्या शिष्यवर्गानें आतांपर्यंत केलेल्या शास्त्रीय शोधांना आमच्या लोकांकडून अद्याप कोणत्याही प्रकारें उत्तेजन मिळण्याचें तर राहोच, पण ते करणारांचा नुसता शाद्बिक गौरव ही करण्यांत आलेला नाहीं याचें कारण आमच्या लोकांचें भयंकर अज्ञान हें होय. शास्त्रीय शोधाची किंमत व योग्यता आमचे लोक त्यांच्या व्यावहारिक उपयुक्ततेवरून ठरवितात ही त्यांची मोठी चूक आहे ही गोष्ट थोड्या दिवसांपूर्वी आह्मी एका लेखांत स्पष्ट केला होती. मे महिन्याच्या नवयुगाच्या अंकांत आनंद संपादक रा. वासुदेवराव आपटे यांनीं आपल्या लेखाच्याद्वारें हीच गोष्ट पुनः स्पष्ट केली आहे व वायरलेस वर्ल्ड नांवाच्या एका अमेरिकन शास्त्रीय पत्राच्या मे च्या अंकांत हीच गोष्ट विशेष जोरानें सांगण्यांत आली आहे. हें पत्र ह्मणतें कीं अमेरिकेंत सुद्धां पुष्कळ लोकांची व्यावहारिक दृष्टि खऱ्या शास्त्रीय शोधांच्या प्रगतीच्या आड येत आहे. पण तेथें डॉ. व्हिटने यांच्या सारखे विद्वान् गृहस्थ लोकांचा हा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न जोरानें करीत आहेत. अमेरिकेंत असे अनेक खरे शास्त्रज्ञ शास्त्रीय शोधांत गढलेले आहेत कीं त्यांचीं नांवें अमेरिकन वर्तमानपत्रांतून कधीं झळकलीं नसलीं तरी त्यांनीं चालविलेल्या शोधांवर अमेरिकेचें भवितव्य सर्वथा अवलंबून आहे. डेव्ही, फाराडे, ग्रेहम, रामसे, राले, जे. जे. टॉमसन, केल्व्हिन, क्यूरी, हेलमोल्झ, बुनसेन, हॉफमन इ. शास्त्रीय शोधकांनीं जनतेकडून मिळणाऱ्या उत्तेजनाची किंवा शाद्बिक प्रशंसेची तरी अपेक्षा कोठें केली होती? पण त्यांच्या शोधांमुळेंच अर्वाचीन शास्त्रीय व यांत्रिक, रासायनिक व वैद्युतिक युक्त्या सांपडून राष्ट्राच्या संपत्तींत व एकंदर जगाच्या सुखांत भर पडली आहे. मार्कोनीनें बिनतारेचें तारायंत्र काढल्याबद्दल त्याची प्रसिद्धी होऊन त्याच्या चार पिढ्या संपत्तींत लोळत राहतील इतकें अगणित द्रव्य संपादन केलें; पण त्याच्या शिक्षणाचा पाया हर्झ व हेलमोल्झ सारख्या शास्त्रज्ञांनीं घालून त्याच्या शोधाचा मार्ग सुगम करून दिला होता ही गोष्ट जगाला काय ठाऊक? असो, अशा उदाहरणांवरून शास्त्रीय ज्ञान प्रसाराचे कामीं कसा धीर धरावा लागतो तें हिंदुस्थानानें शिकण्यासारखें आहे येवढेंच आह्मी ह्मणतों.

## एका नव्या खुळाचें अविष्करण.

ब्रिटिश साम्राज्यांतील भौतिक उन्नतीचीं साधनें गोळा करण्याच्या किंवा तशाच प्रकारच्या कांहीं उद्देशानें एम्पायर रिसोर्सेस डेव्हलपमेंट कमिटी नांवाची एक संस्था विलायतेंत सध्यांच्या युद्धामुळें स्थापन झाल्याचें वृत्त आलें आहे. हें काय खूळ आहे याचा उलगडा तारेनें येणाऱ्या संक्षिप्त बातम्यांवरून आह्मांस होत नाहीं. या संस्थेचे नक्की उद्देश काय आहेत, व तिचां काम करण्याची पद्धति, व तिचे हिंदुस्थानासारख्या देशांवर घडणारे परिणाम यांच्यासंबंधानें इकडे पूर्ण अज्ञान आहे ही गोष्ट आह्मी कबूल करतों. हिंदुस्थानांतल्या इंग्रजी वर्तमानपत्रकर्त्यांकडूनही या प्रश्नावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न कधीं झालेला आमच्या पाहण्यांत नाहीं. तथापि गुलामगिरी विरुद्ध चळवळ करणाऱ्या सोसायटीचे अध्यक्ष लॉर्ड हेनरी बेंटिंक यांनीं त्या सोसायटीच्या वार्षिक बैठकीचे वेळीं केलेल्या भाषणावरून त्या कमिटीच्या उद्देशांत व कार्यपद्धतींत कांहीं काळेंबेरें असावें अशी शंका घेण्यास कारण झालें आहे. लॉर्ड बेंटिंक ह्मणतात कीं पूर्वींच्या कांगो स्टेटमध्यें लूट भांडणास ठीं झालेल्या प्रयत्नांतले सगळे दोष या चळवळींत मूर्तिमंत आहेत दुसऱ्या देशांतले खानिज वउद्भिज्ज पदार्थ लुटून आपल्या देशी न्यावयाचे, व त्या देशांतल्या संपत्तीचा ओघ आपल्या देशाकडे वळवून परक्या देशांतल्या लोकांना गुलामगिरीच्या स्थितीला नेऊन सोडावयाचें असा परिणाम या कमिटीच्या उद्योगामुळें होणार आहे. ऱ्होडेशियांतली सगळी जमीन तेथील चार्टर्ड कंपनीचीच आहे असा हक्क सांगणारे सदर चार्टर्ड कंपनीचे अध्यक्ष हेच या नव्या डेव्हलपमेंट कंपनीचे ही अध्यक्ष आहेत, व या कंपनीला इंग्लंडच्या मुत्सद्यांचें पाठबळ आहे. अशा कमिटीच्या प्रयत्नानें आफ्रिकेंतल्या लोकांची भरभराट होऊन ते लोक सुखी होतील हें संभवनीय आहे काय ? असा प्रश्न लॉर्ड बेंटिंक विचारतात व या कमिटीचें ध्येय प्रशियन सरकारच्या ध्येयाहून फारसें निराळें नाहीं असें स्वतःच त्या प्रश्नाचें उत्तर देतात. या कमिटीनें आपल्या कार्यक्षेत्रांत हिंदुस्थानाचा ही अंतर्भाव केला असल्यामुळें या कमिटीचे उद्देश व तिची कार्यपद्धति यांच्यासंबंधानें विश्वसनीय व साग्र माहिती मिळवून आमच्या लोकांनीं स्वतःच्या हिताविषयीं जागृत राहिलें पाहिजे येवढी गोष्ट लॉर्ड बेंटिंक यांच्या भाषणावरून व्यक्त होते.

---

## धोरण चुकलें खरेंच.

विलायतेंत भरलेल्या वॉर कॅबिनेट साठीं हिंदुस्थानचे प्रतिनिधि ह्मणून गेलेल्या त्रिमूर्तींनीं हिंदुस्थानासंबंधानें विलायतेंतल्या व वसाहतवाल्या मुत्सद्यांचे पुष्कळ गैरसमज दूर करून वसाहती व हिंदुस्थान यांची गट्टी जमण्याचा मार्ग सुगम करून ठेविला या त्यांच्या कामगिरीबद्दल आह्मी त्यांस वेळोवेळीं धन्यवाद दिले आहेत. पण त्या बरोबर वसाहतींत इकडून जाणाऱ्या हिंदी लोकांच्या प्रवेशाबद्दलच्या प्रश्नाचे चर्चेच्या वेळीं आमच्या प्रतिनिधींनीं स्पष्टोक्ति करण्याचे कामीं जो कमकुवतपणा दाखविला व हिंदुस्थानचा दर्जा कमी आहे अशाविषयीं अप्रत्यक्ष कबुली दिली त्याबद्दल त्यांना योग्य दोष देऊन जबाब विचारणें हेंही तितकेंच खेदाचें पण अवश्य कर्तव्य आहे असें आह्मांस ह्मणणेंभाग पडतें. वसाहतींत हिंदुस्थानच्या लोकांना गोरे लोकांच्या बरोबरीचे हक्क त्यांनीं मागावयास पाहिजे होते. हिंदुस्थान देश हा ब्रिटिश साम्राज्याचा ताबेदार देश नसून विलायत व वसाहती यांच्या बरोबरीचा पातीदार देश आहे अशी स्पष्ट कबूली इंग्लंडचे खुद्द मुख्य-प्रधान मि० लॉइड जॉर्ज यांच्या कडून मिळाली असतां वसाहतींत जाणाऱ्या हिंदी लोकांना गोऱ्यांच्या बरोबरीचे नाहींत तर नाहींत, पण निदान इतर एशियाटिक लोकांसारखे हक्क तरी आणि तेही शक्य असल्यास द्या अशी याचना करण्यास व त्या गोष्टीस संमति देण्यास या त्रिमूर्तींला हिंदुस्थानच्या वतीनें कोणी अधिकार दिला होता ? बरोबरीचे हक्क मागण्याचें सोडून हिंदुस्थानच्या हक्कास व दर्जास कमीपणा आणणारी गोष्ट त्यांनीं कां कबूल केली ? वगैरे प्रश्नांचे जबाब देण्याची जोखीम या त्रिमूर्तींवर आहे. हिंदुस्थानचे प्रतिनिधि हिंदुस्थानसरकारानें न निवडतां हिंदी लोकांनीं निवडावयास पाहिजेत असें जें हिंदुस्थानचीं पत्रें कंठरवानें आतांपर्यंत ह्मणत आलीं आहेत तें येवढ्याच साठीं. या बाबतींत त्रिमूर्तींचें जें धोरण चुकलें तें हिंदुस्थानसरकारच्या शिकवणीमुळें किंवा त्रिमूर्तींच्या ठायीं असलेल्या दुर्बलतेमुळें याचा उलगडा अवश्य व्हावयास पाहिजे

---

## विविधज्ञान विस्तार.

या मासिक पुस्तकाचें सध्या ४८ वें वर्ष चाललें असून तें जसें सर्व मराठी मासिकांत जुनें आहे तसें भारदस्तपणा, विषयांची विविधता, भाषागौरव, इ० गुणांनीं ही सर्वांत श्रेष्ठ आहे अशी खात्री चालू वर्षाचे अंक जे कोणी पाहतील त्यांना पटल्यावांचून राहणार नाहीं. मे १९१७ च्या अंकाच्या रंगीत मलपृष्ठावर गेल्या पांच चार अंकांतल्या विषयांची अनुक्रमणिका दिली आहे तिजवरून राजकारण, धर्म, नैतिक शास्त्रें, इतिहास, कविता, उद्योगधंदे, मानसशास्त्र, नाटकें, वगैरे विविध विषयांवर व विशेषतः वाङ्मयविषयक चर्चेसंबंधाचे व पुस्तकपरीक्षणात्मक लेख बरेच भारदस्त लेखांनीं हें मासिक भूषित झालें आहे हें दिसून येईल. क्वचित् प्रसंगीं मासिक मनोरंजन कर्त्यासारख्यां बरोबर मनाची क्षुद्रता दर्शविणारा वादप्रसंग संपादक साधतात व त्याच्या योगानें मासिकाच्या भारदस्तपणास लघुता प्राप्त होते, पण तसे प्रसंग टाळण्याची खबरदारी संपादक घेतील तर या मासिकाच्या श्रेष्ठ दर्जास त्यांचें वर्तन साजेसेंच होईल. मेच्या अंकांत बहुतेक वाङ्मयविषयकच लेख आहेत. रा. रड्डी शास्त्र्यांच्या 'भाषातत्त्व' यीं लेखांत जुन्या पुराण्याच गोष्टी आहेत. नवीन तत्त्व कांहींच सांगितलेलें नाहीं, यामुळें वाचकांची निराशा होते. रा. लेले यांचा माळव्याच्या इतिहासावरील लेख फार शोधपूर्वक लिहिलेला असून त्यांत नवी ऐतिहासिक माहिती पुष्कळच आहे. 'भारद्वाज' यांनीं मराठी भाषेचें पहिलें व्याकरण कै० गंगाधर शास्त्री फडके यांनीं १८२२ सालीं प्रथम लिहून तें हस्तलिखित प्रतीवरूनच १४ वर्षेंपर्यंत मराठी शाळांतून शिकविलें जात असे. व पुढें १८३६ सालीं तें छापिलें गेलें असा शोध लाविला आहे. यावरून मराठी व्याकरणाचें जनकत्व कै० दादोबा पांडुरंग यांचेकडून निघून फडके शास्त्री यांचेकडे निर्विवाद जातें. 'सिंधुनद वर्णन' काव्य जुनें येवढ्याच कारणासाठीं पुनः छापिलेलें दिसतें. बाकी त्या काव्यांत विशेष चमत्कृतिजनक असें आह्मांस कांहीं दिसत नाहीं. रा० कोल्हटकरांचें 'मराठी वाङ्मय व स्वावलंबन' या विषयावरील भाषण या अंकांत संपलें आहे. या भाषणाचें पर्यालोचन आह्मी लवकरच करणार आहों. एकंदरींत 'विस्तारा'नें आपला श्रेष्ठ दर्जा अजून कायम ठेविला असून अशा उच्च प्रतीच्या मासिकाला आश्रयाची वाण पडावी याबद्दल कोणालाही आश्चर्य वाटेल. पण याबद्दल जनतेस दोष देण्यापेक्षां प्रकाशकांसच दोष देणें वाजवी आहे. सध्याच्या सारख्या तीव्र स्पर्धेच्या काळांत या मासिकाच्या प्रसाराप्रीत्यर्थ खटपट व्हावी तशी मुळींच होत नाहीं हीच गोष्ट खरी आहे. प्रकाशकांनीं आपल्या अंगची सुस्ती टाकिल्याशिवाय नुसत्या लेखांच्या भारदस्तपणावरच विसंबून राहून चालावयाचें नाहीं हें प्रकाशकांस कळावयास पाहिजे.

---

## पर्जन्यकाल.

### (अनुमानाचीं प्रसादचिन्हें.)

आमच्या देशाची आबादानी पर्जन्यकाळावर सर्वस्वी अवलंबून आहे आणि आमच्या इकडील धान्यें फळें व पुष्पें यांची समृद्धी ह्मणजेच आमचे सर्व जीवित होय. तेव्हां या पर्जन्य कालाविषयीं जितकी माहिती मिळेल तितकी प्रत्येकजण मोठ्या आतुरतेनें वाचीत असतो. सध्यां आह्माजवळ दोन अनुमानें आलेलीं आहेत. एक सरकारी अंतरीक्षवेत्ते राजश्री वॉकर यांनीं केलेलें आहे, आणि दुसरे आमचे एलिचपूरचे "धर्म प्रभाकर" मासिक पुस्तक कर्ते व ज्योतिषी राजश्री विद्याभूषण दीननाथ चुलैट पंडित यांनीं आपल्या भावी संवत्सर फलांत प्रसिद्ध केलेला वर्षा समाचार होय. या दोन्ही भविष्यामध्यें प्रत्येकांनीं आपापल्या अनुमानाचे आधार दिलेले आहेत आणि ह्मणून तें विशेष ग्रहणीय वाटतील. गेल्या ३०।४० वर्षांमध्यें जीं ऋतूमानें नव्हतीं तीं १९१६-१७ सालांत अनुभवास आलीं आहेत. तेव्हां या सालाला सर्वांशीं मिळणारा असा पूर्व सालाचा दाखला कदाचितच आढळेल. तथापि अनुमानाच्या पद्धतीनें पहातां व ज्योतिषाच्या दृष्टीनें ही १९१७ चा पर्जन्यकाल चांगला व विपुलसा होईल असाच तर्क बांधतां येतो. आणि ही अमृतमय आशा सर्वांच्या चेहऱ्यावर चांगली टवटवी हुरूप व उमेदी रेखाटील आणि मनुष्य जितका भावी आनंदांत सुखासीन असतो त्यापेक्षां प्रत्यक्ष आनंद ही अधिक सौख्यकर नसतो.

बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या पर्जन्यावर अपरबर्मा, आसाम, बंगाल, बहार, छोटानागपूर इत्यादि भागांतला पर्जन्यकाळ अवलंबून असतो. अरबी समुद्रांतून येणारें पर्जन्य संयुक्त प्रांत, पंजाब, वायव्य हद्दीवरील मुलुख, सिंध, रजपुताना, मुंबई, सेंट्रल इंडिया, मध्यप्रांत, हैद्राबाद, ह्मैसूर उत्तर मद्रास किनारा आणि ओरिसा इकडे पाऊस आणितात. आणि अरबी समुद्रावर अवलंबून असणारा हा टापू ह्मणजे हिंदुस्थानचा मोठाच भाग होय. दक्षिण अमेरिकेंतील अर्जेंटाइनकडे एप्रिल व मे महिन्यांत हवेचा दाब कमी असेल तर त्याच्या उलट मानानें इकडे पावसाळा अधिक जोरदार होतो आणि ही अनुकूलस्थिती अर्जेंटाइनकडे गेल्या एप्रिल व मे महिन्यांत होती. मे महिन्यांत मॅारिशसकडील हवेचा दाब जसा कमी तसा अरबी समुद्रांतील पावसाचे वारे अधिक जोरानें येत असतात. तसेंच काष्मीर, अफगाणिस्थान, बलुचिस्थान व पर्शिया या हिमालयाच्या भागाला जेव्हां जेव्हां बर्फाचा फैलाव कमी तेव्हां तेव्हां अरबी समुद्रांतील पावसाचें वादळ अधिक जोराचें असतें आणि तसा यंदा योग आहे. झांझीबारकडे एप्रिल मे महिन्यांत जर पाऊस नेहमीपेक्षां अधिक पडला तर तो मात्र अरबी समुद्रांतील पर्जन्यांच्या वाऱ्यांचा जोर कमी करीत असतो आणि एवढीच गोष्ट यंदा प्रतिकूल दिसते. बंगालच्या उपसागरांतील पर्जन्य चांगला होईल असें सिचेलिसकडे जो थोडा पाऊस गेल्या मे महिन्यांत झाला आहे त्यावरून दिसतें. एकंदरीनें पाहतां सरकारी शास्त्रज्ञाच्या दृष्टीनें यंदाचा पावसाळा इंडियांत चांगला होईल आणि झालाच तर थोडा अधिक होईल आणि ही पर्जन्याची विपुलता वर्षाकालाच्या पूर्वार्धांत अधिक दृष्टीस पडेल. हिंदुस्थानच्या वायव्य भागांत हिंवाळा आतिशन तीव्र होता तरी देखील वर्षाकाल प्रतिकूल होण्याचा रंग दिसत नाहीं. विद्याभूषण दीनानाथ यांनीं एक मोठी जंत्री तयार केली आहे आणि बृहत्संहितेच्या आधारानें वर्षाकालाची जन्मपत्रिच तयार केली आहे. त्यांनीं वाराही संहितेच्या आधारें निरनिराळ्या भागाचे अक्षांश रेखांश घेऊन सुमारें ४० मुख्य मुख्य शहरांची यादी त्यांच्या अक्षांश रेखांशासह देऊन त्या गांवावर कोणत्या नक्षत्राचा व ग्रहाचा योग आहे हें पाहून वर्षाप्रमाण इंचामध्यें दिलेलें आहे. त्यांनीं हें सर्व टिप्पण तयार करतांना सूर्यादि ग्रहांचीं सप्तनाडीचक्रें व इतर योग हीं दिव्य कारणें लक्षांत घेतलीं आहेत. तसेंच मार्गशीर्ष शुक्लपक्षामध्यें पूर्वाषाढा नक्षत्राला चंद्र आला तेंव्हा पासून पर्जन्याचीं गर्भलक्षणें त्यांनीं पूर्वींच टिपून ठेवलीं आहेत व त्या वेळचे वायु, बादल, विजवी गांज, संध्या क्षितीजें, दिग्दाह, इंद्र धनुष्य इत्यादि अंतरीक्ष गोष्टी त्यांनीं पूर्वींच नमूद करून ठेवलेल्या आहेत. आणि त्यांच्या आधारें मार्गशीर्ष मासांतल्या गर्भावळीच्या मेघावरून १९५ दिवसांनीं प्रसव पावणाऱ्या वर्षाकालाच्या गोष्टी यांत नमूद केल्या आहेत. ज्यांना ज्योतिष शास्त्राची गोडी नाहीं त्यांनीं देखील हें संवत्सर फल एलिचपुराहून बोलाऊन घेऊन मनाची करमणूक करून शिवाय किती किती अज्ञान विषयामध्यें मनुष्याची दृष्टी पोचली आहे हें पाहून भारतीय ज्ञानसमुद्रांत कांहीं वेळ चमत्कार

दृष्टीनें बुडी मारावी हें आह्मी मोठ्या आनंदानें सुचवितों.

---

## सुंदर भविष्य.

**( ब्रिटिश साम्राज्याची भावी फत्ते. )**

विद्याभूषण दीनानाथ शास्त्री चुलेट यांनीं असें एक भविष्य वर्तविलें आहे कीं येत्या आश्वीन वद्य ८ (भारु) सोमवार या दिवशीं शनी व मंगळ या दोन्ही पापग्रहांची युती आहे तेव्हां त्या दिवशीं हल्लीं चालू असलेल्या महायुद्धांत ब्रिटिश सरकारचा मोठा विजय होईल आणि जर्मनीचा संहार होईल. तसेंच सिद्धांत दैवज्ञ विनोद ग्रंथामध्यें सांप्रत पिंगल संवत्सराला जुन्या संवत्सराच्या गणना पद्धतीनें शुक्ल संवत्सर ह्मटलें आहे आणि या संवत्सराचा स्वामी रुद्र आहे ह्मणून—

"छत्रभंगो म्लेच्छ देशेषु मंत्रिणो राज्यम्"

या वाक्यावर जोर देऊन विद्याभूषण दीनानाथ-शास्त्री असें लिहितात कीं आमच्या समजुतीप्रमाणें उदंड अधर्मी जर्मनी देशांत प्रजासत्ताक राजपद्धती सुरु होईल आणि आस्ट्रिया व जर्मनी या दोन्ही देशांतील कोणत्या तरी एक राजाचें छत्र भंग पावेल.

आमच्या मतानें वरील भविष्य अगदीं अर्थपूर्ण आहे आणि त्याला प्रारंभ रशियन झारच्या छत्रभंगा पासून पूर्वींच झालेला आहे. आणि तेथील मंत्रि राज्य इतर देशासही कित्ता घालून देत आहे. अमेरिकेचे प्रेसिडेंट राजश्री विल्सन हे महामुत्सद्दी असून भविष्य कालाला चांगले प्रवर्तन देणारे आहेत. त्यांनीं आयर्लंडला स्वराज्य देण्याविषयीं मोठ्या आग्रहानें इंग्लंडचे राजकीय डोळे चांगले उघडून दिले आहेत. आणि आयर्लंड ज्या नावेंत बसलें आहे त्याच नावेंत आमचा इंडिया देश आहे. तेव्हां आर्यसंस्कृतीचें जें मूळ आदिपीठ त्या आमच्या देशावरून प्रेसिडेंट उइल्सन यांचा डोळा फिरला नसेल असें नाहीं; पण ब्रिटिश साम्राज्यासारख्या उदार व वैभवशाली दृष्टीला आयर्लंडच्या नामनिर्देशापेक्षां अधिक इशारा नको आहे अशी समजूत होणें स्वाभाविक आहे. पण आमच्या इकडील स्वराज्याच्या मोहिमेची जी सिव्हिलियनशाहीनें पदाक्रांती आरंभिली आहे तिच्याकडे पाहता आमच्या राष्ट्राच्या रोग निवारणार्थ आह्माला प्रेसिडेंट उइल्सन या अमेरिकन धन्वंतऱ्यास आमंत्रण करून त्यांची आयर्लंडची दिव्य औषधी त्यांनीं इंडियाला देण्यासाठीं ब्रिटिश पार्लमेंटाकडे धाडावी असा राष्ट्रीय निरोप धाडण्याचा प्रसंग समीप येत चालला आहे.

---

## राष्ट्रीय विद्याखातें.

**( सरकारी विद्याखात्याचा संध्याकाळ )**

सरकारी विद्याखातें असावें तितकें प्रगमनशील नाहीं आणि विद्यार्थ्यांना त्या खात्याच्या नियमांनीं व बंधनानीं एक प्रकारची कैदच झालेली आहे. शिक्षणाचे संस्कार विद्यार्थ्यांचीं मनें विकसित करण्यासारखे पाहिजेत. पण विद्यादानाच्या बाबतींतही तीं तरुणमनें खुरटलीं जात आहेत. आईबापापुढें सरकारी विद्याखात्याचा मोठा प्रश्नच येऊन पडलेला आहे. कधीं कधीं तर असें वाटतें कीं या वर्तमान शाळा बंद होतील तर दुसऱ्या अधिक उपयुक्त शाळा निघण्याचा सुयोग येईल. मुलांनीं अराजक होऊ नये ह्मणून आह्मी त्यांना हल्लीं शाळांत पाठवीत असतों. पण प्रस्तुतच्या धोरणामुळें त्यांचीं शरीरें जरी सिव्हिलियनशाहीला प्रतिगामी होत नसतील, तरी मनें दूषित व विकृत होतात असा आमचा पक्का ग्रह आहे. सरकारी विद्याखातें बंद पडण्याचा काळ कांहीं फार दूरचा दिसत नाहीं हल्लींचा पितृवर्ग पैशाच्या अभावामुळें नडला आहे व त्यांना त्यांच्या उत्कर्षाच्या कल्पना मूर्तिमंत करण्याच्या शाळा काढण्याचें त्यांच्यापाशीं द्रव्यबल नाहीं. निरुपायामुळें सरकारी विद्यातुरुंगखान्यांत मुलें धाडलीं जातात पण जर राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा यक्षिणीच्या कांडीनें उद्या सुरू होतील तर सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांचें एक फुलपाखरुही तेथें दृष्टीस पडणार नाहीं आणि मग सरकारला आपल्या विद्याखात्याची खरी जाणीव उत्पन्न होईल. राष्ट्रीय शिक्षणाची सध्या मोठी उणीव आहे आणि ती उणीव लक्षांत आणून श्रीमती बिझांटबाईनें नव्या विचारावर चालवावयाचें विद्याखातें निर्माण करण्यासाठीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील थोर थोर गृहस्थांना विनंति केली आहे. राष्ट्रीय युनिव्हर्सिटी काढण्याचा त्यांचा विचार आहे आणि हिंदू युनिव्हर्सिटीच्या कामासाठीं जसें बनारसचें सेंट्रल हिंदु कॉलेज अर्पण केलें त्याप्रमाणें सध्या ही त्या थिआसाफिक विद्यादस्टंफडाच्या लक्षावधि रुपयांच्या भांडवलाकडे व संस्थाकडे अर्पण बुद्धीनें बोट दाखवून सर्व इंडियन राष्ट्राला हा राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं बोलावीत आहेत. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न १९०६-०७ सालाचे सुमाराला अगदी कृतींत उतरण्याच्या पंथास आला होता आणि त्या वेळची ती स्वदेशी व तोबहिष्कार मध्यंतरीं दडपशाहीमुळें मोडकळीस आला नसता तर या भित्तीला सरकारावरील विद्याखात्याचा बोजा ही उतरण्यांत आला असता आणि तेव्हां तो प्रयत्न फसला. पण त्याचीं कारणें दूर करण्यासाठीं स्वराज्यच लाभलें पाहिजे असा संकेत सर्व राष्ट्रमय पसरल्यानंतर पुनः राष्ट्रीय विद्यादानाचा प्रश्न लोकांपुढें येत आहे आणि तो या महायुद्धानंतर होणाऱ्या स्वराज्याच्या क्रांतीनें यशस्वी होण्याचीं प्रसादचिन्हें आमच्या डोळ्यापुढें खेळत आहेत, जर कोट्यावधि रुपये युद्धासाठीं लोक राज्यकर्त्यांना अर्पण करितात तर विद्यादानासाठीं तितक्याच कोट्यावधि रकमेची उभारणी निमिषमात्रांत होईल असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. लोकांच्या वृत्तीच तितक्या जागृत व्हावयाला पाहिजे आहेत.

---

## भीष्म प्रतिज्ञा.

**( इंडियन अँड्रोक्लीज )**

सर. एस. सुब्रह्मण्यम् आयर के. सी. एस. आय. पेन्शनर ॲक्टींग चीफ जस्टिस यांनीं मद्रास सरकारास किंबहुना इंडियन सरकारास असें कळविलें आहे कीं या महायुद्धानंतर इंडियाला स्वराज्य पाहिजे हें माझें परम पवित्र ध्येय आहे. हें ध्येय लॉर्ड पेंटलंडच्या ह्मणण्याप्रमाणें सरकार बेकायदा ठरवील आणि त्या ध्येया निमित्त दडपशाही सर्वत्र प्रचलित होईल तर माझें सर्वस्व हरण झालें, कायद्यानें शिक्षा भोगावी लागली तरी मी त्या स्वराज्याच्या परम पवित्र ध्येयाला काडिमात्र अंतरणार नाहीं. श्री दादाभाई नौरोजी या महर्षींच्या योग्यतेचे सर सुब्रह्मण्यम् अय्यर हे लोकवंद्य राष्ट्रभक्त आहेत. त्यांची ही भीष्म प्रतिज्ञा इंडियन लोकांचीं मनें स्वयंस्फूर्तीनीं उचंबळून सोडील आणि स्वराज्य स्वराज्य स्वराज्य अशा त्रिवार शपथेनें स्वराज्यवादी मंडळी आपलीं मनें, आपली वाणी व आपली कृती पुनीत केल्याशिवाय राहणार नाहीत. सरकार जरी सिंहा सारखे प्रथमतः भासतील तरी या निःशस्त्र प्रतिकाराच्या योजनेंत इंडीयन प्रजेंतला अँड्रोक्लीज अखेरीला ओळखून काढतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—या सप्तकांतील उघाडीमुळें पेरण्याची गर्दी उडाली आहे. गर्मी विशेष होते आणि जोराचा पाऊस या अमावास्येनंतर येईल असा रंग दिसतो. किरकोळ उन्हाळ्याच्या आजारापलीकडे मोठी रोगराई अशी कोणतीच नाहीं.

रा. रा. पुंडरीक ज्ञानेश्वर जोशी आफिशिएटिंग सबॉर्डिनेट जज्ज आकोला यांच्या कोर्टावर रा. रा. विनायक सीताराम देव हे या आठवड्यांत रुजू झाल्यानंतर राजश्री जोशी हे खांडव्याच्या कोर्टावर रुजू होतील. त्यांची नेमाडची कारकिर्द अधिक यशस्वी होऊन त्यांस मनुष्य स्वभावांतल्या मैत्रीविहाराची ओळख अधिक अधिक पटत जावो अशी आह्मी आशा करतों.

खान बहादुर माणिकशा रतनजी दस्तूर डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज यांनीं पेनशन घेतलें आहे. हे वऱ्हाडचे जुने अधिकारी असून त्यांची न्यायबुद्धी सर्वांच्या परिचयांतली आहे. आतां यापुढें त्यांचा पेनशनीचा काल वादी प्रतिवादीच्या खटाटोपीपेक्षां विशेष उपयुक्त अशा सार्वजनिक कार्याला लाभल तर त्यांची चिकटी व सरळमार्गीपणा अधिक फलदायी होईल.

खानबहादूर दस्तूर साहेबांच्या पेनन्शनदारीमुळें त्यांचा डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्जाचा हुद्दा रा. रा. प्रेमनारायण सब जज्य वर्ग १ यांस देण्यांत आला आहे. ही त्यांची बढती सर्वांस यथायोग्य वाटेल.

रा. रा. सयद अब्दुर रहिमान ए. अ. कमिशनर यवतमाळ यांची बदली आकोल्यास करून येथून पंडित जयनारायण साहेब यांस यवतमाळास बदललें आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डेप्युटी कमिशनर यांची स्पेशल ड्यूटी संपतांच ते आकोला जिल्ह्यांतच परत येत आहेत ही आनंदाची गोष्ट होय या जिल्ह्यांची त्यांच्या कारकिर्दींत पुष्कळ सुधारणा नव्या जुन्या होत आहेत व ग्राम पंचायतीचा प्रश्नही सध्या उभा आहे तेव्हां ही नेमणूक सर्वांस विशेष आवडेल.

**कोर्टांतील भांडणें**:— १९१६ सालच्या दिवाणी न्यायखात्याच्या रिपोर्टावरून पाहातां १९१६ सालीं मध्यप्रांतांत ९२६८८ दावे व वऱ्हाडांत ३९२९३ दावे दाखल झाले. दोन्ही संख्यांची एकुणात १९१५ सालापेक्षां सरासरी १७॥ हजार दाव्यांनीं वाढली आहे. ही दाव्यांची वाढ लोकांची नैतिक उन्नति दाखविते किंवा महायुद्धाची बेफिकिरी दाखविते हें कांहीं समजत नाहीं. अदालतींची एवढी भरभराट गेल्या १० वर्षांत कधींच नव्हती.

**मॅट्रिक्युलेशन**— परीक्षेचा निकाल गेल्या शनिवारीं येथें कळला. अलाहाबाद युनिव्हर्सिटीनें या परीक्षेंत मोठी कत्तल केली आहे असें दिसतें. आकोला हायस्कुलांतील ८१ पैकीं १९ पसार झाले असें कळतें. उमरावतीचा निकाल येथल्यापेक्षां थोडासा बरा आहे नापास विद्यार्थ्यांची पुढें सोय काय हा प्रश्न डोळ्यापुढें उभा राहातो.

**नादारी**— अलीकडे समाजांतील मध्यम वर्ग मोडकळीस येत चालला आहे याची कल्पना लोक नादार बनण्याविषयीं वर्षानुवर्ष अधिकाधिक अर्ज देऊ लागेल आहेत यावरून होते. गेल्यावर्षी हे अर्ज १९३७ होते आणि पूर्वींच्या वर्षापेक्षां हे सरासरी २४३ नें अधिक होते.

रा. रा. मोरेश्वर बाळकृष्ण गर्दे एम. बी. बी. एस व रा. रा. बी. जे. अजवानी एम. बी. बी एस. यांस अनुक्रमें यवतमाळ व उमरावती येथें असिस्टंट सर्जन नेमण्यांत आलें आहे.

**युद्धकर्ज**— मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून १४ जूनच्या तारखेला हा युद्ध कर्जाचा आंकडा ६८७५९०० रुपये पर्यंत पोचला आहे ही समाधानाची गोष्ट होय. हल्लींच्या अडचणीच्या प्रसंगीं लोक राजनिष्ठेनें इतके पुढें आले याबद्दल आमचे स्थानिक सरकार संतोष प्रदर्शित करतील अशी उमेद आहे. त्याशिवाय लोकांची ही जास्त विचारणा दिसते कीं सरकारी अधिकारी कोणत्याच सार्वजनिक कार्यांत वर्गणी फारशी देत नसतात असा बोभाटा आहे. तेव्हां नामदार चीफ कमिशनरपासून हजार रुपये पगारापर्यंतच्या मोठाल्या ऑफिसरांनीं ज्या वर्गण्या दिल्या असतील त्यांचे आंकडे लोकांच्या जिज्ञासेसाठीं प्रसिद्ध होतील तर बरें!

**अभिनंदनः**— रा. रा. नरहर चिंतामण बरवे अकाउंटंट पी. डब्ल्यू डी. आकोला यांस महाराज बागेच्या सोडतीमध्यें ८१ शे रुपयांचें पहिलें बक्षीस मिळालें ही आनंदाची गोष्ट होय.

**गाजराची पुंगीः**— सोडत हा तरी एक मौजेचा खेळच होय आणि युद्धकर्जानें हा खेळ सशास्त्र ठरला आहे. आमच्या आकोल्याच्या बोट क्लबची ही सोडत निघणार होती; पण ती गाजराची पुंगी कोठें फुटली कांहीं कळलें नाहीं. कदाचित आकोल्याची हवा सोडतीच्या खेळाला नागपूरच्या सारखी अनुकूळ नसेल!

---

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

**मुंबई न्याकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।१।०९
नो नं १

Lyon Scott
एजंट

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १।, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १।, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८०.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सांखीं व वाकन्याचीं वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकरणीं, तारें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सो न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निवळण्याची भीति बाळगण्या चें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन-साची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशुअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटांची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशुअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा.

## प्रारब्धपरीक्षा

### फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागविणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करून पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवावे उत्तर १ रु ८४ चे व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरून एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तों चीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ८४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ८१ तिकीट पाठवा.

ज्योतिषी दा. दाजि शास्त्री नं. १०३७
नो. नं. ७३ नाशिक

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. ३. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सगाची २-३-४; अंगठी १; मळे अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव— मुंबई
नो० नं० ९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३६ गो० १ रु० ७३ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७३ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्राची लाली, सकाचें, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रेल्वेनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख २५ माहे जून सन १९१७ ई० [अंक २५

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची– परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १।. रु. (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १।. (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतची फुलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईतास ३।. सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळववे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८– आण्याच तिकिट पाठवावे.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांद्वडकर
पेठ— नाशिक

नो० नं० ७३

### नोटीस

नोटीस बेशमी रंगू मर्द आसरू तेली रा० सागवण व बुलडाणा प्रगणें देउळघाट ता० चिखली जिल्हा बुलडाणा

हिसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझी मुलगी नामे तानू ही माझी लग्नाची बायको असून लग्न होण्यास आज ७-८ वर्षें झालीं. तेव्हां पासून ५।६ वेळां माझे येथें नांदण्यास आली. ती वयांत आल्यापासून माझे येथें एक सारखी एक वर्षभर आनंदानें राहिली. परंतु तारीख २६-४-१७ या दिवशीं तूं माझे येथें पाहुणी येऊन ७।८ दिवस राहिली. त्या तुझ्या राहण्यामध्यें त्वां माझे बायकोस कांहीं उलट्या सुलट्या थापा देऊन तिचें मन वळवून तीस ( माझे बायकोस ) तारीख ३-५-१७ इ रोजीं सकाळी मी गुमीस गेलो असतां माझे मागे माझे बायकोस अंगावर असलेल्या डागीन्यासुद्धां घेऊन गेली ते दागीने खालीं लिहिले प्रमाणें—

किं. रु

८० पायांतील तोळे चांदीचें वजन तोळे ८०
४० तोड्यावरचे कडे भरीव वजन तोळे ४०
५० दंडवाळ्याचा जोड एक चांदीचा तोळे५०
१६ हातांतील कडे जोड एक चांदीचा तोळे१६
१६ हातांतील पाटल्या जोड एक चांदीचा वजन तोळे १६
२० गळ्यांतील साखळी चांदीची वजन तोळे२०
२५ गळ्यांतील सरी चांदीची वजन तोळे २५
१०४ पुतळ्या सोन्याच्या १३ वजन तोळे ४
१९॥ नाकांतील नथ ४ गुंडासुद्धां वजन मासे ९ मोती वेगळे
१४ नथीचे मोती किंमत रुपये
२६ कानांतील बाळ्या ४ चार सोन्याच्या वजन तोळा १
४५ पितांबर येवल्याचा खरा एक किंमत ४५
१९॥ पंखे सोन्याचे वजन मासे ९
४७५

येणें प्रमाणें वरील किंमतीचे दागीन्यासुद्धां माझे बायकोस माझे घरी नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत माझे स्वाधीन करून दागीन्याची भरपाई करून घ्यावी. असें न केल्यास मला रितीप्रमाणें तजवीज करावी लागेल, तूं मला नोटीस दिली त्यांत तूं असें लिहिले कीं, मी माझे बायकोस मारहाण केली म्हणून ती मज जवळून आली, असें कांहीं तरी खोटे नाटे लिहून तुझा इरादा माझे दागीनें दबकावण्याचा दिसतो. तुझी चाल चलणूक कशी अहे हे बहुतेक लोकांत माहीत आहे. मी गुमी वरून घरी परत आल्यावर दुसरे दिवशी तुझ्याकडे माझे बायकोस घेऊन जाण्याकरितां आलो असतां तूं उलट मला शीवीगाळ करून फारकती मागु लागली व माझी बायको मजबरोबर न पाठवीतां नंतर मला तिच्या खाण्याबद्दल ५ पांच रुपये पगार देण्याबद्दल नोटीस दिली. तर अशानें माझे दागीनें तुला पचणार नाहींत, व फारकती ही मिळणार नाहीं व तुझे मनाचा हेतू ही सिद्धीस जाणार नाहीं हे लक्षांत ठेवावे कळावे ता० ११-६-१७ इ.

सही
तोताराम तुकाराम तेली राहणार
साखळी बु० ता० चिखली
जिल्हा बुल्डाणा

नो. नं. २६७

### जाहिर नोटीस

परमपूज्य मारोतराव नागोजी मुळे मराठी उदनापुरकर हल्लीं मुक्काम रिसोड ता. वाशीम जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार मंजुळा मर्द मारोती मुळे इजकडून या नोटिशीचेद्वारें विनंती करण्यांत येते कीं, तुम्ही माझे नवरे आहां. लग्न होऊन १२ वर्षें झालीं तुमचा पत्ता नाहीं. लग्न झाल्यापासून तुम्ही केव्हां ही माझी ने आण केली नाहीं. त्यामुळें मजला लोकाचे कर्ज काढून माझा उदरनिर्वाह करावा लागतो. करितां विनंती केली आहे तरी ही जाहीर नोटीस आपणास पोहोंचल्यापासून १५ दिवसाचे आंत मौजे लावण ता. मेहेकर ह्या गांवीं मजला रुपये ६० सहाशें झालेले कर्ज फेडून टाकून मजला घेऊन जावे. मी तुमचे येथें येऊन नांदण्यास तयार आहे. याप्रमाणें सदर्हू मुदतींत तुमचेकडून घडून न आल्यास मुदती बाहेर मी दुसरा नवरा करीन. मग तुमचा मजवर कोणतेही प्रकारें नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. कारण हिंदु धर्म शास्त्राप्रमाणें १२ वर्षें ज्या मनुष्याचा पत्ता नाहीं, त्या मनुष्याचा कोणते ही प्रकारें त्याचा आपले बायकोवर हक्क चालत नाहीं. तथापि एकवेळ आपणास सूचनार्थ ही जाहीर नोटीस केली आहे कळावें. ता. १६-४-१७ इसवी

सही
मंजुळी मर्द मारुती निशानी बांगडी
दस्तुर गणपती वा। लक्षुमन

नो. नं. २६८

### नोटीस

नोटीस बनाम केन्या वा। तुळशा मांग रा. मौजे पिंपरी वायचाळ ता. इंगोले मोंगलाई

यांसः—

नोटीस देणार हन्या वा। श्रावण्या मांग रा. मौजे वाघोली बुजरुक ता. वाशीम याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी मुलगी नामें रुपी इचे लग्न तुझा बरोबर झाल्यास १६ वर्षें झालीं. व ती जाणतीझाल्यास ८ वर्षें झालें. तेव्हांपासून मी आपले मुलीस १०।११ वेळां तुमचे घरीं आणली परंतु तुम्ही मुलीस नांदावित नसून अन्नवस्त्र ही देत नाहांत. व माझ्या मुलीस मारहाण करून हाकून देतां. याप्रमाणें अनेकवेळा तुम्ही केले. व तुम्ही दुसरी बायको बरोबर संसार करितां. सबब मी आपले मुलीस लोकांचे कर्ज काढून तिचे पालन पोषन केले, ते ८ वर्षांचे रुपये दरसाल ५० रुपयेप्रमाणें रुपये ४०० ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आणून द्या, व आपली बायको घेऊन जा नाहीं तर ही नोटीस फारकती समजून तिला दुसरा नवरा करून देऊं. मग तुमचा कोणतेच प्रकार तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें. तारीख १९ ६-१७

सही
हन्या वा। श्रावण्या मांग याची
निशानी रेघ असे

नो० नं० २६९

### नोटीस.

मी खालीं सही करणार सर्वत्र शेट सावकार यांस कळावितो कीं माझी सावत्र आई नामे उमाई मर्द रावजी कोरडे राहणार मौजे फाळेगांव थेट तालुके वाशीम जिल्हे आकोला ही मजपासून विभक्त आहे. इचे पोटीं माझे बापाचे पोटचे मुलींच संतान नाहीं हल्लीं माझे ऐकण्यांत आले आहे कीं हीं माझी वडलोपार्जीत इष्टेट गहाण खरिदी अगर बक्षीस करून देणार करितां मी सर्वत्र शेटसावकार यांस कळवितो कीं सदरहु जवळून माझी वडलार्जीत इष्टेट स्थावर किंवा जंगम खरीदी गहाण अगर इतर रीतीनें बक्षीस किंवा शेत पोट मक्त्यानें अगर बटाईनें केल्यास ते खरे मानले जाणार नाहीं व मी त्याजबद्दल जबाबदार नाहीं ही नोटीस दिली सही तारीख ९-६-१७

सही
सिताराम वल्लद रावजी कोरडे रा
हणार फाळेगांव थेट याचे स-
हीची निशाणी रेघ असे

नो० नं० २७०

### नोटीस

नोटीस बेशमी उमाई मर्द रावजी कोरडे राहणार मौजे फाळेगांव थेट तालुके वाशीम जिल्हे आकोला

यांसीः—

नोटीस देणार सिताराम वल्लद रावजी कोरडे राहणार मौजे फाळेगांव थेट तालुके वाशीम जिल्हे आकोला कारणें नोटीस देतो कीं माझा बाप नामे रावजी वल्लद खंडुजी यांस दोन बायका असून तूं धाकटी गंधर्वाची आहेस मी वडील बायकोचा मुलगा असून तुझे पोटीं मुलींच कांहीं संतान नाहीं. हल्लीं माझे बापाची स्थावर व जंगम इष्टेट आहे त्या इष्टेटींत भाऊ बिरादर अगर कोणाचा हिस्सा नसून मी त्या इष्टेटीचा हक्कदार आहे व तूं माझी सावत्र आई असून तुझा फक्त मजवर अन्नवस्त्राखेरीज दुसरे कशाचाही हक्क नाहीं. तुजपाशीं माझे बापाचे हातचा डागीना चांदी सोन्याचा व नगदी मिळून अजमास रुपये ४०० चारशेचा आहे तो माल तुम्ही अफरातफर करून मजला अन्नवस्त्र मागीत आहा तरी तो माल माझे स्वाधीन करून अन्नवस्त्र घेत जावे. अन्नवस्त्र खेरीज मी तुम्हास कांहीं देणार नाहीं तुम्ही दुसरा घरोबा करून गेल्यास तोही अन्नवस्त्राचा हक्क मजवर मुळींच राहणार नाहीं व मी देणार नाहीं. तुम्ही माझे वडिलार्जीत इष्टेट स्थावर अगर जंगम गहाण, तारण गहाण, खरिदी, बक्षीस, अगर विक्री केल्यास ते खरे समजले जाणार नाहीं. माझे बापावर मुळींच आज दिवस पावेतो कोणतेच प्रकारचे कर्ज नाहीं. हल्ली तुमचे पाशी असलेला डागीना दंडातील कोपऱ्या नग २ वजन तोळे ३० अजमास गोफ चांदीचा गळ्यातील वजन तोळे ३० अजमास सरी चांदीची वजन तोळे ३० अजमास कडे चांदीचे २ हातांतील वजन तोळे १०

अजमास एकुण चांदी तोळे १०० अज मास व सोन्याच्या पुतळ्या नग ५ वजन तोळे ३ अजमास कानांतलि बाळ्या नग ८ वजन तोळे २॥ अजमास बाळी १ सोन्याची माझे बापाचे कानातील वजन तोळा १ अजमास व नथ नाकातील १ वजन तोळा १ अजमास एकुण सोने वजन तोळे ७॥ अजमास व नगदी रुपये १२५ अक्षरी सव्वांशे येणेंप्रमाणें डागीने व नगदी रुपये आणून देणें न आणून दिल्यास मी तुह्मास अन्नवस्त्र देण्यास पात्र नाहीं कळावें तारीख ९।६।१७

सही

सिताराम वल्द रावजी केरडे राहणार फाळेगांव थेट याची नि० रेघ असे

नो० नं० २७१

## नोटीस

नोटीस बेशमी रजब हिराजी कसई रा० सिवना तालुके सिल्लोड जिल्हा औरंगाबाद

यांसी:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस करण्यांत येते कीं मी तुमचे लग्नाची बायको असून लग्न झाल्या दिवसापासून तीन हप्ते तुमचे घरीं ठेऊन नंतर माझे आंगा आंगावरील सर्व डागीने काढून घेऊन मजला माझे आईबापाचे घरी तुह्मी आणून घातले. आज लग्न होऊन सरासरी साडे तीन वर्षे झाले. मी माझे बापाचें घरीच आहे. तुह्मी मजला आजपावेतो नेले नाहीं. सबब मी अन्नवस्त्राकरितां महमद आकबर महमद हुसेन सौदागर यांचेपासून कर्ज रुपये तीनशे ३०० काढून आजपर्यंत सोय करून घेतली. तरी या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून पंधरा १५ दिवसाचे आत महमद आकबर महमद हुसेन सवदागर याचे रुपये देऊन माहेरबद्दल ठरलेलें रुपये १२५ सवाशे व दोन दिनार चांदीचे वजन तोळे पांचचे देऊन मजला घेउन जावें तसे न केल्यास मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. पुढें तुमची सबब कांहीएक ऐकली जाणार नाही तारीख १४-६-१७

दस्तुर जानकीराम जयराम कुळकर्णी.

सही

आजीमबी मर्द शेक रजबजी आंगठा खुद

साक्ष

बन्सी वा कासीराम दस्तुर खुद

नो० नं० २७२

## नोटीस.

निंबी मर्द लक्ष्या महार राहणार ह्मसोल तालुके मंगरूळपीर जि. आकोला

ईसः—

खालीं सह्या करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मौजे पेळगांव तलुका मंगरूळपीर येथील शेत

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| ७२ | २९८३ | ३९ |
| ९३ | २४८१७ | १६ |

हीं दोन शेतें आमचा बाप लक्ष्या वा पामनाक महार यानें संपादन केली असून तो त्याची वहिवाट करित होता. आमची आई रमी ही लग्नाची असून आमचे बापानीं तुला गंधर्वानें केले, माझा बाप मेल्यानंतर वरील शेताची वहिवाट माझी आई करूं लागली तों ही मरण पावली, त्या गोष्टीला १०-११ वर्षे होत आली. हल्लीं तीं शेतें तुझे ताब्यांत असून आमचे बापापासून पुत्र संतती वगैरे कांहीं झाली नसून तूं एकटीच शेताचे पीक खात आले परंतु अलीकडे आमचे ऐकण्यांत असे आले कीं तूं सदहू शेताचि पीक आपले भावाकडे देत असून त्यांचे उत्पन्ना पैकीं आमचे करितां कांहींच ठेवित नाहींस. फक्त ती वाहून आपली उपजिवीका करावी, असें असून तूं त्यापिकाची नासधूस करून वाटेल त्या रीतीनें त्याचे उत्पन्न आपले भावाचे घरीं देत असते व आमचे बापाची जंगम जिनगी ही तूं आपले भावाचे घरीं लांबविली आहे, व हल्लीं तूं ती शेतें विकण्याचे बेतांत आहेस, करितां या नोटिशीनें कळवितो कीं आमची शेतें आमचे ताब्यांत द्यावी, व आज पावेतो पिकाचे उत्पन्नाचा हिशोब द्यावा अगर ही शेतें तूं कोणास गहाण खरेदी दिल्यास त्याची जबाबदारी आमचे शेतावर नाहीं. तसें जर तूं न केल्यास दिवाणींत दावा केला जाईल. इसवी तारीख १५-६-१७ इ. दस्तुर मारोती हरबाजी देशमुख राहणार बोरगांव खुर्द

सह्या

सकी मर्द कोंड्या महार रा. वई ता. मुर्तिजापूर निशानी आंगठा असे

कपुरी मर्द माहाद्या महार रा कळंब ता. मंगरूळपीर निशानी आंगठा असे

नो० नं० २७३

## नोटीस.

नोटीस बेशमी दत्ताजी रामचंद्र गावंडे पाटील राहणार बाभुळगांव जहागीर ता० आकोला जि० मजकूर

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० १९-८-१७ इ. रोजी रक्कम रु० १५०० शांत आमचे जवळून स० नं० १८२ व स० नं० १२८ अशीं दोन शेते विकत घेतली व त्याजबद्दलचें खरेदीखत ही आह्मी तुह्मास करून दिले आहे. सदहू भरण्याचे रुपयांत फक्त ३२२ रु. आह्मास पावले आहेत. बाकी ६७८ रुपयांची प्रॉमेसरी नोट ता० १९-८-१६ ची तुह्मी आह्मास करून दिली आहे आणि आह्मी तुमचे खरेदीखतास पूर्वीं स. नं. १८२ व स नं. १२८ तुमचे खरेदीखतांत असलेले व आमचे मालकीचे शेत स. नं. ९२ अशी शेतें मौजा अशुब कच्छी दुकान आकोला या जवळ ता० २९-७-१९१६ इ. रोजीं गहाण रु० ५०० शांत ठेविले होते. त्याचा व्याजासह तुह्मी हवाला घेतला आहे. सदहू रुपये देण्याचा करार १ वर्षाचा आहे. करार संपण्यास फार थोडे दिवस राहिले आहेत तर अद्याप पर्यंत तुह्मी व्याजासह त्याची अदाई केली नाहीं व गहाणखत रद्द करून आमचेकडेस पाठविलें नाहीं. आणि वर लिहीलेल्या प्रॉमेसरी नोटीचे रुपये तुह्मास अनेक वेळां मागितले असतां दिले नाहींत करितां या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत गहाणदाराचे रु. व्याजासह देऊन गहाणखत रद्द करून आमचेकडे पाठवून द्यावें. अगर तसें न केल्यास गहाणदार रीतिप्रमाणें लहान गहाण संबंधी दावा करील.

तर गहाणखतांत लिहिलेल्या शर्ती प्रमाणें गहाणाचा बोजा आमचे स्थावर इस्टेटीवर न राहतां तुह्मांस खरेदी दिलेल्या स्थावर इस्टेटीवर राहील. स. नं. ९२ हा कोणत्याच प्रकारें गहाणाच्या बोजास पात्र होणार नाहीं व आह्मी ही गहाणाच्या कोणत्याही शर्तींवर बांधले जाणार नाहीं. तुह्मी ज्या तारखेस हवाला घेतला त्या तारखेस गहाणाच्या बोजातून तो खुला झाला आहे व ६७८ रु० प्रॉमेसरी नोटीबद्दल दरमहा दर शेंकडा १॥ रु० प्रमाणें वर दिलेल्या तारखेपासून नोटीस पावल्या तारखेपर्यंत व्याजासह जी रक्कम होईल ती मनीआर्डरीनें पाठवून द्यावी नोटिशीनें मुदतीचे आंत वर प्रमाणें तुमचे कडून कारवाई न झाल्यास अगर गहाणदाराचें रु. आह्मास देणें पडल्यास तुह्मास लिहून दिलेलें खरेदीखत पोकळ समजून रद्द समजलें जाईल. व जमीन ताब्यांत घेण्याबद्दल तुमचेवर दावा केला जाईल. मग कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. दाव्याच्या व नोटिशीच्या खर्चासह रक्कम घेतली जाईल कळावे.

टीपः—या शिवाय तुह्मी १७-८-१६ रोजीं रु. १०० चा प्रामेसरी नोट आह्मांस लिहून देऊन रु. घेऊन गेले ते रुपये व्याजासह याच मुदतीच्या आंत पाठवून द्यावे कळावे ता. १६-६-१७ इसवी

सही

व्यंकटेश विष्णू घिरणीकर द. खु.

नो. नं. २७४


# काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० ९


वऱ्हाडसमाचार

आषाढ शु॥ ६ पिंगल संवत्सर १८३९

## प्राप्तीवरील कराचा नवा कायदा.

सध्या युद्ध, व तत्संबंधीं अनेक महत्वाचे प्रश्न, हिंदी युद्धकर्ज, भारतसंरक्षक सैन्य, युद्ध समाप्तीनंतरच्या राजकीय सुधारणा, स्वराज्याची मागणी, तिच्या संबंधाची चळवळ, विद्यार्थी आणि राजकारण इ. गोष्टींनीं हिंदुस्थानचें वातावरण इतकें दाट भरून गेलें आहे कीं सामान्य व्यवहारांत पदोपदीं नडणाऱ्या—विशेषतः मध्यम वर्गाच्या लोकांना नडणाऱ्या—प्राप्तीवरील कराच्या नव्या कायद्यांत केलेल्या दुरुस्त्या सारख्या प्रश्नांकडे वर्तमानपत्रांचें व राजकीय पुढाऱ्यांचें आणि संस्थांचें लक्ष जावें तसें गेलेलें दिसत नाहीं. पण जनतेच्या हितार्थ तें जाणें अवश्यक दिसल्यावरून अशा एका प्रश्नाचा विचार व तत्संबंधीं कांहीं सूचना सरकारीअधिकाऱ्यांच्या व लोकनायकांच्या पुढें आज आह्मी मांडीत आहों. युद्धामुळें हिंदुस्थानसरकारच्या सांपत्तिक स्थितींत एकदम उलथापालथ झाल्यामुळें वाढता खर्च भागविण्यासाठीं प्राप्तीवरील कराच्या जुन्या कायद्यांत सुधारणा करण्याचें बिल हिंदुस्थानच्या फडणिसांना घाई घाईनें पुढें आणावें लागलें, व इतर सगळीं कामें बाजूला ठेऊन हें घाईचें काम वरिष्ट कौंसिलानें हातांत घेतलें व बिल कौंसिल पुढें आल्यापासून सहा दिवसांचे आंत तें पास ही झालें. याच वेळीं सुपरट्याक्स आक्ट नांवाचा दुसराही एक कायदा याच्याच बरोबर लग्नघाईनें पास करून घेण्यांत आला. सरकारला पैशाची अत्यंत जरूरी आहे असें पाहून या दोन्ही कायद्यांचा विशेष कीस न काढतां लोकनियुक्त सभासदांनींही दोन्ही कायद्यांस त्यावेळीं संमति दिली. पण घाईनें केलेल्या कामांत दोष रहावयाचेच. त्याप्रमाणें या दोन्ही कायद्यांत राहून गेलेले दोष त्या कायद्यांची अंमलबजावणी करताना सरकारी अधिकाऱ्यांच्या व लोकांच्या ध्यानीं आले, आणि हे कायदे पास होऊन सहा महिने पुरे झाले नहीत तोंच त्यांत काय सुधारणा करावयास पाहिजेत त्या विषयींच्या सूचना मागविण्याची गरज सरकारला दिसून आली. त्याप्रमाणें ठळक व्यापारी वर्ग व इतर सार्वजनिक संस्था यांचेकडून सरकारकडून सूचना मागविण्यांत आल्या आहेत व त्यांचा विचार केल्यावर सरकारकडून या दोन्ही कायद्यांच्या दुरुस्तीचें एक बिल कौंसिलपुढें यावयाचें आहे. आतांपर्यंत नेवद्या सार्वजनिक संस्थांकडून सरकाराकडे गेल्या आहेत त्यांत कलकत्त्याच्या मारवाडी असोसिएशननें पाठविलेल्या सूचना विशेष महत्त्वाच्या असल्यामुळें त्यांचा विचार आज कर्तव्य आहे.

गेल्या मार्च महिन्याच्या १ ल्या तारखेस हिंदुस्थानचे मुख्य फडणीस सर विल्यम मेयर यांनीं प्राप्तीवरील कराच्या नव्या कायद्याचा उद्देश सांगतांना या एका गोष्टीचा विशेषतः उल्लेख केला होता कीं आपली खरी प्राप्ति काय आहे तें सरकारास कळविण्याची जबाबदारी रयतेवर जुन्या कायद्यानें टाकलेली असली तरी ती जबाबदारी न ओळखून एखाद्यानें खरी गोष्ट लपवून ठेविल्यास त्याला कायद्यानें कांहीं शिक्षा सांगितलेली नसल्यानें लोक प्राप्तीवरील कराची आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या डोळ्यांत धूळ फेकण्याच्या नाना तऱ्हेच्या युक्त्या करीत, व सदर अधिकाऱ्यांनीं मागितलेली माहिती देण्याचे कामीं अळंटाळं करून कराचा बोजा जितका चुकवितां येईल तेवढा चुकवूं पाहत. त्यामुळें सरकारी तिजोरीचें नुकसान होत असे. या साठीं नव्या कायद्यांत दुरुस्ती करतांना एक नवें कलम असें घालण्यांत आलें कीं त्याच्या योगानें इनकम टॅक्स असेसरांनीं मागणी करतांच आपल्या एकंदर प्राप्तीची संपूर्ण माहिती बिनचूक देणारें पत्रक कांहीं ठराविक मुदतीच्या आंत प्रत्येकानें दिलेंच पाहिजे व तसें तो न देईल तर म्याजिस्ट्रेटपुढें त्याच्यावर खटला करून दिरंगाईबद्दल प्रत्येक दिवसाबद्दल ज्यास्तींत ज्यास्ती १० रुपये दंडास तो पात्र होईल. नव्या कायद्याच्या बिलाच्या मसुद्यांत तर आणखी एक कलम असें होतें कीं असें आपल्या प्राप्तीचें पत्रक न पाठविणारांना आकारणी करणाराच्या विरुद्ध अर्ज ही करतां येऊं नये. परंतु सिलेक्ट कमिटीनें या कलमाला सौम्य स्वरूप देऊन असें ठरविलें कीं जाणून बुजून किंवा खोडसाळ बुद्धीनें सदर पत्रक न देणाराला तेवढें हें कलम लागू करावें, इतरांना नाहीं. बिलांतल्या या कलमाची दुरुस्ती सिलेक्ट कमिटीनें केली नसती तर कराची आकारणी करणारांचे हातांत लोकांना छळण्याचें एक मोठेंच यंत्र गेलें असतें. सिलेक्ट कमिटीनें जरी अशीं कांहीं कलमें दुरुस्त केलीं आहेत तरी घाई घाईनें पास केलेला कायदा, व लोकांच्या अडचणींचा शांतपणानें विचार करून केलेला यांच्यांत अंतर राहणें अपरिहार्य आहे हें या नव्या कायद्याच्या स्वरूपावरून कोणालाही दिसून येण्यासारखें आहे. पत्रक पाठविण्याच्या मुदतीसंबंधानें विशेषतः सुधारणेला पुष्कळ जागा आहे ही मुदत ठरवितांना आमच्या लोकांच्या अंगीं जडलेल्या अव्यवस्थितपणाच्या संवयी, आमच्या व्यापारी वर्गाच्या हिशेब ठेवण्याच्या पद्धती, ठिकठिकाणच्या मुनिमांच्या भरंवशावर सोपविलेला कारभार इ. गोष्टी सरकारनें ध्यानांत घेतलेल्या दिसत नाहींत. आमच्या व्यापारी वर्गाला ठरविलेल्या वेळीं हिशेब तयार करणें, तपासणें, पत्रक वगैरे तयार करणें इ. गोष्टी अगदीं नवीन आहेत. मुनिमाकडून फुरसतीप्रमाणें केव्हां तरी हिशेब पाठवायाचे, व त्यावरून मुख्य दुकानाचे हिशेब तयार होऊन व मालकाच्या सहीनें ते सरकारकडे जावयाचे, अशा सगळ्या गोष्टी ठराविक मुदतींत झाल्याच पाहिजेत असा निर्बंध सरकारी अधिकाऱ्यांनीं घातला तरी त्याप्रमाणें अमलबजावणी सदर व्यापारी वर्गाकडून कशी व्हावी? जी गोष्ट जन्मांत कधीं ठाऊक नाहीं ती एकदम अंगवळणीं कशी पडणार? या साठीं कलकत्त्याच्या मारवाडी असोसिएशननें केलेली सूचना आह्मांस योग्य दिसते. ती ही कीं नोटिशींत दिलेल्या मुदतींत एखाद्याकडून पत्रक न गेलें व तसें न जाण्यास योग्य कारण त्यानें दाखविलें तर अधिकाऱ्यांनीं ती मुदत योग्यकाळपर्यंत लांबवावी. दुसऱ्या कित्येक सूचना सरकारानें विचारांत घेण्या सारख्या आहेत. आमच्यांतले बडे व्यापारी पुष्कळवेळां सगळा कारभार मुनीमाच्या अंगावर टाकून तीर्थयात्रेला सहा सहा महिने जातात. करितां त्यांच्याच सहीचें पत्रक गेलें पाहिजे असा निर्बंध न घालतां जबाबदार मुनिमाला ही आपल्या सहीनें तें पाठविण्याची सवलत द्यावी. तिसरी गोष्ट चालू वर्षीं इतकी प्राप्ती होईल असा अंदाज धरून त्याप्रमाणें कराची आकारणी केल्यास ती अंदाज चुकल्यानें पुष्कळवेळां फाजील कडक होण्याचा संभव आहे. या साठीं अंदाजाइतकें उत्पन्न झालें नाहीं असें पुराव्यानें दाखवितां आल्यास भरलेली अधिक कराचा रकम परत देण्याची तजवीज कायद्यानें करून ठेवावी. चवथी गोष्ट, पुष्कळशा अनाथ बाया किंवा मुलें यांच्या नांवानें सरकारी प्रॉमिसरी नोटा त्यांच्या नवऱ्यानें किंवा पालकानीं घेऊन ठेविलेल्या असतात, व त्यांच्या व्याजाचें उत्पन्न हेंच केवळ त्यांच्या निर्वाहाचें साधन असतें. असें उत्पन्न एक हजाराच्या वर आहे येवढ्याच साठीं त्या रकमेच्या व्याजावर सरकारच्या प्राप्तीच्या कराची आकारणी झाल्यास त्या बिचाऱ्यांना स्वतःचा उपासमार करून कर भरावा लागेल. यासाठीं निवळ व्याजाच्या उत्पन्नावर चरितार्थ चालविणाऱ्या अशा बायाबापड्यांची व अनाथ मुलांची कराच्या आकारणींतून सरकारानें मुक्तता करणें योग्य आहे. त्याचप्रमाणें या नव्या कायद्यापासून अविभक्त हिंदु कुटुंब पद्धतीनें राहून संसार यात्रा चालविणाऱ्या मध्यम स्थितीच्या वर्गालाही फार त्रास होऊं शकेल. अशा कुटुंबाची समाईक प्राप्ति एक हजार रुपयावर सहज जाईल. पण घरांत खाणाऱ्या तोंडांची संख्या ही तशीच मोठी असल्यानें संयुक्त प्राप्ति जरी एक हजाराच्यावर दिसली तरी ती अनेकांच्या श्रमामुळें येत असल्यानें प्रत्येकाची खरी प्राप्ति फारच थोडी असणार व तिच्यावर प्राप्तीच्या करावी आकारणी करणें अन्यायाचें होईल. या सगळ्या गोष्टींचा विचार करण्यास गेल्या मार्च महिन्यांत सदर कायदा पास झाला तेव्हां जरी सरकारी अधिकाऱ्यांना फुरसत मिळाली नाहीं, तरी आतां त्या गोष्टीचा व लोकांच्या इतर अडचणींचा शांतपणानें विचार व्हावयास पाहिजे आहे. ह्मणून आमची सरकारास अशी विनंती आहे कीं सरकारानें यावेळीं तरी कायद्यांत जी काय दुरुस्ती करणें असेल ती स्वस्थपणानें विचार करून व लोकांचे पुढारी व सार्वजनिक संस्था यांच्या हरकती व अडचणी ध्यानांत घेऊन करावी.

---

## विद्यार्थी आणि सभा.

ठिकठिकाणचे प्रांतिक सरकार विद्यार्थ्यांच्या खऱ्या अडचणींचा विचार न करतां भलत्याच काल्पनिक स्थितीचें चित्र डोळ्यांपुढें मांडून त्यांच्या मर्यादित स्वातंत्र्याला, देशस्थितीचें ज्ञान करून घेण्याच्या इच्छेला, आणि वडिलांसमान पूज्य अशा व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या पासून ज्ञानामृत संपादण्याच्या स्वाभाविक स्फूर्तीला करपून टाकण्याचे संबंधांत अहमहमिका लावीत असलेले पाहून पुढच्या पिढीच्या भवितव्यतेविषयीं कोणा आईबापास व देशहितचिंतकास भीती वाटल्यावांचून राहील? बालस्वभाव येथून तेथून सारखाच असतो. जिज्ञासा, निर्विकार व शुद्ध मन, आणि थोराविषयीं आदरभाव हे तीन गुण इंग्लंडांतल्या विद्यार्थ्यांत जितक्या प्रमाणानें सांपडतील तितक्याच प्रमाणानें ते हिंदी विद्यार्थ्यांच्या ठायीं ही आहेत असा मद्रास ख्रिश्चियन कॉलेजचे परम पूज्य प्रिंसिपाल रे. डॉ. मिलर व प्रो. वर्डस्वर्थ साहेबासारख्या थोर शिक्षणाधिकाऱ्यांचा अनुभव असतां सरकार मात्र विलायतेंतल्या विद्यार्थ्यांना असलेली मोकळीक हिंदी विद्यार्थ्यांना देण्यास तयार नाहीं हें आश्चर्य आहे. ऑक्सफोर्ड व केंब्रिज ईटन किंवा हॅरो या सारख्या विद्यालयांतले विद्यार्थी राजकारणावर चर्चा करून बहुमतानें ठराव सुद्धां आपल्या छोट्या पार्लमेंटांत करतात; व मुत्सद्दी, शिक्षणाधिकारी व वर्तमान पत्रकर्ते या भावी नागरिकांचें कौतुक करतात. पण हिंदी विद्यार्थ्यांनीं मात्र राजकारणी सभांनाच नव्हे तर कोणत्याही सभेला कधीं जाऊं नये, असा सक्तीचा निर्बंध घालतात यांस काय ह्मणावें तें आह्मांस कळत नाहीं. पालकांना आपल्या मुलाचें हित जितकें कळतें त्यापेक्षां विदेशी सरकारला तें अधिक कळतें असा अहंभाव सरकारी अधिकाऱ्यांनीं धरून आपल्या मुलांना आपल्या आज्ञेंत ठेवण्याचा पालकांचा जो स्वाभाविक हक्क आहे तो हक्क त्यांचेपासून कां हिरावून घ्यावा? आमच्या मध्यप्रांताच्या सरकारानें हा हक्क समूळ काढून घेण्याचें श्रेय प्रथम संपादलें. त्याच्यापूर्वीं मुंबई सरकारानें विद्यार्थ्यांना सभांना जाऊं देण्याची परवानगी देणें किंवा न देणें हें कॉलेजच्या मुख्याध्यापकांच्या हातीं ठेविलें होतें. पण आमच्या सरकारचें व त्यानंतर मद्रास सरकारचें उदाहरण पाहून आतां मुंबई सरकारनें दडपशाही सरक्युलर काढण्यांत एक पाऊल पुढें टाकिलें आहे, व विद्यार्थ्यांनीं कोणत्याच सभेला जाऊं नये असें ठरविलें आहे.

---

## 'सभा' शब्दाच्या अर्थाची व्याप्ति.

तिन्ही सरकारच्या सर्क्युलरांतून 'सभा' शब्दाच्या अर्थाची व्याप्ति किती समजावयाची याचा कोठेंच उल्लेख केलेला नाहीं. पुराण, किर्तन, मंत्र जागर, ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाचें प्रवचन, एखाद्या थोर हिंदी गृहस्थाच्या सन्मानार्थ जमलेली मंडळी, एखाद्या शास्त्रीय विषयासंबंधाचे सप्रयोग व्याख्यान, मॅजिकल्यांटर्नचे खेळ, इ. गोष्टी 'सभा' या शब्दाखालीं येतील कीं नाहीं? जर येणार असतील, तर अशा सभांना जाण्यास विद्यार्थ्यांना प्रतिबंध करणें योग्य किंवा कायदेशीर होईल कीं काय? धार्मिक किंवा नैतिक आणि अत्यंत निरुपद्रवी व केवळ ज्ञानवृद्धि करणाऱ्या अशा व्याख्यानास, पुराणास, कीर्तनास किंवा प्रवचनास गेल्याबद्दल विद्यार्थ्यांवर शिस्त मोडल्याचा आरोप कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीनें कितीसा योग्य होईल या प्रश्नाचा उलगडा होणें अवश्य आहे. एखाद्या सर्वमान्य कायदेपंडित लोकनायकानें आपल्या मुलास कथा कीर्तनास, किंवा शास्त्रीय व्याख्यानास मुद्दाम पाठवावें व तसें केल्याबद्दल सरकारास कळवून शिस्त मोडल्याबद्दल मुलाला दंड करा ह्मणावे ह्मणजे कोर्टापर्यंत हें प्रकरण जाऊन व न्यायदेवतेचा अखेर निकाल तरी एकदाचा ऐकण्यास मिळून शंका निवारण होईल. सार्वजनिक हितासाठीं येवढें कृत्य करण्याची छाती किती जणांची होते हेंही त्या बरोबर दिसेल.

---

## मद्रास सरकार आणि कायदेशीर चळवळ.

मद्रासचे गवर्नर लॉर्ड पेटलंड यांनीं कौंसिलपुढें अखेरच्या दिवशीं केलेल्या भाषणांत विद्यार्थ्यांसंबंधानें काढलेल्या सर्क्युलराचें समर्थन करण्याचे भरांत, कांग्रेस व मुस्लीम लीग सारख्या कायदेशीर चळवळ करणाऱ्या संस्थांवर ही चिखल उडविण्याचा गर्हणीय प्रयत्न ज्ञानतः ह्मणा किंवा अज्ञानतः ह्मणा केला असें पाहून अनेक हिंदी लोकनायकांना तो स्वतःचा व आपल्या ध्येयाचा अपमान वाटून त्यांनीं लाट साहेबांची स्पष्टोक्तीनें चांगलीच कान उघाडणी केली. तेव्हां लाट साहेबांस पुनः एक पत्रक काढून आपल्या भाषणांतल्या ठळक वाक्यासंबंधानें खुलासा करण्याची अवश्यकता दिसून आली. या लोकनायकांत सर सुब्रह्मण्यम् आयर यांच्या सारखे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध सन्मान्य पुढारी ना. गोविंद राघव आयर, ना. रामचंद्रराव, प्रभृति कायदे कौंसिलचे सभासद आहेत. हिंदुस्थानच्या लोकांनीं स्वराज्याचे हक्क मागणें ह्मणजे केवढा वेडगळपणा आहे! अशा मागणीचा पूर्ण निषेधच केला पाहिजे व प्रत्येक विचारी मनुष्य करील अशा अर्थाचे उद्गार लाट साहेबांनीं काढल्यावर कोणा स्वाभिमानी लोकनायकाच्यानें असला अपमान सहन करवेल? हा एखाद्या व्यक्तीचा अपमान असता तर गोष्ट निराळी होती. पण कांग्रेस व मुस्लीम लीग यांनीं गेल्या डिसेंबरांत लोकमताच्या जोरावर जें ध्येय लवकर व्यवहारांत सरकारानें आणावें अशी सरकारची प्रार्थना केली त्या ध्येयाला वेडगळ ह्मटल्यावर हिंदी पुढाऱ्यांचा शहाणपणा तो कोठें राहिला? लाट साहेब आपल्या समर्थनांत ह्मणतात कीं आपला रोख कांग्रेस व लीग या सारख्या संस्थांवर नसून होमरूल मागणाऱ्या पक्षावर होता. होमरूलचा व कांग्रेसचा पक्ष किंवा मुस्लमलीग हीं भिन्न नाहींत; सर्वांचें ध्येय एकच आहे, व सगळेच कायदेशीर पद्धतीनें चळवळ करणार आहेत; फरक असलाच तर तो अगदींच शाब्दिक आहे ही गोष्ट लाट साहेबांना ठाऊक नाहीं काय?

---

## खटले कां करीत नाहीं?

हिंदुस्थानचे लोक संपूर्ण स्वराज्य व तें ही

ही युद्धानंतर लागलीच द्या असें ह्मणत आहेत अशी लाट साहेबांनीं आपली समजूत करून घेतली व ही मागणी त्यांना वेडगळपणाची, किंबहुना देशावर भयंकर संकट ओढून आणणारी वाटत आहे! ती बेकायदेशीर आहे असें त्यांनीं स्पष्टपणें ह्मटलें नाहीं पण भयंकर शब्द तशाच अर्थानें त्यांनीं वापरलेले दिसतात. येथें असा प्रश्न कोणी ही विचारील कीं होमरूल चळवळींत जर भयंकरपणा किंवा बेकायदेशीरपणा मद्रास सरकारला दिसतो तर ती चळवळ करणारांवर खटले करण्याचा अधिकार सरकारचे हातीं असतां त्याचा उपयोग तें सरकार कां करीत नाहीं ? या प्रश्नाचें सरळ उत्तर ह्मणजे होमरूलची चळवळ कायदेशीर आहे असा निकाल न्यायदेवतेनें अगोदरच दिला असल्यामुळें न्यायदेवतेपुढें आपली फिर्याद मांडली असतां आपणास अनुकूळ असा निकाल होणें आतां असंभवनीय आहे असें सरकारी अधिकाऱ्यांची मनोदेवता टोंचत असली पाहिजे हें होय.

## डिफेन्स आक्टाचें साह्य.

न्याय कोर्टाच्या मार्फत आपला हेतू साधणार नाहीं अशी खात्री वाटून मद्रास सरकारनें अखेरचें निर्वाणीचें शस्त्र ह्मणजे इंडिया डिफेन्स आक्टाचें सह्य—घेऊन होमरूलची चळवळ करणारांचे हातपाय मोडावयाचे येवढाच उपाय राहिला होता. शेवटीं त्याचें अवलंबन मद्राससरकारानें करून ता. १६ जून रोजीं मिसेस अनी बिझांट, मि. अरंडेल, व मि. बी. पी. वाडिया या तिघांना चौकशीवांचून अटकेंत ठेवण्याबद्दलच्या नोटिसा काढल्या. मद्राससरकारच्या मुत्सद्दीपणाची येथें खरोखर परमावधि झाली असें ह्मटलें पाहिजे. या तिघांच्या आजपर्यंतच्या वर्तनांत सरकारला कोणती गोष्ट इतकी गैरवाजवी किंवा भयंकर दिसली कीं तिच्या बंदोबस्तासाठीं तिघा राजनिष्ठ नागरिकांच्या कायदेशीर स्वातंत्र्याचें अपहरण करण्याची अवश्यकता सरकारला अवश्य वाटली, याबद्दलचा जबाब देण्याची कायदेशीर जोखीम मद्राससरकारावर नसली तरी नीतिदृष्ट्या तींतून तें मुक्त होऊं शकत नाहीं हें सांगावयास नकोच.

## मिसेस ॲनी बिझांट.

सरकारनें अटक केलेल्या त्रिमूर्तीपैकीं मिसेस बिझांट या प्रमुख किंबहुना होमरूलच्या चळवळीच्या त्या मुख्य उत्पादक व अंतरात्मा आहेत. ज्यांना त्यांचें आजपर्यंतचें चरित्र अवगत आहे त्यांना त्यांचे ठायीं असलेली अलौकिक बुद्धिमत्ता, निस्पृहता, निःस्वार्थता, सात्विकतेचें तेज, निरलसता, शुद्धचारित्र्य, असामान्य कर्तृत्वशक्ति, प्रखर सत्यानिष्ठा, परमेश्वराचे ठायीं निःसीम श्रद्धा आणि तितकीच प्रखर राजनिष्ठा इ. गुण चांगले माहित आहेत. या बाई विदेशी असतां त्यांना या देशांत सुमारें पंचवीस वर्षांच्या अवधींत हजारों किंबहुना लक्षावधि एकनिष्ठ शिष्य मिळावे, व या शिष्यमंडळींत माजी हायकोर्ट जज्ज, कौंसिलचे सभासद, कॉलेजाचे प्रिन्सिपाल, तत्ववेत्ते, शास्त्रज्ञ, यांच्या सारखी विद्वान् मंडळी असावी; या मंडळींतल्या अनेक जणांनीं बाईच्या चरित्राला झुलावें, त्यांच्या चरणीं आपलें तन मन धन अर्पण करावें, व त्यांनीं ठरविलेल्या ध्येयाच्या साधनार्थ सरकारी अधिकाऱ्यांच्या धमकावणीस न जुमानतां आह्मी बाईनीं घालून दिलेल्या मार्गानें जाणार, मग त्याबद्दल सरकारनें हवी ती शिक्षा केली तरी बेहत्तर आहे असें आपल्या सहीनिशीं प्रसिद्ध करावें, यावरून बाईच्या शिकवणीचा परिणाम लोकांच्या अंतःकरणांत किती खोलपर्यंत झालेला आहे त्याची कल्पना कोणाला ही करतां येईल. बाईच्या चरित्राची नुसती रूपरेखा पाहिली तरी मी मी ह्मणणाऱ्या पुरुषांना या बाई पुढें लज्जेनें खालीं माना घालाव्या लागतील व या बाईच्या अंगीं कांहीं तरी अमानुष शक्ति व ईश्वरी तेज आहे असें कबूल करावें लागेल. बाईचा जन्म सन १८४८ सालीं आयर्लंडमध्यें झाला. यांचें लग्न एका ख्रिस्ती भटाशीं झालेलें होतें. कांहीं दिवस उभयतां गुण्यागोविंदानें नांदलीं. पण नवरोजी पुरे श्रद्धाळू व भाविक कर्मठ ख्रिस्ती होते; आणि या बाई मोठ्या बुद्धिमान् व तार्किक असल्यामुळें त्या आपल्या बुद्धीच्या कठोर कसोटीला ख्रिस्ती धर्म लावून पाहूं लागल्या तेव्हां त्या धर्माचा फोलपणा नजरेस येऊन त्या नास्तिकवादी बनल्या. भाविक व नास्तिक यांचा मेळ कसा बसावा? बाई चर्चमध्यें जाऊन तेथें करावे लागणारे संस्कार करीतनाशा झाल्या, तेव्हां नवरोजीनें त्यांना घरांतून काढून दिलें. सत्याग्रहाचा बाणा बाईचे ठायीं त्या काळापासून असल्यामुळें त्यांनीं संसारसुखाचा बळी त्या सत्याग्रहास दिला, आणि १८७४ सालीं त्या नॅशनल सक्युलर सोसायटींत सामिल झाल्या. तेथें 'समानशील व्यसनेषु सख्यम्' या उक्तीप्रमाणें त्यांचें व मि. ब्राडला यांचें सख्य जमल्यावर या जोडीनें अनेक संकटांतून मोठ्या धीटाईनें स्वतःचा बचाव करून साऱ्या इंग्लंडभर आपल्या अलौकिक वक्तृत्व, लेखन, व नैतिक धैर्य या तीन शक्तींचा प्रभाव कसा गाजविला, व बाईचें नांव घेतांच मी मी ह्मणविणाऱ्या ब्रिटिश मुत्सद्यांचा कसा थरकाप होत असे, वगैरे सांगत हकीकत देण्यास आमचे जवळ जागा नाहीं. पुढें बाईच्या मतांत क्रांति घडून त्या मॅडम ब्लॅव्हटस्की यांच्या शिष्य झाल्या व तेव्हांपासून त्यांनीं थिऑसफी अथवा ब्रह्मज्ञान, लोकशिक्षण, आणि हिंदुस्थानच्या लोकांची उन्नति या तीन कार्यांस कसें वाहून घेतलें, त्यासाठीं किती कष्ट सोसले, केवढा छळ सहन केला, आणि कशाची भीती न बाळगतां लोकनायकांनीं आपलें खरें खरें मत प्रकट करून देशोन्नतीचे प्रयत्न कसे करावे या विषयींचें प्रत्यक्ष उदाहरण कसें घालून दिलें तें येथें सांगण्याचें कारण नाहीं ता. १६ जूनच्या न्यू इंडिया पत्राच्या अंकांत त्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांना जो तूर्त तरी अखेरचा रामराम ठोकणारा लेख लिहिला आहे, तो वाचला ह्मणजे त्या बाईची हिंदुस्थानच्या कल्याणाविषयींची तळमळ, व तें साधण्यासाठीं तन, मन, धनच काय पण स्वतःच्या प्राणाचाही बळी देण्याची तयारी, बाईची निधडी छाती, स्पष्ट वक्तृत्व इ. गुणांचें प्रतिबिंब वाचकांच्या मनावर विलक्षण परिणामकारक झाल्याशिवाय खात्रीनें राहणार नाहीं. अशा व्यक्तीचे चरित्राचें खरें तेज संकटाचे वेळींच विशेष चमकतें व तेंच अधिक परिणामकारक होतें ही गोष्ट मद्रास सरकारचे ध्यानांत आली असती तर त्यांनीं या विद्युल्लतेसम तेजस्वी असलेल्या बाईस प्रतिबंधांत ठेवण्याचें गैरमुत्सद्दीपणाचें कृत्य खात्रीनें केलें नसतें.

## हिंदुस्थान आणि आयर्लंड.

अमेरिका युद्धांत पडल्याचा प्रत्यक्ष परिणाम युद्धावर जरी विशेष कांहीं झालेला दिसला नसला तरी ग्रेट ब्रिटनच्या राजकीय वातावरणावर तो फार अनपेक्षित जल्दीनें झाल्याचें चिन्ह स्पष्ट दिसत आहे. तुह्मी आयर्लंडांत शांतता स्थापन करून आयरिश लोकांना संतुष्ट ठेविल्याशिवाय प्रस्तुत युद्धांत संपूर्ण यशस्वी लवकर होणार नाहीं अशी मित्रत्वाची सल्ला अमेरिकेनें इंग्रज लोकांना दिल्यापासून आयरिश लोकांना संतुष्ट ठेवण्यासाठीं हवी ती गोष्ट करण्यास इंग्रजी राष्ट्र तयार झालें आहे. ज्यांनीं इंग्रजांच्या विरुद्ध बंड केलें अशा आयरिश पक्षाला सुद्धां न वगळतां सर्व आयरिश पक्षाचें कन्फरन्स भरवून आपणांस कशा प्रकारचें स्वराज्य पाहिजे त्याची योजना तुह्मीच तयार करून द्या असें मि. लॉईड जार्ज यांनीं आयरिश लोकांना सांगितल्याचें आह्मी यापूर्वींच वाचकांस कळविलें आहे. असें ही रूटरनें प्रसिद्ध केलें आहे कीं आयरिश राजकीय कैद्याची बंधमुक्तता करण्यास ही इंग्रजी प्रधानमंडळ आपण होऊन तयार झालें आहे. अमेरिका युद्धांत सामिल झाल्याबरोबर इंग्रजाना आयरिश लोकांविषयीं जो प्रेमाचा येवढा पान्हा फुटला आहे त्यांतलें खरें इंगित काय आहे तें वर आह्मीं सांगितलेंच आहे. दुर्दैवी बिचारा हिंदुस्थान! त्याच्या प्रजेच्या आकांक्षा योग्य व न्यायाच्या आहेत; त्यानें युद्धांत केलेली मदत बहुमोल व अप्रतिम आहे असें ब्रिटिश लोक व मुत्सद्दी कबूल करतात; आयर्लंडसारखे अत्याचार त्याच्या हातून कधीं घडले नाहींत. तरी पण त्यानें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत मर्यादित स्वराज्याचे हक्क मागितल्या बरोबर हिंदुस्थानांतले सरकारी अधिकारी वाघासारखे त्यांच्यावर डोळे काढतात; त्यांच्या चळवळीवर आग पाखडतात व पुढाऱ्यांना अटक करतात! हिंदुस्थानाला न्यायानें व सहानुभूतीनें वागवा असें अमेरिकेनें सांगण्याची ते वाट पहात असतील काय?

## महायुद्धाची प्रगति.

महायुद्धासंबंधाची गेल्या आठवड्यांतली अत्यंत महत्त्वाची बातमी ह्मणजे ग्रीसचा दगलबाज राजा कांस्टंटाईन यानें केलेला राजपदाचा त्याग ही होय. राजत्याग ह्मणण्यापेक्षां मित्र राष्ट्रांनीं त्याची केलेली पदच्युति हें नांव अधिक सार्थ होईल. या राजाकडून इतकीं दगलबाजीचीं कृत्यें आतांपर्यंत घडलीं आहेत कीं मित्रराष्ट्रांनीं इतके दिवस तरी त्याची कशी गय केली याचेंच नवल वाटतें. हा राजा आपला मेहुणा जर्मनीचा कैसर याला अंतःकरणापासून अनुकूळ आहे ही गोष्ट छपलेली नव्हती. वस्तुतः मात्र तो तटस्थपणाचें मिष करीत होता. सर्वियावर बल्गेरियानें स्वारी केली तेव्हां सर्वियाला त्यानें मदत करावयास पाहिजे होती, कारण तसा त्यांच्यामध्यें तहच झालेला होता. पण ग्रीसनें आपलें वचन पाळलें नाहीं. पुढें ग्रीसचा माजी प्रधान व्हेनेझेलोस यानें मित्रराष्ट्रांचा दोस्त ह्मणून ग्रीसनें युद्धांत पडावें अशी सगळी व्यवस्था केली असतां कांस्टंटाईननें तो ठराव रद्द केला. तटस्थ राष्ट्र ह्मणून बाह्यात्कारी ह्मणवीत असतां ग्रीसच्या राजाचीं आंतून जर्मनशीं कारस्थानें चाललीं होतीं. मात्र आपल्या वर्तनाविषयीं शंका येऊं नये येवढ्याच साठीं त्यानें मित्रराष्ट्रांच्या सैन्याला सालोनिका येथें उतरूं दिलें होतें. त्याचप्रमाणें या दगलबाज राजानें ग्रीक सैन्यावर जर्मनीचा पूर्ण ताबा चालूं दिला होता; इतकेंच नाहीं तर लष्करी दृष्टीनें महत्त्वाचीं अशी मासिडोनिया मधली कित्येक ठाणीं जर्मनीच्या स्वाधीन केलीं होतीं. बल्गेरियावर इंग्रजाची फौज चालून गेली तर तिच्यावर तुटून पडण्यासाठीं इंग्रजी सैन्याच्या पिछाडीला आपलें ग्रीक सैन्य आणून ठेवण्याचा ही त्याचा उद्योग सुरू होता. सुदैवानें या त्याच्या उद्योगाचा सुगावा इंग्रजांना लागला व त्यामुळें कांस्टंटाईनचा बेत सिद्धीला गेला नाहीं. राजानें आपल्या भोंवतीं सगळे जर्मनीचे हितचिंतक मंत्री गोळा केले व मुख्य प्रधान व्हेनेझेलास हा मित्रराष्ट्राच्या पक्षाचा ह्मणून त्याचा व त्याच्या अनुयायांचा भयंकर छळ केला. राजानें इतकीं दगलबाजीचीं कृत्यें केलीं तरी नाजूक प्रसंग मित्रराष्ट्रांना गय करावी लागली, आणि अनुकूळ परिस्थिति प्राप्त होतांच कांस्टंटाईनला पेंचांत धरून त्यांनीं त्याला अखेरीस राजपदाचा त्याग करण्यास भाग पाडलें. या राजपदत्यागास निमित्त कारण हें झालें कीं थेसला प्रांतांतलें सगळें धान्य आत्मसात् करून ब्रिटिश फौजेला त्यांतला अंशसुद्धां मिळू नये व ती फौज उपाशी मरावी अशी तजवीज करण्याचा राजानें यत्न केला; इतकेंच नाहीं, तर उलट तुमच्यामुळे आमच्या देशांत धान्याचा तुटवडा येऊन उपासमार होत आहे असा आक्षेप इंग्रजांवरच घालण्याचा घाट त्यानें घातला होता. पण कांस्टंटाईनच्या पापांचा घडा येथें भरून शेवटीं त्याला राजपदाचा त्याग करावा लागला. इंग्रजांनीं त्याच्या दगलबाजीचीं अनेक कृत्यें पाहून ग्रीसची नाकेबंदी करून टाकली होती यामुळें कांस्टंटाईनला निरुपायानें राज्यत्याग करावा लागला ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आतां हा राजा आपला दुसरा मुलगा अलेक्झांडर यास गादीवर स्थापून आपण परिवारासह स्वित्झलंडमध्यें हरि हरि ह्मणत बसण्यासाठीं गेला आहे. पण स्वित्झर्लंडचें मंत्री रशीया व जर्मनी यांच्या मध्यें स्वतंत्र तह घडवून आणण्याची खटपट करीत आहेत ही गोष्ट लक्षांत घेतली तर राजाला हरि हरि ह्मणत बसण्यास स्वित्झलंड देशच कां योग्य वाटला त्याचा उलगडा करतां येईल ही ब्याद स्वित्झलंडमध्यें गेल्यावर स्वस्थ बसेल हें संभवनीय नाहीं.

## 'गरीब विचारीं कुणी हका। अशीं मेंढरें बनूं नका '॥

हिंदुस्थानच्या प्रजेच्या अंगचा नैतिक दुबळेपणा हा त्याच्या उन्नतीच्या आड येत आहे असें विचारी लोकांचें ह्मणणें आहे आणि त्यांत बरेंच तथ्य दिसतें. मद्रास सरकारनें चालविलेली दडपशाही केवळ अरेरावीची व अन्यायाची आहे असें हिंदुस्थानांतल्या सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांना वाटत आहे; मद्रासच्या पुढाऱ्यांनीं गव्हर्नर साहेबांच्या धाकदपटशाही भीक न घालतां तसें स्पष्टपणें जाहिर ही केलें आहे. पुण्याच्या नागरिकांनीं ही मिसेस बिझांट, वाडिया व अरंडेल याना अटक झाल्याबद्दलची बातमी येतांच तत्काळ जाहिरसभा भरवून लाट साहेबांच्या कृत्याचा तीव्र निषेध केला; इतर ही कित्येक ठिकाणीं निषेध प्रदर्शक सभा होत आहेत परंतु वर अवतरणांत घेतलेल्या कवीचा उपदेश हिंदी लोकांच्या हृत्पटलावर उत्तम प्रकारें बिंबला आहे असें दर्शविण्यास अशा जाहिरसभा प्रत्येक शहरांतून, गांवांतून व खेडोंपाडीं सुद्धां झाल्या पाहिजेत. हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगांत स्वाभिमानाचें पाणी खेळत आहे हें ब्रिटिश नागरिकांस पूर्णपणें कळल्याखेरीज राष्ट्रमालिकेंत हिंदुस्थानाला सन्मान्य स्थान कधीं प्राप्त होणार नाहीं, व हिंदुस्थान स्वराज्याच्या हक्काला प्राप्त झाला आहे अशी खात्री ब्रिटनला पटणार नाहीं. तेव्हां अशावेळीं हिंदुस्थानचा प्रत्येक स्त्री पुरुष स्वाभिमान व्यक्त करण्यास तयार होईल अशी आह्मी अपेक्षा करतों.

## राष्ट्रभक्ति.

आमच्या राष्ट्रभक्तीला अराजकतेचें स्वरूप देण्याचा प्रयत्न सरकारी यंत्रांतून चालू आहे. जी राष्ट्र भक्ति स्वराज्य मागते किंबहुना या महायुद्धाचें शांतिपर्व ह्मणून इंडियाचें स्वराज्य होणार आहे असें प्रतिपादन करते ती राष्ट्रभक्ती आमच्या सांप्रतच्या चेम्सफर्ड शाहींत विषतुल्य झाली आहे. ज्या राष्ट्रभक्ती ज्या पीयूषधारांनीं या महायुद्धाच्या संहाराला देखील सुवर्णता आणली आहे आणि त्या संहाराला भावी मानवी संस्कृतीचा पाया केलें आहे त्याच पीयूषधारांचें गंगोदक स्वराज्य वाद्यांनीं आपल्या देशबांधवांस पाजूं नये ह्मणून सरकारांतून लोकांना मनाया होत चालल्या आहेत, आणि मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेंटलंड हे तर दडपशाही चालित करू पहात आहेत. या राष्ट्रभक्तीची मीमांसा राजश्री रेव्हरेंड जोसेफ फोर्ट न्युटन यांनीं आपल्या अमेरिकन लोकांपुढें फार सुंदरतेनें केली आहे. आणि तीच मीमांसा आह्मी राज्यकर्त्यांच्या आदरार्थ मुद्दाम मांडीत आहों.

राष्ट्रभक्ती हा एक प्रेमाचा अंकूर आहे. तो अत्यंत मृदू व सर्व शरीरभर वाढता असतो. प्रत्येकाला जसें आपल्या घराचें प्रेम असतें त्याप्रमाणें हें राष्ट्रप्रेम होय. माझे घर हे शब्द उच्चारतांच एक टुमदार बंगला, त्याच्या सभोंतालचे ते मोठाले वृक्ष, चिरपरिचित असा तो देखावा, त्याच्या आसपासचे फार दूरवरचें सौंदर्य आणि समजा तें माझे आकोल्यांतलें घर सर्व राष्ट्रांतला किती तरी क्षुद्र हा कोपरा! पण; ती लहानशी मोर्णा नदी आणि तेथलें तें माझें छोटेसें स्वराज्य या कल्पनांनीं आपण आपल्या घराविषयीं किती तरी प्रेमळ असतो? तेथलें गवत ह्मणजे अधिक हिरवेगार आहे किंवा आकाश कांहीं अधिक निळें आहे किंवा तेथील पाणी अधिक गोड व स्वच्छ आहे अशांतला कांहीं पर्याय नाहीं. किंवा माझ्या या राष्ट्रांतले सर्व लोक सर्वोत्तम, अत्यंत शूर व अत्यंत सूज्ञ आहे ह्मणून त्या राष्ट्रांतील माझें घर मला लाडकें आहे अशांतला ही प्रकार नाहीं. माझें घर मला लाडके आणि ह्मणून माझा देश मला लाडका. कां कीं याच भूमीवर माझे वाडवडील नांदले, त्यांच्याच देहाची व रक्त मांसाची माणसें आह्मी येथें राहातों आणि आमचीं मुलें बाळें ही येथेंच वास्तव्य करणार आहेत तेव्हां या पवित्र भूमीपेक्षां आमच्या मनाचा ओढा दुसऱ्या कोणत्या भूमीकडे जाणार बरें! हे विचार पुष्कळ अंशीं फार रमणीय आहेत. पूर्वजांची स्मृती व पूर्व परंपरा याहून अन्य बंधनें तीं दुसरीं कोणतीं असणार! या राष्ट्रभक्तींत टॉलस्टाय या तत्ववेत्याच्या ह्मणण्याप्रमाणें एकदेशीय विचार असतात खरे, पण ही योजना ईश्वरी असून ती तशीच सुंदर आहे. प्रत्येक राष्ट्र किंवा प्रत्येक मानव योनी याचा एकेक विशेष गुण असतो आणि तोच विशेष गुण मानव सृष्टीला सौंदर्य आणतो व मानवी सुधारणा बहुविध करितो. जी लहान लहान राष्ट्रें असतात त्यांच्या त्या त्या विशिष्ट रत्नांनीं मानवी भांडाराला शोभा आलेली आहे. लहान राष्ट्रांतून जो एकजीव एकवटलेला असतो, निरनिराळ्या संपत्तींचें जें एकीकरण तेथें दृष्टीस पडते, आणि सर्वांचें जें सामान्य ध्येय असतें त्यामुळें तेथील राष्ट्रभक्ती तात्काळ अभिव्यक्त होते व तिच्यामध्यें विलक्षण कर्तृत्वशक्ती असतें ग्रीसचेंच उदाहरण पहा. एक छोटेंसेंच राष्ट्र त्याचा तो समुद्र वेष्टित भू परिभाग, त्याच्या वरचें तें सुंदर आकाश आणि त्या अरुंदशा भागांतच उदयास आलेल्या कला, नाट्य, तत्वज्ञान यांच्या संमृद्धीनें जगावर केवढा तरी उपकार झालेला आहे! रोम एक लहानसें शहरच आहे. पण तेथील तो कायदा कानू अद्याप जगभर प्रचलित आहे आणि रोमन कायदे पंडितांनीं जे मार्ग घालून दिलेले आहेत तेच मार्ग वर्तमान जगांतील राष्ट्रें चालत आहेत. या दृष्टीनें प्रत्येक राष्ट्राची कार्यभूमी निरनिराळी आहे ही राष्ट्राची भूमिका अगदीं पृथक पृथक आहे. प्रत्येकाचा सौंदर्यविशेष निरनिराळा आणि प्रत्येकांत बुद्धी वैभवाचा विकास ही विलक्षण आहे. अशा या निरनिराळ्या राष्ट्रांच्या संमेलनानें सर्व मानवी जग विस्तृत व सुसंस्कृत आहे. आणि याच दृष्टीनें जी एक देशीय राष्ट्रभक्ती आहे ती सर्व जगाला वळसा घालील किंबहुना त्या प्रेमाअंतरंगापुढें सर्व जग वश होऊन स्नेहभावानें, प्रेमदृष्टीनें व सृष्टिसौंदर्यानें त्या जगदीशाकडे सर्व राष्ट्रांची दृष्टी वळवील आणि हीच खरी जाणीव सर्व राष्ट्रांना कळवून देण्यासाठीं व असुरी संपदांची खरी तुच्छता पदरांत घालण्यासाठीं हें महायुद्ध उपस्थित करण्याचा ईश्वरी संकेत दिसतो. आमच्या राज्यकर्त्यांनीं या महायुद्धाच्या जान्हवींत स्नान करतांना इंडियन लोकांना राष्ट्रभक्तीचें गंगोदक प्राशन करण्यास मनाई करूं नये, आणि हा ईश्वरी संकेत समजून येईपर्यंत महायुद्ध थांबेल असें आह्माला वाटत नाहीं.

## सद्‌प्रीतीची पाटी.

### ( सरकारला प्रजेचें विज्ञापन. )

येथील श्री राजेश्वराच्या धर्मशाळेंत गेल्या शनवारीं सायंकाळीं ६॥ वाजतां आकोला जिल्हा कांग्रेस कमिटीनें निषेध प्रदर्शक जाहीर सभा भरविली होती. श्रोतृसमाज सुमारें १॥ हजारावर होता. अध्यक्षस्थानीं आकोल्याचे सर सुब्रह्मण्यम् आयर हे होते. रावबहादूर महाजनी यांनीं जें प्रास्ताविक संभाषण केलें तें अत्यंत सात्विक रागाचें, प्रेमळपणानें भरलेलें व उपदेशपर असें होतें. सरकार चुका करितात तेव्हां त्यांचा निषेध करणें हें प्रत्येक लोकनायकाचें कर्तव्य आहे. आणि स्वतःच्या वार्धक्याकडे बोट दाखवून त्यांनीं प्रस्तुतचें सरकार कसें वार्धक्यांत आलें आहे, आणि त्यामुळें वाढत्या तरुण पिढ्यांच्या आकांक्षाच्या मानानें तें किती लंगड पडतें, प्रजेच्या अंतःकरणापासून किती दूर अंतरावर सरकार वागते असें सांगतांना पंच वार्षिकी व्हाइसरायींत कशा घरसोडी होतात, आणि त्याच्या परिणामीं श्रीमती बिझांट बाई सारख्यांना इकडे अटक होते, आणि याच वेळेला आयर्लंडांतले कैदी बंधमुक्त होतात इ. इ. गोष्टी फार मार्मिक व सूचक दृष्टीनें त्यांनीं लोकांपुढें मांडल्या त्यावेळीं आमच्या या नगरचा सत्याग्रह, राजभक्ती व आशाश्री हीं एकवटून त्या अधिकारी वाणीच्या विकसनानें किती उत्तमतेला पोचली याचा हृदयंगम अनुभव सर्वांस मिळाला. त्या नंतर नामदार रावबहादुर दामलें, रावसाहेब महाजनी, राजश्री महमद युसफ, आणि जयकुमार चवरे व रामकृष्णपंत ओक यांनीं आपला मुख्य ठराव निरनिराळ्या विचारांच्या बाजूनें सभेपुढें मांडला आणि तो सर्वानुमतें पसार झाला. हा ठराव असा—

"आज, ता. २३ जून १९१७ इ. रोजीं, श्री राजेश्वराचे देवालयांत जमलेले, आह्मी अकोले येथील रहिवासी, ब्रिटिश साम्राज्याचे राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें, मिसेस ॲनी बेझंट व मेसर्स ॲरंडेल व वाडिया यांना अटकेंत ठेवण्याबद्दल मद्रासचे नेक नामदार गव्हरनर-इनकाऊंसिल यांनीं काढलेला हुकुम पाहून आह्माला दुःख व आश्चर्य वाटत आहे असें नम्रपणें प्रगट करतो; व डिसेंबर १९१६ मध्यें इंडियन नॅशनल कांग्रेस व मॉस्लेम लिग यानीं पास केलेली, व ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या देशांतल्या धर्तीवर सतत व अखंड लोकमत जागृती करण्याकरतां पूर्णपणें कायदेशीर अशा तत्वांवर, मिसेस बेझंट व त्यांचे स्नेही मंडळी सारख्या उदारधी व खऱ्या देशभक्त मंडळींनी चालविलेली, स्वराज्याची राजकीय व सनदशीर चळवळ दाबून टाकण्याचें धोरण या (हुकुमा) न्वयें दिसून येत असल्यानें त्या धोरणाचा आह्मी नम्रपणें पण निश्चयानें निषेध करितो.

२ ब्रिटिश साम्राज्याबद्दल पूर्ण निष्ठा व राष्ट्रजीविताची शांत व पद्धतशीर तऱ्हेनें उन्नती होण्याबद्दलची आदरबुद्धी, यांचा मिसेस बेझंट यांच्या व्याख्यानांतून व लेखांतून पुरस्कार व समर्थन केल्याचें आढळून येतें. ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन आह्मी असें जाहीर करतो कीं वरील हुकुम हा अगदींच अप्रयोजक असून, प्रजाजनांचे मनांत संशय उत्पन्न होईल असा त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे

३ अप्रबुद्ध व जुलमानें त्रस्त झालेल्या कोणत्याही लोकांबद्दल मिसेस बेझंट यांनीं अखंड निःस्वार्थ व आजन्म केलेल्या परिश्रमाबद्दलची आह्माला वाटणारी निःसीम कृतज्ञता व अमर्याद आदरबुद्धी आह्मी या ठरावनें प्रगट करतो.

४ अत्युत्कट व निकडीच्या अशा युद्धसंबंधीच्या बाबतींत स्थानिक सरकाराना दिलेल्या अधिकाराचा उपयोग ज्या व्यक्तीसंबंधीं वरील हुकूम सोडण्यांत आला आहे त्यांच्यासंबंधीं तो अगदीं अयोग्य आहे. व आमची अशी आग्रहाची विनंती आहे, कीं व्हाइसराय साहेबांनीं सदर्हू हुकूम लवकरच रद्द करावा व ब्रिटिश न्यायाबद्दल लोकांचे मनांत असलेली आदरबुद्धी ढळूं देऊं नये."

नंतर हा ठराव अध्यक्षांनीं निरनिराळ्या सरकाराकडे पाठवावा असा संकल्प ठरल्यावर अध्यक्षांनीं सभेचें विसर्जन करतांना श्रीराजराजेश्वर आमच्या सरकारास सद्‌बुद्धी देवो अशा प्रेमरंगाच्या प्रार्थनेंत सभा विसर्जन केली.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— पर्जन्याचे वारे मेघमालेचे मार्ग रेखाटून देतात. तेव्हां या आर्द्रा नक्षत्राच्या वृष्टीको लोकांची दृष्टी सहजीच विशेष लागली आहे. सार्वजनिक आरोग्य सध्या सुखमय आहे आणि चांगला पर्जन्य लौकरच होईल तेव्हां तें विशेष जोमांत येईल.

रा. रा. ए. सी. आर्मस्ट्रांग आफिशिएटिंग पोलिस सुपरिंटेंडेंट बुलढाणा यांस सध्यां वऱ्हाड व नागपूर करितां डिस्ट्रिक्ट असि. रिक्रुटिंग आफिसर नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. एन. जे. रौटन सब डिव्हिजनल आफिसर खामगांव हे आपले काम संभाळून बुल्ढाणा पोलिस सुपरिंटेंडेंटचेंही काम सांभाळतील

## नोटीस.

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र साहुकार दुकानदार वगैरे यांसः—

नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आकोलें येथें ताजनापेठेंत कादरभाईचे मोतीलाल बनसीलाल याचे चाळींत पुंजाजी रामेश्वर या नांवाचें दुकान धान्याचें होतें त्या दुकानचा निकाल आमचे आपसांत तारीख २१।६।१७ ईसवी रोजी निकाल झाला. आतां सर्वत्र लोकांनीं पुंजाजी रामेश्वर या नांवाचे दुकानशी कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये केल्यास खालीं सही करणार कोणतेच प्रकारचा जबाबदार राहणार नाहीं सदर्हू दुकानचें नांव पुंजाजी रामजी हें ठेविलें आहे. या नांवावर देवघेव केल्यास खालीं सही करणार जबाबदार आहे. सदर्हू दुकान रामेश्वर यानें माझे कबज्यात दिल्यावरून दुकानचे सर्व प्रकारचें देवघेवीचें आणि नफ्या नुकसानीचे मालक खालीं सही करणार आहे. फक्त समाईक दुकान होतीं त्यावेळचे रतनलाल बालचंद यांचें कर्ज काढलेलें त्याचा जबाबदार रामेश्वर भोलाराम हा आहे ता० २३-६-१७ इ. सही

पुंजाजी रामजी शिंपी रा. आकोला

नो. नं. २९२ धान्य बाजार द. खुं.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
डिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

मुंबई न्या.केची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी घेतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी पासून ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुप-याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ | Lyon Scott एजंट
नो नं १

---

### सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ।||', १, १।
१॥, २, २॥, ते ५ रु. प. बुद्धीबळजोड लांकडी— किंमत ।||' १, १॥, २ ते ४ रु. प. सोंगट्या जोड— किंमत ।', ।|', ।||', १, १॥, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागचा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १॥८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्यांचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुरुली, खरूज वाचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लॅबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखी व वागन्याची वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकरणीं, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोन्याशनकचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

---

### आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटांची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

---

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पहिलेंच अपूर्व साहस !

वा. वर्गणी १२ आणे व्ही.पी. नें १४ आ.

## पूर्णानंद

स्वस्त आणि उपयुक्त सचित्र मासिक पुस्तक.

अत्यंत अल्प किंमतीत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेलें नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—पूर्णानंद—कार्यालय, बेळगांव,

नो. नं. २९९

---

### रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. ४. ३—४; गोठ जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४—५. शिंप्याचें मोती व्हान मोठें वाटेल तसें. सगळी २—३—४; अंगठी १; मळे अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २—२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव— मुंबई
नो० नं० ५

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवशीं घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १९५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाचें, पुवस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० से० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाप्रमाणे छापून प्रसिद्ध केलें.